
कथासंग्रह

# गोंदण




लेखक

अॅड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

कथासंग्रह

# गोंदण

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

**गोंदण** कथासंग्रह

**Gondan /Kathasangrah**

पहिली आवृत्ती : 7 May 2024

लेखक :

ॲड. यशवंत बाबुराव कदम
बी-1101, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई 400 066.
भ्रमणध्वनी : 9892046868/9619360661
**E-mail : ybkadam14@gmail.com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :

**ई साहित्य प्रतिष्ठान**

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

मुखपृष्ठ व अक्षरजुळणी :
राजेश शेलार
राज ग्राफिक्स, चिपळूण 415605.
मोबाईल : 9049982038
मूल्य रु. 160/- (छापिल पुस्तक)

©esahity Pratishthan®2024
ई पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

'गोंदण'' या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा...

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# अल्पपरिचय

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

जन्मतारीख : 14 ऑगस्ट 1948

मूळगांव : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

प्राथमिक शिक्षण : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

महाविद्यालयीन शिक्षण : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

नोकरी : आयकर खाते(मुंबई)येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या - मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

## खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग

काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

## लेखन (प्रकाशित)

1. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय 1975
2. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2008
3. जीवनगाणे (काव्यसंग्रह) 5 जून 2010
4. अंतरंगत (काव्यसंग्रह) 28 फेब्रुवारी 2010
5. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2011
6. जय दुर्गे (आरती संग्रह) 2011
7. भक्तिरंग (काव्यसंग्रह) 2012
8. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) 11 जानेवारी 2013
9. तांडव (चरित्र) 11 जानेवारी 2013
10. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
11. श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, 8 मे 2013
12. बोलके झाड (कथासंग्रह) मार्च 2016
13. महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च 2016

14. दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल 2016)
15. आकाशाचे पंख (कथा संग्रह) 18 फेब्रुवारी 2017
16. अंतरीचा दीप (अभंगगाथा) 12 एप्रिल 2018
17. गडगीचा डोह (कथासंग्रह) 20 मे 2018
18. देव माणूस (व्यक्तिचित्र) मे 2018
19. लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च 2019)
20. हरिपाठ चिंतन (मार्च 2019)
21. वळणावळणाची वाट (कादंबरी) 16 डिसेंबर 2022
22. मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022
23. गरुडझेप (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022
24. ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022
25. लंडनचा किनारा (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022
26. आडवळणाची वाट (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022
27. चांदण्याचा पाऊस (कथासंग्रह) 1 जानेवारी 2024
28. गोंदण (कथासंग्रह) 7 May 2024
29. गुडघ्याला बाशिंग (एकांकिका) 24 May 2024

आगामी पुस्तके: मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह )

शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)

क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)

आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ - एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

नक्षत्रांच्या सहवासात (व्यक्तिचित्र)

आठवणींचा पेटारा (चरित्र)

गुडघ्याला बाशिंग (एकांकिका)

हळव्या मनाची पाखरे (कथासंग्रह)

पुरस्कार : 'जीवन गौरव पुरस्कार' - वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.

लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार 2018

बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार 2018

कोकण मराठी साहित्य परिषदेचा ’गडगीचा डोह’ या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, 2018.

# अर्पणपत्रिका

माझ्या कोकण मराठी साहित्य परिषदेतील उभरत्या साहित्यिक, कवी परिवारातील श्री. सूर्यकांत मालुसरे, सौ नमिता कीर, कमलाकर राऊत, शिवाजीराव गावडे, प्रा. प्रतिभा सराफ, डॉ. सुनील सावंत, सौ. सुवर्णा जाधव, डॉ. दत्ता पवार सर, प्रा. सौ. दीपा ठाणेकर, सौ. अनुराधा नेरुरकर यांना अर्पण करीत आहे.

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

# माझे दोन शब्द

'चांदण्यांचा पाऊस' या माझ्या नवव्या कथासंग्रहाचे प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठानने नुकतेच केले. आणि आता गोंदण हा दहावा कथासंग्रह माझ्या रसिक वाचकांसाठी मार्गस्थ होत आहे.

लिहिण्याचा मोठा उत्साह असतो आपणात, पण हे लिखाण पुस्तक रूपाने आणायचे हे आजकाल खूपच खर्चिक झाले आहे. प्रकाशक फक्त नावाला असतात. काही स्वतः खर्च करतात पण किती वाचकांपर्यंत ही पुस्तके पोहोचतात. आता आपण पाहतोय आमची पिढी सोडली तर वाचक विरळच, जो वाचनालयाकडे फिरकतो. वाचतो पुस्तके. पण ह्या आटत चाललेल्या वाचून संस्कृतीवर ई साहित्याने तोडगा शोधला हे मात्र आपण सर्वांनी मान्य करायला हवे. ज्याला भरभरून प्रतिसाद मिळताना दिसतो. जगभरातले वाचक ती वाचतात हे सत्य आपणास स्वीकारावेच लागेल. आज ई साहित्यावर लाखानी वाचक वाचतात. नव्या पिढीने हे स्वीकारले आहे एवढे मात्र खरे.

काळ बदलत जातो, लेखकांची दृष्टी विस्तीर्ण होते. नवनव्या विषयातून त्यांना कथानके विषय सापडतात आणि कथा अक्षरबद्ध होतात. हे आपण पाहत आहोत. प्रत्येक लेखकाची आकलन शक्ती, मानवी जीवनाकडे बघण्याची दृष्टी, ही तो वावरत असणारा परिसर, समाज, या चौकटीतच असल्याने सभोवतालचा निसर्ग, समाजाची विचारधारा बदलते. मानवी जीवन या सगळ्याचे पडसाद त्या कथेत उतरतात.

माझ्याकडून ज्या कथा लिहिल्या गेल्या त्या मी कोकणात माझ्या गावी टेरव (चिपळूण) परिसरातल्या वातावरणात. या सगळ्या 15 कथा ह्या लघुकथा

आहेत. त्यावर समीक्षक प्रस्तावनाकार या या कथासंग्रहातील कथांचे वाचक यांच्या पसंतीस उतराव्या अशी अपेक्षा करतो. हे सगळे अक्षर ब्रह्म प्रवाहित व्हावे ही प्रत्येक लेखकाची इच्छा असते, माझीही आहे. मी या अक्षर ब्रह्माला माझ्या पांडुरंगाला श्रेय देतो. जे जे काही घडते, ते त्याच्या कृपेने हा अनुभव माझा आहे आणि त्यावर मी ठाम आहे.

या कथासंग्रहातील पहिली कथा ही गोंदण आहे. पूर्वीच्या काळी कोकणात हातावर नावे गोंधळणाऱ्या बाया यायच्या. अधिक तर मुली आपली नावे त्यांच्या हातावर गोंदून घ्यायच्या. पण हल्ली हे प्रमाण कमी झालेले दिसते. गावोगावी फिरून आपल्या पोटापाण्यासाठी ही धडपड त्यांची असायची. पण या कथेतील नाईकेने येणे आपल्या हातावर आपल्या लग्नानंतर आपले नवऱ्याचे नाव गोंदवून घेतलेले आहे. त्यातून आपल्या नवऱ्यावरचे तिचे प्रेम मनाची खंबीरता ही प्रकट होते. नवरा अकाली गेला, सोबत लहान मुलगा त्याच्यासाठी जीवनभर वैधव्यात राहून मुलासाठी जगणे तिला पसंत आहे. ती मनाची खंबीर आहे. आपल्या मृत पति वरील प्रेम तिला स्वतःच्या स्वार्थापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटते, त्यातून समाजातील विचारधारा स्पष्ट होते. आजही आपण आजची पिढी आपल्या हातावर बरेच काही गोंधळून घेतात पण त्याला भावनेचा ओलावा आपण पाहतो का?

त्या व्यतिरिक्त ज्या कथा या कथासंग्रहात आल्या त्या आपल्या रोजच्या जीवनात सर्वत्र आढळणारी विचारधारा, राजकारणातील भ्रष्ट विचारधारा, यातून बदलत्या समाजाचे चित्र आपणास सर्वत्र दिसते. त्याचप्रमाणे गेम ही कथा तरुण पोलीस अधिकाऱ्यांची भ्रष्टतेविषयीची चीड. ही त्यांच्यावर झालेल्या

संस्कारातून आली आहे. एक चांगला संदेश या कथेतून दिला गेला आहे हे सगळे काल्पनिक आहे. पण अशा मनोवृत्तीची, विचारधारेची आज गरज आहे असे नाही का वाटत. शाप जातीचा/गरिबीचा ही कथा माझ्या समोरील सामाजिक मानसिकतेतून आली आहे. त्याचा शेवट भले काल्पनिक असेल पण गेल्या 25-30 वर्षांपूर्वीच्या सामाजिक जातीपातीच्या परिस्थितीवर बेतलेली आहे. गरिबी जात-पात हा खरंच शाप आहे का मानवी जीवनाला, असा प्रश्न पडतो.

या सगळ्या गेल्या चार-पाच महिन्यात लिहिल्या गेल्या आहेत. लिओ हा जर्मन शेफर्ड जातीचा अत्यंत हुशार, चलाख, पण प्रेमळ डॉग हा आमच्या घरचा वेडा पीर आहे तो. त्याला घरात 24 तास मोकळा सोडलेला आहे. माणूस वेडा त्याबद्दल काय लिहावे. प्रेम दिल्याने प्रेम मिळते हे सत्य. असे म्हटले जाते घोडा आणि कुत्रा हे अत्यंत हुशार, इमानदार, मालकासाठी प्रसंगी प्राण द्यायला तयार असे प्राणी, हे सर्वमान्य सत्य आहे.

इतर कथात मानवी जीवनातील प्रपंच, वैवाहिक जीवन, प्रेम, त्यातून निर्माण होणारे अनेक पडसाद, जे या कथांतील पात्रांच्या वागण्यातून व त्यांच्या वागण्यातून होणारे पडसाद हे सगळे आपण सभोवताली पाहतो. टिपतो डोळ्यांनी, मनात त्यांच्या बऱ्या वाईट पडसादांची अनुभूती आपणास खेळवून ठेवते, आणि त्या कथेचा भाग कधी होतात काहीच आकलनीय नाही.

गेली 40 वर्षे मी साहित्याच्या क्षेत्रात वावरतो आहे. आता 75 झाली. त्यात मराठीतील आमचे पितृतुल्य मधुभाई यांचा सहवास. त्याचबरोबर पडद्याआड गेलेले अनेक मराठी साहित्यकारांच्या सहवासाने जीवन समृद्ध झाले

हे म्हणणे चुकीचे होणार नाही. कै. श्रीना, कै. जयवंत दळवी, कै. प्र के अत्रे, कै. ना सी फडके, कै. जी ए कुलकर्णी, कै. वि वा शिरवाडकर, कै. व पु काळे आणि अनेक बुजुर्ग लेखक ज्यांच्या लिखित लेखनातून आमच्या पिढीवर अनंत उपकार झाले. कोणा कोणाचे नाव घ्यावे ही मराठी साहित्यातील श्रीमंतीवर आजची आमची पिढी. खरोखर श्रीमंत झाली. आणि लिहिण्याची उर्मी त्यांच्यामध्ये निर्माण झाली.

सुरुवातीला कवितेत गुंतलेली मानसिकता कथेकडे वळावी, हा आमच्या पिढीवर झालेला आमच्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या साहित्यिक वातावरणाचा परिणाम आहे. हे प्रांजलपणे मी कबूल करतो. शेवटच्या श्वासापर्यंत माझ्या पांडुरंगाने काही साहित्याची सेवा करून घ्यावी. त्यात ई साहित्याच्या माध्यमातून हे सगळे वेडेवाकडे अक्षर ब्रह्म वाचकांपर्यंत पोहोचावे हीच अपेक्षा.

विशेष म्हणजे “चांदण्यांच्या पाऊस” हा माझ्या कथा संग्रह मराठवाडा विद्यापीठाने एम.ए. फर्स्ट पार्ट या अभ्यासक्रमासाठी स्वीकारला आहे. त्यांना धन्यवाद.

या कथासंग्रहाचे डीटीपी राज ग्राफिक्स यांनी केले आहे. आणि प्रस्तावना डॉ. सुनील सावंत यांची लाभली आहे. मुखपृष्ठ ही राजनेच केले आहे. या सगळ्यांचा मी ऋणी आहे. हा गोंदण कथासंग्रह माझ्या रसिक वाचकांच्या पसंतीस उतरावा ही अपेक्षा करून थांबतो.

**- ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# वाचकांच्या मनावर गोंदणारा सर्वांग सुंदर कथासंग्रह 'गोंदण'

ॲड. यशवंत बाबुराव कदम यांचा हा 'गोंदण' कथासंग्रह, हे मराठी साहित्य विश्वातील त्यांचे अठ्ठाविसावे पुस्तक आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक उत्तम कवी सुद्धा आहेत. तसेच ते अनेक वर्षे साहित्य चळवळींशी निगडीत आहेत. ते कोकण मराठी साहित्य परिषदेचे स्थापना सदस्य आहेत आणि कवितेपासून कथांपर्यंत त्यांचा प्रवास कोमसाप संस्थेच्या संस्थापकांच्या पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या प्रेरणेमुळे व संस्थेतील प्रोत्साहनपर उपक्रमांमुळे घडला, असे ते 'गोंदण' पुस्तकातील त्यांच्या 'दोन शब्दांत' मोकळेपणाने लिहितात. ह्यातच त्यांचे स्पष्ट विचार व स्वच्छंद मन आपल्याला दिसते.

'गोंदण' कथा संग्रहात एकूण पंधरा कथा आहेत. प्रत्येक कथेचा विषय वेगळा व कुतूहल जागवणारा आहे.

'गोंदण' कथेत स्त्री सुलभ मनाचे भावुक कथानक स्त्रीच्या पतीविषयीच्या एकनिष्ठ भावनेचे द्योतक ठरते.

प्रेमाचा खरा आविष्कार 'काळोखातून उजेडाकडे' या कथेत व्यक्त होतो. अचानक अंधत्व आलेल्या प्रेयसीला पत्नी या नात्याने स्वीकारून तिच्यावर औषधोपचार करणारा प्रियकर मानवी जीवनातील 'माणूसकी'चे अस्तित्व जिवंत ठेवतो.

मातृप्रेमाची दिव्य साक्ष 'पडसाद मातृप्रेमाचे' ह्या कथेत घडते. मातृप्रेमामुळे सरकारी उच्च अधिकारी त्याच्या गावाचा सर्वांगीण विकास घडवून आणतो. हे कथानक मनाला स्पर्श करते.

'लिओ' ही कथा मुक्या प्राण्याच्या प्रेमाबद्दल, भावनेबद्दल व त्याच्या मानसिकतेबद्दल आपल्याला ज्ञान देते. ही कथा एका जर्मन शेफर्ड कुत्र्याची भावनाप्रधान कथा आहे.

'धुमारे' ही कथा वयोवृद्ध माणसाच्या प्रेमाची ओळख करुन देते, 'पुरुष' हा प्राणी 'स्त्री' बद्दलचे प्रेम व्यक्त करण्यास कचरतो. त्याला अनेक कारणे असतात. पण कथाकार ॲड. यशवंत कदम यांनी वरिष्ठ नागरिकांचे प्रेम या कथेत निर्भिडपणे मांडलेय. त्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन.

प्रेमात त्रिकोण झाल्यामुळे पत्नीला नाईलाजास्तव घटस्फोट घेऊन पतीला त्याच्या आनंदी मार्गावर सोडावे लागते, ह्याचे वास्तव आजच्या सामाजिक परिस्थितीत त्यांनी 'काडीमोड' कथेत वर्णन केले आहे.

अनोख्या प्रेमाची खोल खोल हृदयात रुतलेली भावना 'कुछ कुछ' कथेत मनाला स्पर्शून जाते.

कथा लेखक ॲड.यशवंत कदम यांनी पुरुषाच्या पाशवी सेक्स प्रवृत्तीबद्दल स्पष्टपणे 'निळाई आकाशाची' या कथेत वास्तव मांडले आहे. ह्या त्यांच्या धैर्याचे मी कौतुक करतो. असे लिखाण मराठी साहित्यात स्पष्टपणे झाले पाहिजे, तरच 'स्त्री' ही भोग्यवस्तू नसल्याची जाणीव होईल व तिच्या लैंगिक भावनेचा आदर पुरुष करेल.

पती-पत्नीचे संसारातील नातेसंबंध सलोख्याचे राहण्यासाठी दोघांमध्ये सामंजस्य हवं. एकमेकांनी एकमेकांना मदत केली पाहिजे. हा धागा सुत्रात गुंफणारी 'छापा - काटा' कथा मानवी जीवन सुखावह करणारी आहे.

आपल्या देशाला जातीयतेचा विळखा क्षणोक्षणी अधोगतीस नेत आहे. पण अशा परिस्थितीत स्वत:चा मार्ग शोधून विकास साधण्याचा मूलमंत्र देणारी कथा 'विळखा जातीचा' विलोभनीय आहे.

ग्रामपंचायतीतील भ्रष्ट कारभार, पोलीस खात्यातील भ्रष्टाचार, कामगारांवरील अन्याय आणि तमाशातील प्रेम संबंधाचे बारकावे अतिशय सूक्ष्मपणे रेखाटणाऱ्या कथा सुद्धा ह्या कथासंग्रहात अँड.यशवंत कदम यांनी सक्षमपणे लिहून वाचकांच्या अंतर्मनाला जागृत केले आहे.

ह्या संग्रहातील प्रत्येक कथा ॲड. यशवंत कदम यांनी प्रभावी शब्दशैलीत ओघवती मांडली आहे. वाचकांना ह्या सगळ्या कथा वाचून निश्चितच आनंद लाभेल व त्यांना अंतर्मुख होऊन विचार करायला प्रवृत्त करतील, असा मला विश्वास वाटतो.

प्रेमाची दिव्य प्रचिती काही कथांमधून वाचकांना मंत्रमुग्ध करेल. असा सर्वांग सुंदर कथा संग्रह वाचकांच्या मनावर कायम स्वरुपी गोंदवला जाईल, ह्यात शंका नाही.

मी आमचे वरिष्ठ साहित्यिक ॲड. यशवंत कदम यांस पुढील साहित्य प्रवासासाठी शुभेच्छा देतो. ते आम्हास गुरुस्थानी आहेत. मी त्यांच्यापेक्षा वयाने खूप लहान आहे. मला चार शब्द त्यांच्या 'गोंदण' कथा संग्रहावर लिहिण्याचे भाग्य मला त्यांनी दिले, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. धन्यवाद !

- डॉ. सुनील सावंत,
ज्येष्ठ साहित्यिक, मुंबई
मो. : ९८१९१८२३२९

# अनुक्रमणिका


1. गोंदण
2. काळोखाकडून उजेडाकडे
3. पडसाद मातृ प्रेमाचे
4. लिओ
5. धुमारे
6. काडीमोड
7. कुछ कुछ
8. निळाई आकाशीची
9. छापाकाटा
10. विळखा जातीचा
11. अग्निदिव्य
12. तेरी भी चूप मेरी भी चूप
13. गेम
14. धोबीपछाड
15. शाप जातीचा / गरिबीचा

# गोंदण

भात कापणी झाली की कोकणात करंडफण्या, गंगावणे विकीत, कधी कधी गोंदण करणाऱ्या बाया गावागावात फिरू लागत. सगळयांच्या घरात तशी श्रीमंती नव्हती पण खंडीभर भात घरात आले की मोठ्या आनंदाने शेर दोन शेर भात देऊन या बायांकडून हातावर गोंदण करून घ्यायला पोर, पोरी पुढे सरसावत. आपले आपल्या बापाचे आडनाव गोंदून घेतले की हायसं वाटायचं पोरापोरींना.

त्या काळात मुली मात्र आपलं नाव गोंधवून घेण्यात तयार होत नसत. कारण लग्नानंतर त्यांची नावे बदलली जात सासरच्या माणसांकडून.... पण जुन्या नावाची गोंदण मात्र आयुष्यभर हातावर मिरवीत असे. म्हणून फक्त आपले नावच फक्त गोंदले जाई. मुले मात्र पूर्ण नाव गोंधवून घेत.

अंकिता मात्र त्या सगळयाला अपवाद होती तिने माहेरी आपले नाव गोंधवून घेतले नव्हते पण लग्नानंतर नवऱ्याच्या नावासकट आडनावही तिने गोंधवून घेतले होते. त्यावर सौ अशी आद्याक्षरे ही ठळकपणे झळकत होती त्यासाठी दिवाळीला ती माहेरी आली होती, त्या बायाकडून तिने ते नाव अगदी छान पैकी कोरून घेतले होते.

आज तिच्या लग्नाला दोन वर्षे होत होती. तिचा नवरा इरिगेशन खात्यात काम करीत होता. लाईनमन म्हणून धरणात येणारे पाणी तीन-चार गावाला दिले

जात असे. त्या गावात पाणी सोडण्याचे व बंद करण्याचे काम त्याच्यावर सोपवले होते. कधी त्या लाईन वर पायी पायी वा सायकलने तो ते काम करीत असे गेले दीड वर्ष तो या कामावर होता. खरे तर त्यांच्या मूळ गाव कोयना धरणाच्या पाण्याखाली गेला म्हणून त्याला नोकरी दिली गेली होती. तो खूप खुशीत होता. पण कधीकधी त्या कामा व्यतिरिक्त त्याला धरणाच्या खालच्या टनेल मध्ये लिकेज होई तेव्हा पाण्यात उतरून फिटरचे काम करावे लागे.

नंदन त्याचे नाव. अंकिताशी त्याचे लग्न झाल्याला दोन वर्षे झाली होती. घरात सारे आनंदात चालले होते. पण गेले सहा महिने सासू मात्र कुरकुर करीत होती तिला नातवंड पाहायचे होते. तसं तिचं काही चूक नव्हतं कारण तिचं वयही झालं होतं. एकदाच नातवाचे मुख पाहिले की ती डोळे मिटायला मोकळी होती. पण नंदन काही मनावर घेत नव्हता. काय घाई आहे होतील की पोर. तोवर जरा मजा करू दे की. एकदा का ते जर लागलं की मग बायकोत काय नाविन्य वाटणार ? हे त्याच्या मित्राने त्याच्या डोक्यात खुळ घातले होते म्हणून काही बाही उपाय करून तो ते टाळीत होता.

हे नंदन आता मी नाय थांबायची मला नातवंड हवय. तुमचं ते थेर सारे बंद करा. या वर्षात पोर व्हायला हवंय! काय ऐकलं का? अगदी त्रास होऊन त्याची आई नंदनला जीवाचं आटापिटा करीत पोट तिडकीने सांगत होती. अन् अंकिता दाराआड लपून सारे ऐकत होती.

“अहो सासूबाई” म्हणत ती तेवढ्यात मुद्दामच अंगणात आली नी त्यांचं संभाषण थांबल!

“अहो! पाणी आणले तुमच्यासाठी ते प्या! आणि जरा आराम करा !

आज सकाळपासून नाचणीची मळणी त्याने खळयात घातली होती. आई पाखरे हाकलत अंगणात चक्कर मारत होती. तसा आज रविवार होता. पण नंदनला ठराविक दिवशी रजा नसे. आठवड्यातून एक दिवस एक दिवस मिळे. त्याने मळणीसाठी आजचा दिवस आपल्या सहकाऱ्यांना सांगून घेतला होता.

सारे आटोपून तो घरात न्याहारी करायला आला अंकिताने त्याला भाकरी दिली. सासू अजून उपाशीच होती.

"काय ग! अंकिता... आई काय म्हणते..."

"इश्श! ते मला काय सांगता! अंकिता

मग कोणाला! अगं तिला नातवंड हवय....!

"बघ बावा! विचार कर ! तो

मी तयार हाय पण... तुम्ही?

मी पण... आता बस! विचार करायला हवा दोन वर्षे झाली आणि लोक काय म्हणतील?

ते पण खरं मग ठरलं म्हणत त्याने तिचा हात हातात घेतला..

ती माजघरात पळाली मी नंदन तिच्या मागे काळोखा तिला शोधू लागला.... तिने सासूला हाक मारली.... तर नंदन बाहेर आला...

काय ग! अंकु! काय झालं? सासू

काही नाही! हे! अंकिता

हे काय? सासू

काही नाही! काही नाही! अंकिता

आज नंदनने आईची इच्छा पूर्ण करण्याचा निर्धार केला.

महिना गेला असेल नंदन ला आज धरणाच्या खालच्या पंपामध्ये झालेल्या बिघाड दुरुस्तीसाठी बोलावणे आले होते आणि अचानक लाईट गेली. तो अडकला होता. बाहेर येण्यासाठीचा गेट पण बंद होता त्यांनी खोललेल्या पंपही रिपेअर झाला नव्हता नी त्यातल्या लिकेजमुळे त्या बंद रूममध्ये पाणी साठायला लागले होते. तोडू शकला पण त्याचा आवाज वर ऐकू जात नव्हता पाणी भराभर साठायला लागले होते पाणी कमरेपर्यंत येईपर्यंत त्याने ते बंद करण्याचा अतोनात प्रयत्न केला पण मग मात्र त्याचा धीर खचला. पाणी माने पर्यंत आले आणि नाका तोंडात गेले, सारे संपले होते.

दोन दिवसांनी जेव्हा पावर मोटर सुरू झाला तेव्हा सारा प्रकार समोर आला. त्या रात्री अंकिता फारच अस्वस्थ होती. पंप हाऊसला निरोप पाठवायला कोणी नव्हते. ती काळोखातच चाचपळत पंप पाऊस कडे गेली पण तेथे कोणी नव्हते लाईट पण नव्हती, नंदन आत काम करतोय की हेही कोणाला माहित नव्हते, तिने वॉचमनला विचारले, तोही म्हणाला आता येथे कोणी नाही सकाळी बघतो!

ती पुन्हा घरी आली रात्रभर झोप लागली नाही. पुन्हा ती पंप हाउस वर सकाळी गेली, तेव्हा सगळा प्रकार उघड झाला.

नंदनचे शव बाहेर काढण्यात यश आले.... ते पाहून तिने तर हंबरडाच फोडला... सारे आयुष्य उध्वस्त झाले होते. तिला रडणे ही कठीण होऊन बसले

होते. पुढे मोठा डोंगर उभा होता समस्यांचा! तिची सासू एकटीच होती. यापुढे घर कसे चालवावे हे तिला कळत नव्हते. दुसरा कोणाचा आधार नव्हता. माहेरची गरिबी कल्पनेच्या पलीकडची होती. उभे आयुष्य अशा अवस्थेत कसे काढायचे ? तिला काहीच सुचत नव्हते.

नंदनची क्रिया श्राद्ध झाली एवढ्यात नंदनच्या ऑफिसमधून निरोप आला अंकिता बाईला ऑफिसमध्ये बोलावले होते. अंकिताला त्यांच्या डिपार्टमेंट नोकरीची ऑफर दिली होती ऑफिसमध्ये पिऊन म्हणून....

तिने विचार करायला आठवड्याभराची वेळ मागून घेतली होती खरे तर पोटाचा प्रश्न होता नोकरीची तिला गरज होती शिवाय सासूची जबाबदारी होतीच तिने नोकरीचा स्वीकार केला.

नंदन गेल्याला दोन महिने होऊन गेले होते. आणि तिला वेगळ्या चिंतेने ग्रासले होते. तेव्हा तिला दिवस गेले होते. या जाणिवेने ती अधिकच खचून गेली होती. तिने ही बातमी सासूला सांगितली.

आपल्या वंशाला... हक्काचा मालक येणार या आनंदाने सासूला, सुनेला कोठे ठेवू असे झाले होते... तिच्या मुलाचे नंदनचे जाणे तिने आसवांसकट गिळले व येणाऱ्या बाळाच्या चाहूलने तिच्या आनंदाला पारावर उरला नाही.

पण नोकरी करीत असताना हे प्रकरण कसे निस्तरायचे याच चिंतेत अंकिता होती ती सारखे सारखे आपल्या हातावर कोरलेले नंदनचे नाव पहात राही, मोठा गोंधळ झाला होता तिच्या मनात. आता ऑफिसच्या लोकांना हे

माहित होईल लोक काय काय शंका घेतील हे आणि ते याने ती अधिक त्रस्त झाली होती पण हे सारे तिला निस्तरणे भाग होते.

नऊ महिने झाले ती नुकतीच बाळंतपणाच्या रजेवर गेली होती तिची ऑफिसचे लोक तिला सर्वतोपरी मदत करीत होते...

ती बाळंत झाली मुलगा झाला.... जणू दुसरा नंदनच.... सासूला परमानंद झाला होता. ती आजाराने ग्रासलेली पण रजा घेऊन बाळाचे सारे करीत होती.

सहा महिन्याने अंकिताने ऑफिसला जाणे चालू केले घरी सासू बाळाची काळजी घेत असे.

सारे काही सुरळीत चालले होते.

मे महिना होता... आता बाळाचा पहिला वाढदिवस येणार... तेव्हा तो कसा साजरा करायचा... याचा विचार ती करीत होती. उत्साह तसा नव्हता पण तो करणे भाग होते त्या बाळाचा काय दोष होता? तिने घरच्या घरीच तो पार पाडला. दोन दिवसाची रजा तिने घेतली होती.

ती जेव्हा ऑफिसला आली, तेव्हा तिचा नवा बॉस नागेश नायर येऊन जॉईन झाला होता. उमदा गडी, गोरा पान, उंच. त्याचीही पहिलीच पोस्टिंग होती. मुंबईचा ट्रेनिंग संपून तो इथे आला होता.

अंकिता सकाळीच ऑफिसला आली व तिच्या बॉसचे ऑफिस स्वच्छ करून पाणी भरून ठेवून ती बाहेर बसली होती...

एवढ्यात नागेश साहेब आले व त्यांनी बेल मारली....

तेव्हा लगबगिनीने अंकिता आत गेली

तुम्ही कोण? काय काम आहे?

मी अंकिता... येथे प्यून आहे! काय हवे आहे का?

नागेश तिच्याकडे पहातच राहिला. गोरीपान अंकिता नुकतीच बाळंतपणातुन मोकळी झाली होती. अंगावर, चेहऱ्यावर छान तजेलदारपणा आला होता. आजच तिने आपले केस धुतले होते आणि केस मोकळे सोडले होते. ते तिच्या कानाजवळ छान पैकी रेंगाळत होते....

तुम्ही येते कशा? कशाला आल्या ?

मी येथे नोकरी करते! अंकिता

"ठीक आहे तुम्ही जा मला चहा हवा आहे तेवढा सांगा...!" तो

तिने चहाचा कप नागेश समोर ठेवला व स्टूलावरचा पाण्याचा ग्लासही.... आणि ती पुन्हा तशीच केबिन बाहेर पडली.

दहा मिनिटांनी पुन्हा बेल वाजली म्हणून ती पुन्हा केबिनमध्ये गेली...

घेऊन जा तो कप...!

आज पहिल्यांदाच नागेश ऑफिसमध्ये आला होता खरे तर आज त्याला त्याच्या स्टाफची ओळख करून घ्यायची होती. कामाचे स्वरूप काय याची त्याला कल्पना नव्हती. दीड वर्षाचे ट्रेनिंग संपून तो पहिल्याच पोस्टिंग वर आला होता यूपीएससीची परीक्षा पास करून क्लास वन ऑफिसर म्हणून त्याची नेमणूक कोयनेच्या प्रोजेक्टवर झाली होती.

दुपारी मिटींग झाली. सगळा स्टाफ हजर होता.... त्या सगळ्यांना अंकिता लगबगीने चहा देत होती.

नागेश तिच्या हालचाली डोळ्याने टिपित होता. खरंतर तो चक्रावला होता ही कोण? येथे कशी? एवढी सुंदर मुलगी प्यून म्हणून कशी? अनेक प्रश्न त्याला सतावीत होते. पण तो कोणाला तिच्याबद्दल विचारू शकत नव्हता. शेवटी तो बॉस होता.

आज रात्री त्याला खरे तर झोपच लागली नव्हती. रेस्ट हाऊस मध्ये तो सध्या उतरला होता. ते दीड दोन किलोमीटर ऑफिस पासून लांब होते. जायला यायला ऑफिसची गाडी होती. कधी एकदा ऑफिसला जातोय असे त्याला झाले होते.

तो ऑफिसला गाडीने आला. नेहमी प्रमाणे ऑफिसच्या प्यूनने त्याची बॅग गाडीतून आणायची असते. पण येथे तर अंकिता एक स्त्री होती. ती पण ऑफिसला वेळेवर आली होती. पण त्याआधी नागेश आला होता. तिला घाम फुटला. ऑफिस साफ करायचे राहून गेले होते. शिवाय कालचे चहा पाण्याचे कप तसेच तेथे होते... ती भराभर सारे उचलीत होती त्या गडबडीत ती नागेशची बॅग गाडीतून आणायला विसरली.

“माझी बॅग आणली का?” नागेश

“नाही सर! मी विसरली कामाच्या ओघात...!” अंकिता

“ठीक आहे! आता जाऊन आण...!” नागेश

हो सर! म्हणत ती..... तशीच बॅग आणायला गाडी कडे गेली. गाडीचा ड्रायव्हर पण नवा होता. गाडी बंद करून तो कुठेतरी चहा प्यायला गेला... गाडी बंद होती तिने ड्रायव्हरला शोधला पण तो नाही दिसला ती पुन्हा ऑफिसमध्ये आली...

केबिनमध्ये न जाता बाहेरच बसली थोड्यावेळाने पुन्हा बेल वाजली..

माझी बॅग... तो

"सर तो ड्रायव्हर जाग्यावर नाही गाडी बंद आहे....!" अंकिता

"ठीक आहे तू जा....!" नागेश

ती पार गोंधळली होती. बॉस रागवेल याच काळजीत ती होती.

एवढ्यात ड्रायव्हर आला त्यानेच बॉस कडे बॅग नेऊन दिली... ती संध्याकाळपर्यंत केबिन कडे फिरकली नाही....

स्वतःच आपली बॅग हातात घेऊन नागेश गाडीत बसला नी रेस्ट हाऊसवर गेला...

दोन दिवस रजा असल्याने ऑफिस कडे कोणीही फिरकले नाही. अंकिता मात्र येऊन सगळे ऑफिस स्वच्छ करून गेली. सारी अस्ताव्यस्त केबिन तिने नीट लावली अगदी चकाचक...

तो सोमवार होता.... ती ऑफिसमध्ये आली होती. नागेश ऑफिसमध्ये आल्याला आता दोन मिनिटे होऊन गेली होती.

"मॅडम! तुम्ही येथे जवळच राहता का?" नागेश

"हो! मी येथे जवळ राहते!" अंकिता

"मला बरेच दिवस घरची भाकरी मिळाली नाही. खानसामाच्या जेवणाने माझे मन विटले आहे... मला भाकरी नी कोलीम किंवा काही सुखी मासळी खावीशी वाटते... येथे कोठे मिळण्यासारखे आहे काय?" नागेश

"का नाही! मीच आणिन की उद्या बुधवार आहे, मी आणेन दुपारला...!" अंकिता

छान असे म्हणत तो पुन्हा आपल्या कामाला लागला...

त्याने तिची सारी हकीगत जाणून घेतली होती...

त्यालाही वाईट वाटले परमेश्वराने हे असे दुःख तिला का द्यावे? एक लहान मूल पदरात...

ती मध्ये दोन वेळा घरी जात असे मुलांना पाजायला, हेही नागेशला माहिती पडले होते त्याबद्दल त्याची तक्रार नव्हती... तो तिला अगदी सर्वतोपरी मदत करायला तयार होता... पण तीच फटकून राहत होती. मर्यादेने बोलणे, केबिनमध्ये क्षणभरही कामाशिवाय न थांबणे, ती फार काळजी स्वतःची घेत होती.

तो दिवसभर अंकिताचा विचार करीत असे की त्याच्या मनात भरली होती...

तोही मर्यादेने तिच्याजवळ बोलत असे, वागत असे.

आज तर तिने भाकरी कोलीम त्याच्यासाठी आणला होता नी तो डब्बा जेवणाच्या टेबलावर ठेवला होता. पाणी पिण्याच्या निमित्ताने तो उठला तेव्हा

तो डबा उघडून त्यातले दोन घास त्यांनी खाल्ले आता तर अकरा वाजले होते अजून लंचला वेळ होता पण तो स्वतःला रोखू शकला नाही.

त्यांनी बेल मारली आणि अंकिताला जेवण लावायला सांगितले तिनेही तत्परतेने ते सारे केले....

ह्यांनी भराभर तो डबा खाली केला व बेल मारली.

तेव्हा अंकिता लंचला गेली होती.... शिवाय मुलाला पाजायला घरी,

"कोठे होता इतका वेळ?" नागेश

"सर मी मुलाला.....पाजायला.." तिने जीभ चावली.

मुलाला ? कोणाच्या? काय?

तिने मग सगळी हकीगत सांगितली...

तो स्तब्ध झाला.

सॉरी म्हणत त्याने डबा तिच्याकडे दिला आत शंभर ची नोट ठेवायला तो विसरला नाही.

दुसऱ्या दिवशी जेव्हा ती ऑफिसमध्ये आली.....

साहेब हे हे घ्या तुमचे पैसे तिने

तुम्ही नको घ्यायला हवे होते ते!

तुम्हाला हवे तेव्हा सांगा, मी जेवण आणीन पण हे पैसे घ्या!

त्यांने हो नाही म्हणताना पैसे घेतले.

आज तिच्या स्वभावातला स्वाभिमान त्याला अधिक जवळ ओढीत होता.

आणि मग आठवड्या आठवड्यानी हे होतच राहिले.

ती त्याच्या मनात भरली होती..

खरे तर तो तिच्या प्रेमातच पडला म्हणा ना.... पण ती मात्र अगदी दूर राहून मर्यादेने वागत होती.

एक दिवस सर्किट हाऊस वर मुंबईहून डेप्युटी इंजिनियर इन्स्पेक्शनला आले होते. नी अंकिताला... काही फाईल घेऊन सर्किट हाऊस वर जावे लागले. ड्रायव्हर गाडी घेऊन आला होता. रात्री आठ वाजेपर्यंत इन्स्पेक्शन चालू होते. अंकिता पण तेथेच होती.

तिचा जीव वर खाली होत होता मुलाला दिवसभरात ती पाजू शकली नाही. आता रात्र झाली होती ड्रायव्हर ही घरी गेला होता.

नागेश तिला सोडायला घरी स्वतःची गाडी घेऊन आला होता....

सर घरी चला! या आत या म्हणत तिने त्याला घरात बोलावले... वन रूम किचन चे घर होते. त्यात ती तिचा मुलगा राहत होती. त्यावेळी तिचा मुलगा आठ महिन्याचा झाला होता. रांगत होता. गोरापान छान गुटगुटीत.

नागेश ने त्याला उचलून घेतले तोही बिनधास्तपणे त्याच्याजवळ खेळू लागला होता.

“साहेब! थोडं खाऊन जा..” अंकिता

आता उशीर झालाय... मलाही सर्किट हाऊस वर जायला वेळ होईल. शिवाय कॅन्टीन बंद झाली असेल. असं ती म्हणताना तो हो! म्हणाला.

तिने त्याला भाकरी बोंबील वाढली. छान जेवला तो..

आणि.... निघून गेला...

दुसऱ्या दिवशी रजा होती. पण इन्स्पेक्शन झाल्याने सारा गोंधळ त्याला निस्तरावा लागणार होता. त्याने कोणाही स्टाफला न बोलावता अंकिताला बोलावले होते.

ती ऑफिसला जाताना भाकरी कोलीम घेऊन गेली होती. "हेच आमचं गरिबांचे जेवण. हेच परवडतं." अंकिता

"पण मला खूप आवडतं!" नागेश

"बरं! बरं!" अंकिता

ती तोपर्यंत केबिन मध्ये बसून होती नी तो दिवस भर हेड ऑफिस साठी रिपोर्ट तयार करीत होता.

अंकिता त्याच्याकडे पाहत होती त्याची सफाईदारपणे कम्प्युटर हाताळणे तिला फारच आवडले होते.

चार वाजता तू घरी निघाला त्याने अंकिताला घरी सोडले व तो सर्किट हाऊसवर गेला.

नागेश मधल्या काळात अंकितात गुंतत गेला होता.... पण बोलून दाखवणे त्याला कठीण झाले होते.... विषय काढायचा तरी कसा या विचाराने

तो त्रस्त होता... तो तिचा बॉस होता आणि ती एक सामान्य प्युन. उगाच बभ्रा नको म्हणून तो आधी काळजी घेत होता.

अलीकडे तर त्याने तिच्या घरूनच जेवणाचा डबा मागवण्यास सुरुवात केली होती. ते सकाळी करताना तिची पार तारांबळ उडत होती. शिवाय चांगले चांगले ती सतत करीत होती. जे पूर्वी घरात शिजत नव्हते सासूलाही त्याचे आश्चर्य वाटत होते. अनेकदा तिने अंकिताला विचारलेही पण ती थातूरमातूर सांगून वेळ काढत होती. नुसती भाकरी भाजी होणाऱ्या घरात आता छान जेवण बनत होते. नागेशनाही ते आवडू लागले होते. तिच्या हाताला चव चांगली होती. चार-पाच महिने असेच निघून गेले.

अजून नागेशही सर्किट हाऊस वरच राहत होता. खरे तर तो चांगल्या घराच्या शोधात होता पण त्याला घर मिळत नव्हते. मग तो काही सर्किट हाऊस सोडत नव्हता.

दुपारी अंकिताच्या घरचा डबा येई व मध्ये जाऊन ती संध्याकाळच्या चपाती भाजी घेऊन येत असे. खूप धावपळ होईल तिची पण तरी ते सारे काम न कंटाळता करीत होती. मुलाकडे बघायला तिला वेळ मिळत नव्हता.

थंडीचे दिवस होते नी अचानक तिचा मुलगा आजारी पडला. सर्दी पडशाने तो हैराण झाला होता. गावात डॉक्टर असा नव्हताच. एक डॉक्टर दोन तासासाठी येई. त्याने औषध दिले पण उतार पडेना.... हे नागेश ला समजले त्याने मुलाला तालुक्याच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले दोन दिवसानंतर फरक पडला तोही तेव्हा रजेवरच होता मध्ये मध्ये अंकिता घरी जाऊन येत असे.

त्या काळात नागेशचा तिच्या मुलाला पुरता लळा लागला होता. अंकितालाही त्याचा स्वभाव आवडला होता. हळूहळू ती नागेशमय होत होती हे तिच्याही ध्यानात आले होते.

शुक्रवारी संध्याकाळी हॉस्पिटल मधून मुलाला सोडले तेव्हा घरी न जाता ती सर्किट हाऊस वरच राहिली होती. ते हाऊस प्रशस्त होते त्यामुळे अडचण नव्हती. सकाळी नागेश ने आपल्या गाडीने तिला घरी सोडले व तो ऑफिसला गेला.

दोघेही ऑफिस मधून चार दिवस गायब झाल्याने जरा संशयाचे वातावरण होते. शिवाय एकाच दिवशी दोघेही ऑफिसला आले. सगळयांचे कान टवकारले होते.... नको नको त्या वावड्या उडत होत्या. पण तिच्या व नागेश पर्यंत त्या पोहोचत नव्हत्या. तिने मुलाला हॉस्पिटलला ऍडमिट केल्याची अपडेट ऑफिसमध्ये दिली. बिल रिलीज करण्यासाठी तेव्हा सगळे चिडीचूप झाले.

नागेश नोकरीला आलेल्याला एक वर्ष होऊन गेले होते. अंकितानेही यावर्षी एसएससी ची परीक्षा पास केली होती.

एवढ्यात त्यांच्या ऑफिसमध्ये कारकुनासाठी एक जागा खाली झाली होती तेव्हा त्या जागेसाठी नागेशच्या सांगण्यावरून अंकिताने अर्ज केला होता. ती परीक्षा पास झाली व तिचे पोस्टिंगही त्याच ऑफिसमध्ये झाले. आता तिचा पगार वाढला होता व चांगले काम, शिवाय चांगला बॉस तेव्हा अंकिता अगदी खुश होती. आता तर ती वेगळयाच विश्वात वावरत होती.

आणि नागेशचीही तिच्याशी लगट वाढत जात होती. तिलाही नागेशचे आकर्षण वाटत होते पण ती अजून मर्यादा सोडून वागत नव्हती.

एवढ्यात जून महिन्यात नागेश ची बदली झाली तीही पुण्याला. तोही अचानक झालेल्या बदलीने चक्रावला. त्यांनी ऑफिस जवळ दोन महिन्यांचे एक्सटेन्शन मागून घेतले पण दोन महिन्यांनी त्याला पुण्याला जावेच लागणार होते. तो त्रस्त होता. अंकिताला कसे विचारावे या चक्रात एक आठवडा निघून गेला. तिचे वागणे अगदी खेळीमेळीचे होते. घरून दोन वेळचे जेवण ती देत होती. सर्व काही ठीक चालले होते. पण मामला मात्र जैसे थे होता.

एक दिवस दुपारी जेवण झाल्यावर नागेश ने तिला केबिनमध्ये बोलावले.

“मॅडम माझी बदली झाली आहे!” नागेश

“हो! हे ठीक नाही झाले.... चांगली माणसे टिकत नाहीत या ऑफिसात... !” अंकिता

“खरे तर मला जावेसे वाटत नाही पण इलाज नाही.” नागेश

“मग...?” अंकिता

“मग काय जावे लागेल... मी तुम्हाला विचारणार होतो...!” नागेश

“काय?” अंकिता

“लग्न करणार का माझ्याशी!” नागेश

ती चमकली!

“ना! ना! कसे शक्य आहे?” अंकिता

“का नाही?” नागेश

“अहो माझे लग्न झाले आहे, मला एक मुलगा आहे...!” अंकिता

“मग काय मी त्याला स्वीकारायला तयार आहे....!” नागेश

“नाही मी माझ्या हातावर माझ्या नवऱ्याचे नाव गोंदलय...!”

“कधीच पुसता येणार नाही! साहेब...!” अंकिता

“हा हट्ट सोडा... तुम्ही... लग्न करा चांगल्या मुलीशी....!” अंकिता

“माझी गोंधण आडवे येतंय...” अंकिता

ते कधीच..... खोडता येणार नाही मरेपर्यंत, तिने त्याला नकार दिला..!

नी

नागेश ऑफिस सोडून निघून गेला कायमचा....पुण्याला

# काळोखातून उजेडाकडे !

खरंच! सोनी आम्ही खरंच कंटाळलो तुझ्या, तुझ्या या अकाली आलेल्या आंधळेपणाला, सगळा विचका झालाय, तुझ्या आयुष्याचा आणि आमचाही. अग आता आमचे वय काय! साठी ओलांडली आहे आम्ही. आता किती दिवस जगणार आम्ही, कोण पाहणार, काळजी घेणार तुझी सोनी, काळजाला घरे पडतात ग या विचाराने, मनाचा थरकाप होतो आमच्या, तुझ्या डोळ्यासमोर काळाकुट्ट अंधार आहेच, पण आमच्याही तसाच दिसतोय आम्हाला, काय करावे, त्यापेक्षा...! सोनीची आई.

आणि तिच्या डोळ्यातून अश्रूंचे ओघळ वाहू लागले. शेजारी सोनी आणि राजाभाऊ होते, तिथे ते पोट तिडकीचे आळवणे पाहून तेही घाबरले. त्यात ती कोसळून पडली जमिनीवर, सावरले राजाभाऊंनी.

या सगळ्या प्रकारात अकाली आलेल्या आंधळेपणात सोनीची अवस्था काय झाली असेल. तिला आता कोठे 24 वे वर्षे लागले होते. त्यात नोकरी गेली कंपनीने तिला प्रवेश नाकारला. डॉक्टरचे सगळे उपाय हरले इम्प्लांटचेही चान्सेस नाहीत हे ऐकून तर तिघेही तुटून पडली. सारा अंधार आणि अंधार दिसत होता त्यांना सोनीच्या आयुष्यात. आणि हे संकट अंगावर घेण्याची ताकद ही उरली नव्हती आई-बाबांच्या. या अंधारातून उजेडाकडे येण्याचे सगळे मार्ग थकले होते. आता आता तर अन्नाचा कणही उतरत नव्हता घशाखाली.

तुटपुंजी पेन्शन राजाभाऊंची दोन वेळचे जेवण मुश्किलीने भागे, त्यात सोनीची नोकरी गेली आजारासाठी खूप खर्च झाला, शिल्लक काय? पुढे सगळा अंधार आणि अंधार त्यात तरुण पण आंधळी मुलगी पदरात, आमच्या मागे तिचे काय होणार? त्यात ठरलेल्या लग्नाचे ३/१३ वाजले. मुलगा लंडनमध्ये, आई वडील येथे मुंबईला. पण गेल्या चार महिन्यात फिरकलेही नाही राजाभाऊंच्या घरी. दृष्टच लागली होती म्हणा. प्रचंड तणावाखाली राजाभाऊंचे कुटुंब होते.

'शरद' लंडनमध्ये आर्किटेक म्हणून कार्यरत होता. तिकडे हिवाळा सुरू झाला की आपण भारतात जाऊ मुलीला भेटू आणि लग्न करून लंडनला प्रयाण करू या विचारात तो होता. सोनी सुंदर, सुदृढ चेहरा घेऊन जन्माला आलेली. सॉफ्टवेअर इंजिनियर. गेले दीड वर्ष हेक्सावेअर मध्ये काम करीत होती. गरीब पण संस्कारी घर तिच्या आई-वडिलांचे. भाऊ निवृत्त शिक्षक. शरद ने फोटो पाहिले अनेक वेळा व्हिडिओ वर बोलणे झाले, सोनीचे प्रपोजल त्याला पसंत पडले आणि तो जेव्हा मार्चमध्ये येईल तेव्हा लग्न करावे हे ठरले.

पण दैवाचा फेरा फिरला आणि सोनीच्या डोळयांना लॉकडाऊन मध्ये घरून काम करताना इजा झाली आणि सगळेच संपले. पोरीचे मनसुबे मातीमोल झाले. हे प्रपोजल शरद च्या आई वडिलांनी नाकारले आणि दुसऱ्या मुलीच्या शोधायला ते लागले. पण यातले अक्षरही शरदला माहीत नव्हते. त्याचे फोन येत बोलणे होई पण दुःखात लोटलेल्या सोनीने व्हिडिओ कधीच ऑन केला नाही. तिच्या बोलण्यात काहीतरी गडबड आहे हे त्याला जाणवले. त्यांनी आई-वडिलांना याबाबत विचारले तेव्हा त्यांनी थातूरमातूर उत्तर देऊन ती रोगीष्ट आहे असे सांगितले. पण त्यांच्या बोलण्यात काहीतरी गोम आहे, हे शरद सारख्या

हुशार मुलाच्च्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. त्याने सोनीला खरे कारण विचारले तिने सगळे त्याला सांगितले. खरे खरे आणि आपण मला विसरून जा हेही सांगितले. पण शरद काही ऐकायला तयार नव्हता. यावर काहीतरी उपाय निघेल. एका मुलीचे आयुष्य बरबाद होण्यापासून आपणच तिला बाहेर काढू असा निर्धार त्यांनी केला. ही गोष्ट मात्र शरदने आई-वडिलांना सांगितली नाही.

मार्चच्या पहिल्या आठवड्यात तो भारतात आला आणि दोन महिने येथे राहणार होता. तो एअर पोर्टवरून निघाला तो प्रथम सोनीला भेटायला गेला. त्याचे मन तिच्याकडे ओढ घेत होते. मी येणार हे त्याने कोणालाच कळविले नव्हते. सोनिला प्रत्यक्ष भेटण्याची त्याची ही पहिलीच वेळ. त्याला ती खूप आवडली होती आणि प्रेमाचा अंगार त्याच्या अंतरमनात आता प्रज्वलित झाला होता. सकाळी ११ वा. तो त्यांच्याकडे आला आणि त्याचे जेवणही त्यांच्याकडेच झाले दुपारचे. तोपर्यंत त्याने घडलेल्या सगळ्या घटनांचे फॅक्टस जाणून घेतले आणि तो आपल्या घरी आला, तेव्हा ५ वाजले होते.

शरदचे घर बाबूलनाथ मंदिरासमोरच होते. त्या देवालयात लहान असल्यापासून तो येत होता. संध्याकाळी शरद दर्शनाला गेला. त्याने भगवंतांना प्रार्थना केली की सोनीसाठी. "देवा माझ्या सुखातील अडथळे दूर करा !" आणि तो घरी आला. आज तो घरी फारसा बोलला नाही. जेट लॅगच्या नावाखाली बेडरूम मध्येच पडून होता. एवढ्यात आईने लग्नासाठीचे आलेले अनेक फोटो आणून त्याला दिले. शरद ने त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. रात्रीचे जेवणही त्यांनी घेतले नाही. सोनीला या अवस्थेतून बाहेर काढण्याचा निर्धार त्याने केला होता. लग्न करायचे तर त्याच मुलीशी असा त्याचा निर्धार होता. कितीही संकटे

येवोत, अडचणी येवोत, आपण तसूभरही हलायचे नाही, असे त्यांनी मनोमन ठरविले होते. आपण या लग्नाचा गाजावाजा न करता सरळ रजिस्टर पद्धतीने विवाह करावे आणि तिला घेऊन लंडनला जावे हेच त्यांनी ठरवले होते. आई-वडिलांचे याला विरोध होता पण त्याने ते जुमानले नाही आणि दोन दिवसात वैदिक पद्धतीने दोन्ही कुटुंबाच्या उपस्थितीत लग्न उरकले. परत जायची तिकिटे काढली आणि आठवडाभरात त्याने लंडन गाठले. त्यांनी त्याच्या आईवडिलांना ठणकावून सांगितले, “हे पहा तिचा दोष नाही गेले सहा महिने ती माझी वाट पाहत होती, माझे प्रेम बसले आहे, देवाने हे केले असेही मी म्हणणार नाही, मला तिला दुखवायचे नाही. ती फार संवेदनशील आहे. तिच्या आयुष्याची परवड मी पाहू शकणार नाही, आता मी तिला माझ्या जीवनातला एक भागच मानतो. बस तेव्हा कृपया पुढे काय होईल याची तुम्ही चिंता करू नका. शेवटी सगळे चांगलेच होईल!” शरद

पण आई-बाबांची नाराजी तशीच ठेवून शरदने सोनी सोबत लंडन गाठले. आता लंडनमध्ये सोनीच्या अडचणींना पारावर राहिला नाही. नवी जागा, सोयी वेगवेगळ्या, कमोड, वॉश बेसिन, किचन, हॉल, नव्या घरात या सगळ्याची पूर्णपणे ओळख व्हायला एक आठवडा गेला.

इथे आल्यावर शरदने प्रथम काळजी घेतली ती म्हणजे कोणत्याही परिस्थितीत सोनीला प्रेग्नेंसी पासून दूर ठेवणे. त्यासाठी जे जे उपाय लंडनमध्ये होते ते त्याने प्रथम केले. मग एका अंधशाळेत तिला दोन तासांच्या अभ्यासाची व्यवस्था केली. तिने तर सगळ्या लकबी आत्मसात केल्या. अगदी रोड सिग्नल पार करण्यापर्यंत. सारे काही त्यांनी शिकवले. शिवाय ब्रेल लिपीचेही धडे दिले.

सोनी ही इंजिनियर होती. लॅपटॉप हातावर बसला होता. त्याला ब्रेल लिपीची जोड दिली आणि आता ती स्वतंत्रपणे टाईप रेकॉर्डिंग करू शकत होती. गेल्या सहा महिन्यात तिची स्मरणशक्ती ही वेगळाच आकार घेत आहे, हे तिने ओळखले. त्या अंधशाळेने तिला अंध मुला मुलींना शिकवण्याचे कामही दिले.

त्याच काळात शरदने तिच्या डोळ्यांची सखोल तपासणी करून ट्रीटमेंट घ्यायला सुरुवात केली. दोन महिन्यात तिला भुरकट दिसायलाही लागले. तिच्या रेटीनावर आलेला पडदा का व कशामुळे आला याची डॉक्टर टेस्ट करून लाईन ऑफ ट्रीटमेंट ठरवीत होते. शेवटी त्यांनी शरदला एक छोटीशी शस्त्रक्रिया करावी लागेल हे सांगितले. व प्रथम एका डोळ्याची शस्त्रक्रिया झाली तिसऱ्या दिवशी जेव्हा वरचे बँडेज काढले तेव्हा डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तिने आहिस्ते आहिस्ते डोळे उघडताना डॉक्टर म्हणाले मॅडम तुम्हाला प्रथम कोणाला पाहायचे आहे? तेव्हा तिने शरदचे नाव घेतले. डोळ्यात व्हीजन आले. तिने शरदला प्रथम प्रत्यक्ष पाहिले आनंद झाला दोघांनाही. मग पुन्हा डोळे बंद केले गेले. चार दिवसांनी डॉक्टरांनी तिला काळा चष्मा दिला व महिनाभर काळजी घ्यायला सांगितली. दुसऱ्या डोळ्याचे ऑपरेशन चार महिन्यानंतर करायचे आहे हेही सूचित केले. हॉस्पिटल मधून ते घरी आले.

सोनी आता तुला खूप जपावे लागेल, औषधे वेळच्या वेळी घालावे लागेल, उष्ण गोष्टी पासून दूर राहावे लागेल, कायम एसीमध्ये राहावे लागेल व हा काळा चष्मा डॉक्टर सांगत नाही तोवर काढायचा नाही. सोनीने त्याप्रमाणे राहायला सुरुवात केली. त्याचा परिणाम ही छान होत होता. हॉस्पिटलमध्ये जेव्हा ते चेकिंगला गेले तेव्हा डॉक्टरांनी सांगितले डॉक्टर म्हणाले, "मॅडम

सोनी! You are lucky ! This type of operation is very risky! But God bless you and keep you happily! Doctor.

आज शरद आणि सोनी ही खूप आनंदात होते. घरी आल्यावर शरदने त्याच्या आई-बाबांना आणि सोनीच्या आई-बाबांना ही गोड बातमी दिली. सर्वांना आनंद झाला पण शरदच्या आई-बाबांना आपण जो विरोध केला लग्नाला त्याचे खूप वाईट वाटले आणि दुसऱ्या दिवशी ते सोनीच्या आई-बाबांच्या घरी गेले लग्न झाल्यापासून त्यांचा एकमेकांशी संपर्क नव्हता. त्यांनी आल्या आल्या, "आम्हाला क्षमा करा, आम्ही स्वार्थी निघालो, तुमचे आणि तुमच्या मुलीचे दुःख आम्ही नाही ओळखू शकलो, आम्हाला समजून घ्या !" दोघे

"नाही! नाही! आम्ही, तुम्हीही झालेल्या गोष्टी भूतकाळाच्या गर्भात ढकलून सारे विसरायला हवे. क्षमा कशाची मागता, कदाचित तुमच्या जागी मी असतो तर! आम्हीही असेच वागलो असतो. शरदचा भुलेश्वरावर मोठा विश्वास तेव्हा, देवळात जाऊन प्रार्थना करा त्यांच्या सुखी संसारासाठी! आम्हीही येऊ ! सोनिचे आई-वडील.

दोन्ही कुटुंबातले धूसर वातावरण निवळले होते. दुसऱ्या दिवशी सर्वांनी भुलेश्वराचे दर्शन घेतले व त्याच्या सुखी संसारासाठी आशीर्वाद मागितले. त्या दिवशी प्रथमच सोनीचे आईवडील शरदच्या घरी गेले. जेवणाची वेळ झाली होती. पण त्यानी नकार दिला.

"आम्ही मुलीचे पालक, जोपर्यंत तीला एक अपत्य होत नाही, तोवर आपणाकडे जेवण उचीत नाही!" सोनींचे बाबा.

“ठीक! लौकरच तुमची इच्छा पूर्ण होवो!” शरदचे बाबा आणि ते आपल्या घरी गेले.

यथावकाश सोनिच्या दुसऱ्या डोळ्याचेही ऑपरेशन झाले आणि तिच्या डोळ्यात उत्तम व्हिजन आले. शरद गेली १० वर्षे लंडन मध्ये रहात होता त्याला ब्रिटनचे नागरिकत्व मिळाले होते. म्हणून सोनीलाही मिळणार हे नक्की.

हा सोनीचा काळोखातून उजेडाकडे प्रवास सफल संपूर्ण झाला याचे सगळे श्रेय शरदला द्यायला हवे. त्याची निर्णय प्रक्रिया, सोनीवरचे निखळ प्रेम आणि तिच्यासाठी लंडन मधे कल्पकतेने घेतलेले निर्णय आणि त्याने तीची केलेली सेवा सारे काही फळाला आले आणि एक जीवन आनंद आणि पाने फुलाने साकार झाले हेच खरे !!

# पडसाद मातृ प्रेमाचे

“ए! थांबा रे! कोणाचा सत्कार करताय! माझ्या पोराचा! छे! हा माझा पोरगा असूच शकत नाही! कशासाठी याचा सत्कार ? आपल्या आईला विसरला, या मातीशी बेईमान झाला म्हणून! अरे! हा उगवला या गावात वीस वर्षांनी, ह्याला विचारा, आपली आई जिवंत आहे का मेली ती? अशा बेईमान माणसाचा सत्कार या गावात ? घ्या हाकलून त्याला, कसला सत्कार या बेईमान माणसाचा! याला माणूस तरी कसा म्हणायचा ! राधाबाई

आणि राधाबाई ने बसकण मारली स्टेजवरच! सगळा गोंधळ झाला जमलेल्या हजर गावकऱ्यांना हे काय चालले समजेना ही आली कुठून आणि म्हणे हा राधाबाईचा मुलगा? हि रावसाहेबांची आई? आणि हा कोण? म्हणे या गावचा सुपुत्र? या शाळेत होता काय? का नाही फिरकला गेल्या वीस वर्षात, हा लाख रुपये देतोय या पडीक शाळेला, तिच्या दुरुस्तीसाठी, कुणाचे पैसे, आपले, याच्या खिशातले की सरकारचे, हा म्हणे ग्राम विकास मंत्री? सारेच चाट

दोन-चार लोक धावले आणि राधाबाईला सावरीत स्टेजवरून खाली घेऊन आले. कोणीतरी पाणी दिले तिला. तरी ती शांत होत नव्हती. थरथरत होते अंग तीचे.... आणि तिला चक्कर आली लोकांनी तिला उचलून घरी आणले. एकटी आणि एकटीच राहत होती ती. या गावातल्या शाळेच्या बाजूच्या एका जुनाट कौलारू घरात. ती ग्लानितून बाहेर आली.....

“बाबांनो! याचा पैसा या शाळेला नका घेऊ! हवे तर माझे दोन एकराचे वावर विका. मला मेलीला आता याचा उपयोग काय? मी नाही करणार ते, विक ती आणि घ्या ते शाळेला. या बेईमान मुलाच्या पैशाने शाळेचा उद्धार? छा! त्यापेक्षा भीक मागा गावात घरोघर आणि करा दुरुस्ती शाळेची! हे बेणे सापडले कोठे तुम्हाला? राधाबाई.

सत्काराचा विचका झाला होता. लोक पांगले. सरपंच एक लाखाचा चेक घेऊन नाचत होता शाळेच्या पटांगणावर, पण माणसं नव्हती पहायला ती. आणि रावसाहेब? तो आपल्या गाडीत जाऊन बसलेला.

लोकांना अनेक प्रश्न पडलेले. अहो हा आपल्या गावचा सुपुत्र ? नाव काय याचे, या गावात होता. या शाळेत शिकला? कोणाचा पोरगा? या राधाबाईचा? नाही विश्वास बसत. अहो कुठे मेला होता हा इतके दिवस, पंचवीस तीस वर्षे हा या गावात नव्हता नी, आत्ताच उपटला कोठून, कशासाठी आलाय येथे, सगळे लोक चक्रावले होते.

रावसाहेब अजून गाडीतच होता. तो, त्याची बायको, पोरगा तेही तसेच गप्प होते आणि रावसाहेबांच्या डोळयातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या न थांबता.

एकाएकी तो गाडीतन उतरला, डोळे पुसले त्यांने, बॉडीगार्ड, मागच्या दोन गाड्यातले पार्टीचे लोकही चक्रावले. तो तरा तरा चालत निघाला बिन चपलाचा. शाळेजवळ आला, आठवले त्याला ती शाळा 25 वर्षांपूर्वी. तो या शाळेत शिकत होता. सातवी झाल्यावर गाव सोडले नी गाठले नागपूर बापाकडे... पुढे त्याला काहीच आठवेना. बाप गेला आणि एकटा पडला आणि

कोणीतरी त्याला अनाथ आश्रमात आणून सोडला. सारे सारे विसरला तो मागचे त्या धक्क्याने आणि कायम रहिवासी झाला तो नागपूरचा.

एक वयोवृद्ध शिक्षक त्या गावातले आबासाहेब साळुंखे, आता वय 82 वर्षे, त्या शाळेत हेडमास्तर होते आणि निवृत्तीनंतर गावातच स्थायिक.

“अरे! हा शंकऱ्या काय रे?” आप्पा

“कोण शंकऱ्या? गाववाला

अरे तो शंकऱ्या साळुंखे!” आप्पा

“या रावसाहेबाचे नाव शंकर साळुंखे? दुसरा गाववाला.

“हो! हाच तो शंकऱ्या! शंकर साळुंखे! राजा साळुंखेचा पोरगा ! आप्पा

आणि सगळा उलगडा होत गेला. शाळेच्या बाजूला त्याचे घर होते. त्याची आई राधाबाई! एकटाच, भावंडे नव्हती, अरे हा विसरला कसा आपल्या आईला, गावाला, या मातीला, बुद्धी भ्रष्ट झाली का याची, इतका विसर पडावा? लोक काय काय बोलत होते. हा आपल्या गावचा... या मिरवाड्याचा? नाही विश्वास बसत! कुठे होता इतके दिवस आणि आत्ताच याला गावची आठवण कशी आली? कोणी आणला याला येथे? सारे ऐकले रावसाहेबांने.... तो शाळेतून परत गाडी पर्यंत आला.

“ये! सुमित्रा, राजू खाली उतरा, या माझ्या मागो माग!” रावसाहेब

“का? कशासाठी, कोठे नेताय आम्हाला, काय चाललंय ? वेड बीड नाही ना लागले यांना,” सुमित्रा

ते सगळे खाली उतरले!

“अहो त्या राधाबाईचे घर कुठे आहे? रावसाहेब....

एक गाववाला पुढे आला...

चला! दाखवतो तुम्हाला! गाववाला

आता राधाबाई शाळेजवळ नव्हती राहत. दूर वासन पाड्यात सरकारने बांधून दिलेल्या खोपटात. ते तिघे त्या खोपटा जवळ आले. आदिवासी भाग तो. गरीब कष्टाळू लोकांचे गाव, मोरवाडा, ठाणे जिल्ह्यातले. सगळा परिसरच आदिवासींचा. काही फरक नाही स्वातंत्र्यानंतर तसाच आणि तसाच. रावसाहेबाला हळूहळू सगळे आठवू लागले. ती केरव्याच्या भिंतीची शाळा, आता पडीक...

त्या झोपडीचा दरवाजा बंद होता. रावसाहेबांनी आजूबाजूला पाहिले... लोक जमा होत होते. त्या सफेद कपड्यातल्या बावाला पाहायला.

“काय काम हाय?” एक गाववाला

“राधाबाईना भेटायचे आहे!” रावसाहेब

“आपण कोण?” एक गाववाला

एवढ्यात एक म्हातारी समोर आली... त्याची चुलती

“अरे! शंकऱ्या तू!”

“हो काकू! मी शंकऱ्याच!”

किती वर्षांनी पाहते तुला ! एवढासा होतास, अरे मांडीवर खेळलास आमच्या, नी कुठे हरवला होतास ?” म्हातारी

तो वाकला तिला नमस्कार करायला, मग बायको, मुलगाही...

तिने दरवाज्याची कडी वाजवली पण बऱ्याच वेळा आवाज येईना पण दरवाजा आतून बंद होता.

अग ये! राधे! मी गुणी आलेय, दार उघड! बघा कोण आलेयत भेटायला तुला! गुणी

“कोण आहे? राधा

“अग तुझा शंकऱ्या!” गुणा

मला नाही कोणाला भेटायचे! जायला सांग त्याला कोण तो माझा कोणीही नाही! माझा शंकऱ्या मेला.... नाही उघडत दरवाजा.... त्याला जायला सांग! राधा

“अगं! उघड दार! लेकरू तुझेच हाय, अशी रागावलीस का ? आपल्या लेकरावर नसतं असं रागवायचं! अगं तुझी सून मी नातू पण आलाय! गुणी

हे म्हटल्यावर म्हातारी द्रवली... आणि दरवाजा उघडला. नातू पुढे झाला आजीला नमस्कार केला. राधाने त्याला कवटाळले. मुके घेतले त्याचे.

“बावा! तुझे नाव काय?” राधा

“राजू! राजेंद्र!” मुलगा

“असाच अगदी असाच होता माझा शंकऱ्या, हाच तोंडवळा!” राधा

एवढ्यात रावसाहेब आणि बायकोने तिला नमस्कार केला...

औक्षवंत व्हा! राधा... राजू! ये बावा, आत ये! राधा

राजू खोपटात आला... अजून रावसाहेब, सुमित्रा बाहेरच उभे होते...

“आई आम्ही यायचे का आत ?” रावसाहेब

“या! पण आई म्हणू नकोस! तू काय बुज ठेवलीस आईची? आई म्हणायचं तुला अधिकार नाही!” राधा

एवढ्यात सुमित्राने तिचे पाय धरले ! बाहेर बॉडीगार्ड, पोलीस, ग्राम विकास अधिकारी उभे होते.

“बाय! मी तुझ्यावर नाही नाराज...! तू कुठली कोण? नाही माहित... पण हा नातू माझा हाय! असाच तोंडावळा होता शंकराचा !” राधाबाई

आणि रावसाहेबांनी पुन्हा आईचे पाय धरले.

“ठीक! उठ! गेल्या 30 वर्षात फिरकला नाहीस! आई आहे की नाही याची चौकशी तरी केलीस का ? अरे जो विसरला आईला तो संपला! आपले गाव आहे हे! बालपण गेले येथे! आणि तेही तू विसरलास?” राधाबाई

कशी करू मी तुला क्षमा! मी कष्ट करून माझे पोट भरते आहे, शेती करते थोडी. भागते माझे त्यात! काय हवे म्हातारीला! फक्त दोन भाकऱ्या दिवसभराच्या... आणि प्रेम मुलांचे! बस एक दिवस नाही गेला तुझ्या आठवणी शिवाय! कसे दिवस गेले असतील माझे सांग? बाप तुझा गेला तेही मला समजले नाही. आत्ता समजते आहे तुझ्याकडून ! हे बघ असं ठसठशीत कुंकू लावते कपाळाला! राधाबाई

आणि तिने कपाळाचे कुंकू रावसाहेब समोर पुसून टाकले. हंबरडा फोडला तिने... मग सगळ्यांच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले... थोडा वेळ शांतता पसरली. रावसाहेबांनी आईला मिठी मारली.

“मला काही नको तुझे! नको पैसा काहीही! फक्त आधार हवा या म्हातारपणात.... बस!” राधाबाई

“होय आई! मी चुकलो, आता नाही! रावसाहेब

“थोडा वेळ बसा! मी भाकऱ्या घालते नी चण्याच्या पिठाचा पोळा. घासभर खाऊन जाऊ दे माझ्या सुनेला, नातवाला आणि तुम्ही खा. तीस वर्षांनंतर तुझ्या आईच्या हातची भाकरी !” राधा

आणि ती कामाला लागली. लाकडी काठवटीत तिने पीठ भिजवले... भराभर भाकऱ्या घातल्या. आणि दुसऱ्या निंबरावर पिठलं ठेवलं. पोटभर जेवले सगळे. ते गाडी जवळ आले. राधाबाई पण त्यांना पोहोचवायला आली होती.

“पप्पा! आपण आजीला नेऊया का आपल्यासोबत!” नातू

“नाही रे बाळा ती येणार नाही, ज्या मातीने मला वाढवले जगवले माझा शेवटचा श्वास ही येथे घेणार नाही ! इथल्या या भूमीची नाळ मला सोडायची नाही. तुम्ही जावा!” राधा

आणि रावसाहेबाकडे पहात म्हणाली “तुला जर काय करावेसे वाटले तरी शाळा नव्याने बांध. पोरे पावसात भिजत आहेत नाही बघवत त्यांचे हाल मला. आमच्या पाण्याचा प्रश्न अनेक वर्षे तसाच आहे तो सोडव, झाले तर एक

पाझर तलाव या खालच्या पऱ्या वर बांध. पण हे सारे माझे डोळे मिटायच्या आधी! काय समजले!" राधा

"होय आई!" रावसाहेब

आणि त्याने आईचे पाय धरले.

तूझी आण, मी वर्षभरात या कामाला सुरुवात करतो आहे! रावसाहेब

आणि ती मंडळी धुरळा उडवीत निघून गेली. आणि त्या धुळयात राधाबाई ची स्वप्न साकार झालेली ही पहात होती, शाळा आणि पाझर तलाव.

दिवाळीला रावसाहेब सहकुटुंब पुन्हा गावात आला आणि त्याच काळात त्यांनी आईच्या हस्ते शाळा आणि पाझर तलावाची भूमिपूजन केले. इतकी वर्षे प्रलंबित दोन्ही प्रश्न कसे काय मार्गी लागले याचे गावकऱ्यांना आश्चर्य वाटले. तिसरी गोष्ट म्हणजे लोकांना सरकारने बांधून दिलेली घरे आता कौलारू झाली. भिंती कारव्या ऐवजी विटांच्या झाल्या. आणि चकाचक लादी लावण्यात आली. चार महिन्यात शाळेची इमारत तयार झाली. आणि 26 जानेवारीला उद्घाटन होऊन नव्या शाळेत मुले बसली. त्यांना पाण्यासाठी एक बोरिंग ही पाडण्यात आले. पाझर तलावाचे काम दीड वर्ष तरी चालणार होते. पण वर कच्चा बंधारा बांधून पाणी अडवण्यात आले. गावाचा कायापालट होत होता. नवनव्या गोष्टी गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून करण्याचे ठरवून कामाला सुरुवात झाली. समाज मंदिराचे काम झाले. ग्रामपंचायत ऑफिस सरपंचाच्या घरून नव्या इमारतीत आले आणि आरोग्य केंद्रही झाले.

हा सगळा चमत्कार झाला तो राधाबाई मुळे. गावाने या गावात होणाऱ्या पाझर तलावाला 'राधानगरी धरण' असे नावही देऊन टाकले. धरण पूर्ण झाले, मुबलक पाणी, विहिरींचे पाणी वाढले. नळाने घरोघर पाणी पोहोचले. गावाचा खऱ्या अर्थाने विकास झाला तो राधाबाईंच्या दणक्याने.

धरणाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री आले होते. राधाबाई थकल्या होत्या तरी त्यांना डोलीतून आणण्यात आले. राधाबाईंचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला आणि त्याच रात्री राधाबाईने शेवटचा श्वास घेतला. त्यावेळी रावसाहेब आणि कुटुंबीय हजर होते.

गावातल्या लोकांनी राधाबाई चा पुतळा शाळेच्या आवारात उभारण्याचे ठरवले आणि सहा महिन्यात ते काम पूर्ण झाले. गावात हायस्कूल नव्हते, रावसाहेबांनी आपली दोन एकर जमीन हायस्कूलसाठी दिली आणि सरकारी खर्चाने शाळा उभी राहिली. त्या शाळेलाही 'राधाबाई हायस्कूल' असे नाव देण्यात आले.

हा सारा चमत्कार झाला तो रावसाहेबांच्या आईच्या 'मातृप्रेमामुळे' एवढे मात्र खरे. ओसाड गावाचे एक सुख सोयीने गाव सजले. हे फक्त आणि फक्त मातृप्रेमामुळे!

पूर्वी त्याच्या सत्काराच्या दिवशी राधाबाईने केलेला अकाउंट तांडवामुळेच हे मात्र गाव विसरला नाही!!

मातृप्रेमात केवढी ताकद असते हे गावाने अनुभवले, आणि गावाचे नंदनवन झाले. एक आदर्श गाव म्हणून सरकारने स्वतः होऊन अनेक योजना

रबविल्या. हातांना काम मिळाले, रास्ते झाले. कधीतरी एसटीची गाडी गावात येऊ लागली. आदिवाशी गांव, पण शाळा झाल्या, कॉलेज झाले. पोरे शिकून इंजिनियर, डॉक्टर झाली, महिलांनी सरकारी योजना राबविल्या. पैसा खेळू लागला गावातल्या घरा घरात.

हे सारे घडले राधाबाईच्या मातृप्रेमामुळे. एवढे मात्र खरे !!

# लिओ

आज त्याचा पहिला वाढदिवस, गेल्या वर्षभरातल्या आठवणी, मनाच्या कोपऱ्यात आपण जपत आलो. त्याचे पडसाद पापण्या आडून डोकावत राहतात, त्याच्या सहवासाचे पापुद्रे, जेव्हा काढीत राहतो आपण.

चाळीस दिवसांचे ते इवले ते बाळ पिंजऱ्यातून कोल्हापूर मुंबई प्रवास करून ट्रकातून आले. आणि त्याच्या आशाळभूत नजरेतून शोधत होते आपल्या आईला, पण पुढे बीलागले आम्हाला आणि झाले आमचे. मायेची उब त्याला मिळाली, सुखावले ते आणि पहिला आवाज त्याला मनाला काळजाला आरपार भेदून गेला. गाईच्या दुधावर आपली भूक तहान भागवीत.

अजूनही आठवते त्याची टकमक नजर न्याहाळीत होती, घर आमचे, माणसे, मुले. आणि ओळख करून घेत चाटीत हाताचे तळवे, निरागसपणे, प्रेमाच्या शोधात. आम्ही अनभिज्ञ, त्याची आई व्हायची म्हणजे काय करायचे आपण ? तो सांगत होता त्याच्या नजरेच्या आशाळभूत कंगोऱ्यातून, अंगा खांद्यावर खेळत आमच्या आमचा, होत आम्हाला अडकवित, त्याच्या माया जाळात, खेळत, बागडत, लोभसपणे.

तो पहिलाच अनुभव आमचा, आणि त्याचाही माणसाळलेला, लिओ त्याचे नांव ठेवले, त्याला नव्हते ते कळत, पण ते नावच निघत होते आमच्या तनात, मनात सामावून घेत त्याला आमच्या काळजाचा तुकडा होत. त्याच्या आवाजाचा अर्थ नव्हता कळत आम्हाला. याला काय सांगायचे आहे ? काय

हवे आहे, हा आमचा पहिलाच अनुभव होता. काहीतरी काय बरेच त्याला सांगायचे असे आम्हाला, पण काय ? याचे गणित नव्हते सुटत. जर्मन शेफर्ड जातीचा तो प्रेमळ प्राणी पूर्वजन्मीचे काहीतरी सुकृत घेऊन आमच्या आसऱ्याला आला आणि आमचा केव्हा झाला आम्हालाच नाही समजले, सारे घरच त्याच्या मागून फिरे भिंगरी सारखे.

एक दिवस एक बाड येऊन ठेपले आमच्या घरी, त्यांच्या जन्माची तारीख, आई वडील आणि त्याची अजून पाच पिढ्यांची वंशावळ. हे सारे नव्हते आम्हाला माहित. पण आता त्याचे सारे पत्ते उघड झाले. त्याची रजिस्ट्रेशन झाले. नाव आम्ही एकमताने लिओ ठेवले, आणि सरकार दरबारी तो नोंदणीकृत झाला. काय बडे जाऊ त्याचा सांगू, त्याला पंधरा दिवसांनी डॉक्टर येऊन चेक करीत, त्याचे खाणे, पिणे, औषधे, इंजेक्शन, यांच्याबरोबर त्याची शि,शुची व्यवस्था त्याचे ट्रेनिंग सुरू झाले. आणि ते लाजरे बुजरे बाळ आता शहाणे व्हायला लागले. आणि तना मनाने आमचे झाले. कुटुंबातला एक सदस्य म्हणून आता या पाच जणांच्या कुटुंबातले ते सोनुले बाळ, पुऱ्या घरभर दुडूदुडू लागले, आणि पुऱ्या घराला शिस्तही लावली त्याने. त्याचे शेड्यूल्ड सगळयांना पाठ झाले.

पहिले तीन महिने ते वेडे बाळ सारे काही बाहेरच करी, पण सारे जण ते प्रेमाने करीत अगदी आपले बाळ असे समजून जसजशी त्याची ट्रेनिंग होत गेली तो शहाणा होत गेला. अमुलाग्र बदलला तो, बाळसे घेतले, गुटगुटीत होत गेले, मस्ती वाढली, त्याला सतत खेळायला हवेसे वाटे कोणीतरी अगदी दमेपर्यंत, आणि मग त्याचे निवांतपणे झोपणे.

आता त्याचा आवाजही फुटला होता. भुंकण्याच्या त्याच्या लकीबी, माणसाला ओळखण्याची त्याची शोधक बुद्धी शार्पनेस होती त्या त्याच्या वागण्यात. वाढत गेला. आपला कोण, परका कोण? याची जाण त्याला चांगली आली. आता तर ते शहाणे बाळ झाले होते. वर्षभरानंतर मी गावावरून आलो तर त्याने मला ओळखले. पापी घ्यायला आला आणि मग माझे पाय चाटत पायाशी बसला. ना भुंकणे ना अंगावर येणे पण माझी पत्नी दोन वर्षांनी गावावरून आली तर ती त्याच्या ओळखीची नव्हती, पण जेव्हा लिओला घेऊन मुले गावाला आली होती त्या कोकणातल्या खुल्या वातावरणात खुश होता. ऐसपैस जागा हुंदडायला, खेळायला मग काय टूर लागल्यासारखा तो खुश होता. माझ्या मुलाची मर्सिडीज आली गावाला त्याला घेऊन. दरवाजा उघडला की टूनकन मधल्या सीटवर तो बसे. त्या जागेवर त्याच्यासाठी एक आसन अंथरले होते. बेटा खुश. तो त्याचा मुंबई चिपळूणचा तीनशे किलोमीटरचा पहिलाच प्रवास. त्याला उलटी सारखे वाटले एक गोळी दिली, मग तो ताणून झोपला मुलांच्या मांडीवर प्रवास संपे पावत. मुंबईतल्या घरापेक्षा त्याला गावचा बंगला आणि परिसर आवडला होता. त्याच्या सहवासात चार दिवस मजेत गेले.

कधी कधी कुटुंबीयांना काही कार्यक्रमाला वा पिकनिकला जायचे असते तेव्हा आमचे कुटुंबीय त्याला डे केअर मध्ये ठेवतात. एकदा दोन महिन्यासाठी ठेवण्याची वेळ आली कारण घराचे इंटिरियर चालू होते आणि दुसरा फ्लॅट त्याच्यासाठी सूटेबल नव्हता. तर बेट्याला दर रविवारी सगळे कुटुंबीय भेटायला जाई. अर्धा तास भेटीच्या कार्यक्रमात खेळ होत. त्यांना

आलेले पाहताच प्रचंड वेगाने येऊन सगळ्यांना बिलगे, आणि जेव्हा निघण्याची वेळ येई आमच्यासह त्याच्याही डोळ्यात करुणा पहायला मिळायची.

आणखी एका ठिकाणी एक दिवसासाठी ठेवण्याची वेळ आली जेव्हा भाऊबीजेला 20/20 लोक आले होते खूप वाईट वागणूक दिली त्यांनी. घरी निघताना प्रचंड दंगा केला त्यांनी आणि त्या डे केअर कडे न बघताच निघून आला. प्रचंड रागावला होता. अहो त्या लोकांनी त्याला पिंजऱ्यात बंद करून ठेवला होता. आता बोला हे काय वेडे प्राणी आहेत ? जगात कुत्रा आणि घोडा यांना सातवा सेन्स असतो असे म्हणतात, त्याची प्रचिती राव मिनिटा मिनिटाला येते आम्हाला. खाली माझ्या मुलाची गाडी आली रे आली की तो दरवाज्यात जाऊन बसतो. त्याची वाट पाहत आणि तो आला की भेटण्याचा कार्यक्रम, मग दहा मिनिटे खेळायचा कार्यक्रम, मग बेटा दमतो आणि शांतपणे पडून राहतो.

आमच्या लिओला तीन वेळा दिवसातून खाली शिशुला न्यावे लागते. सकाळी सहा वाजता, दुपारी, संध्याकाळी आणि रात्री सगळेच जण जपतात जीवापाड त्या छकुल्याला.

एक गोष्ट सांगावीशी वाटते हे बाळ खूप हुशार आणि शहाणे असते, माणसाच्या मनातले अंतरंग. येणारी व्यक्ती पारदर्शक मनाची, की काही स्वार्थ, कलुशीत विचारधारेचे, हे कळते त्याला. जगात दोनच प्राण्यांना 'सातवा' सेन्स असतो. एक कुत्र्याला आणि दुसरा घोड्याला एवढे मात्र खरे. आपल्या मालकाला, घरातल्या मुलांना, म्हाताऱ्यांना, आणि इतर सगळ्यांच्या सुरक्षेचा राखणदार असतो तो हे सांगायला नको.

मी असे वाचले आहे की आणि अनुभवलेय, ज्याचा स्पर्श, वास त्याने घेतला, त्याला तो कधीच नाही विसरत. त्याच्या मेमरीची मर्यादा अमर्याद असते. एक किलोमीटर वरून जाणाऱ्या व्यक्तीच्या माग तो घेऊ शकतो, म्हणूनच युद्धात सैनिकांना, पोलिसांना गुन्हेगार शोधण्यात त्याची मदत होते. कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली कोणी काढला गेला माणूस तर त्याला कळतो आधी.

एक आठवण सांगतो, माझे एक मित्र आमच्या कार्यालयात माझ्या सोबत अधिकारी होते त्यांच्या घरी असाच एक कुत्रा होता. त्यांची बदली झाली जयपूरला. त्याला तेथे नेणे शक्य नव्हते. घरी आई वडील वृद्ध. त्याची कोण निगा राखणार, शेवटी आम्ही मुंबईच्या संजय गांधी उद्यानातील आमच्या एका मित्राकडे त्याला सोपवले. त्यावेळी तो चार वर्षाचा होता. आणि वर्षभरात ते आमचे मित्रही निवृत्त झाले. यांचे काय करावे हे त्यांना कळेना, आमच्याशी संपर्क होईना, म्हणून नाईलाजाने त्यांनी तो रॉकी (त्याचे नाव) एका पारशी बाईला विकला. तीन वर्षांनी आमचे मित्रही निवृत्त झाले. त्यांना रॉकी ची आठवण झाली, कारण त्यांना तो त्यांच्या पनवेलच्या फार्म हाऊस वर हवा होता. राखणदार म्हणून. आम्ही त्या पारशी बाईच्या पत्त्यावर गेलो. आम्ही आलो आहोत व दरवाजा बाहेर उभे आहोत हे रॉकीला समजले. तो घरात बेचैन झाला. त्या बाईने समजेना की तो असा का वागतो आहे, आम्ही दरवाज्यावरची बेल वाजवली त्यांनी दरवाजा उघडला. तेव्हा त्याला बांधून ठेवले होते आणि रॉकी साखळीला हचके देत होता. आम्ही कशासाठी आलो आहोत ते त्या बाईंना सांगितले आणि रॉकीला सोडायला सांगितले.

सुटताच तो आमच्या मित्रांच्या गळयात पडला. पाय चाटले आणि त्यांच्या दोन पायांच्या मध्ये बसला.

“साहेब! तुमचे येण्याचे कारण” बाई

“मी रॉकीला न्यायला आलो आहे!” साहेब

“अहो मी विकत घेतला आहे, गेली तीन वर्षे तो आमच्याकडे आहे! आमचा झाला आहे!” बाई

“बरोबर! मला मान्य आहे! तो तुमचाच आहे! हेही समजतो आम्ही, पण त्याचा मालक कोणीही नसतो, तो आजाद पंछी असतो, ज्याच्यावर त्याचे प्रेम आहे त्याचा तो मालक!” साहेब

“मग?” बाई

“मी त्याला न्यायला आलो आहे!” साहेब

“पण तो माझा आहे!” ती

“मान्य आहे! मी त्याला लहानाचा मोठा केला, हे खरे ना?” साहेब

“असेल! मग?” बाई

“तुम्ही असे करा! जर रॉकी आमच्याबरोबर नाही आला तर तुमचा. पण जर तो आमच्याबरोबर निघाला, तर आम्ही घेऊन जाऊ!” साहेब

“ठिक आहे!”

आम्ही उठलो, तर तो बेटा उघड्या दरवाजातून जिन्याने आमच्या पुढे उतरला. आमच्या गाडीत टुणकन बसला. आम्ही गाडीत बसलो. त्या बाई गाडी पर्यंत आल्या होत्या. का कोण जाणे रॉकी गाडीतून उतरला, त्या बाईंना भेटला आणि त्यांचा निरोप घेऊन पुन्हा गाडीत येऊन बसला. त्या पारशी बाईचे डोळेही

पाणवले होते आणि रॉकीचेही. आणि त्याने माझ्या मित्रांना आवाज दिला आम्ही निघालो तो राजासारखा पुढच्या सीटवर बसला होता. पार्ल्याला आल्यावर सरळ त्यांच्या घरात घुसला, भेटला सगळ्यांना आणि विसावला.

तर हे सांगण्याचे कारण त्यांची मानसिकता, प्रेम, आठवण, ओळख, सारे काही.

तर परवा लिओचा पहिला वाढदिवस साजरा झाला. केक आणले, त्याला नवे कपडे आणले, टोपी घातली, बेटा खुश. हुरळून गेला होता या नव्या अनुभवाने आणि आम्हीही. आता अनेक वर्षे तो आम्हाला साथ देणार आहे. गाडीत त्याला अक्की एक सीट लागते म्हणून नवी गाडी ही बुक केली या लाडक्या बाळासाठी!!

पूर्वी लिओच्या गळयात साखळी असायची. आता तर तो घरात मोकळाच असतो. दोन्ही बेडरूम हॉल आता त्याच्या नावावर केले आहे. त्याच्या भुंकण्यातून त्याला काय म्हणायचे आहे हेही समजते आम्हाला, आणि नखरेही वाढत चालले आहेत वाढत्या वयाबरोबर, एवढे मात्र खरे.

परवा माझी सून मला म्हणाली की आता लिओळ सगळ्या ऑर्डर समजतात. इंग्रजी, मराठी शिवाय प्रेमाने बोललेले, रागावलेले सारे. कधी रागावलो तर गप्प बसतो, पण थोडाच वेळ बेटा येतो लाडात आणि राग ओसरतो आमचा क्षणात.

लिओच्या प्रेमाची जादू औरच आहे. कधी कधी वाटते, आमच्याच पूर्वजांचा पुनर्जन्म होऊन आमच्यात आलाय. हाय की नाही मजा !!

# धुमारे

वेळ दुपारची होती. बारा वाजले की शरद राव आपल्या नातवाला घेऊन शाळेच्या गाडीला सोडत असत गेली दोन वर्षे. त्यांचा नातू आता चौथीला होता. आणि आज शाळेचा पहिलाच दिवस होता. जूनची सात तारीख होती.

त्यावेळी आम्ही राहात होतो एकता भूमीमध्ये. जवळचा रस्ता ओलांडून ते नातवाला त्याच्या शाळेच्या गाडीत सोडायला आले बरोबर बारा वाजता.

सगळीच मुले दाटी-वटीने उभी होती. रस्त्यावर खूपच गर्दी होती आज पहिला दिवस असूनही शाळेची गाडी उशिरा आली म्हणे बारा वाजून वीस मिनिटाने. खरे तर ती बारा पाचला यायची.

शाळेचा पहिला दिवस असल्याने सगळेच पालक मुलांना सोडायला आले होते. त्यात शरदरावही होते. काही जुने चेहरे त्यांच्या ओळखीचे होते. पण एक अनोळखी चेहरा आज त्यांच्या नजरेला पडला आणि ते चमकले. ती आपल्या नातवाला सोडायला आली होती. गाडीत चढण्यापूर्वी तिने आपल्या नातवाच्या चेहऱ्यावरून हात फिरवला आणि त्याचा छानसा पापा घेतला. शरद राव तिला कुतूहलाने पाहत होते. हा चेहरा आपण कुठेतरी पाहिला आहे. फार फार वर्षांपूर्वी असे त्यांना जाणवले. त्यांची उत्सुकता पार चढाला गेली होती. ती तीच असावी का? तिच्यासारखीच, अगदी तिच्यासारखीच....! ती निघून गेली...! ती त्यांच्याच कॉम्प्लेक्स मध्ये जाताना त्यांनी पाहिले... आणि शरद राव हरवले ते त्यांच्या गत स्मृतीत...

ती तीच होती एवढे मात्र खरे. तीच ती. आपल्या वर्गातली ती, आवडणारी शमा! गेल्या पन्नास वर्षात कोठे दिसली नाही, शाळा सुटल्यावर तसा योग कधीच आला नाही शाळा संपली आणि सगळयात मुलांचे मार्ग वेगळे झाले.

तिला शोधण्याचा प्रयत्न शरदरावांनी केला. पण ते कुटुंब मुंबई सोडून कोल्हापूरला गेल्याचे त्यांना समजले आणि ती उरली ती त्यांच्या मनात तिची. आठवण दररोज यायची त्यांना तिची, प्रेम काय म्हणतात त्याची लागण त्याला झाल्याची, जाणीव प्रकर्षाने झाली आहे, हे त्यांच्या लक्षात आले त्यांची बेचैनी वाढली.... आणि आजही ती तशीच आहे म्हणजे शरद तिच्या प्रेमात पडला होता. हेच खरे. तो काळ वेगळा होता, मुले मुलीं जवळ फारशी बोलत नसत ना मुली मुलांजवळ. फार तर आपल्या वर्गातल्या मुलांची संवाद होई, पण ती मात्र दुसऱ्याच तुकडीत होती येता, जाता दिसायची ती.... छान राहायची ती. कडक इस्त्रीचे कपडे, लहान बांधाच पण किती मोहक... आणि शरद त्यात अलगद अडकला.... आणि ती उरली मनात ती कायम..... अगदी आता वयाच्या सत्तरीतही.

आज तिला पाहिले आणि शरदची बेचैनी खूपच वाढली.... पण तो सुखावला की त्याच्याच कॉम्प्लेक्स मध्ये त्याने जाताना पाहिली. पुरा दिवस वर्षासारखा वाटत होता. रात्री झोपही लागली नाही. सगळी रात्र त्याने तळमळत काढली.

पुढचे दोन दिवस शनिवार, रविवार तेव्हा सुट्टी होती. दोन दिवसांची रजा म्हणून घर अगदी गजबजले होते, पण त्या भरल्या घरातही शरद अगदी बेचैन होता. कधी एकदाचा सोमवार येतो आणि ती दिसते असे त्याला झाले होते.

मग मात्र ती सोमवार ते शुक्रवार त्याला दिसायची. तो टक लावुन तिला पाहायचा, अगदी डोळयांनी पिऊन घेत होता असे म्हटले तर अतिशयोक्ती वाटू नये..... हा हा म्हणता सहा महिने होऊन गेले. ती दररोज येत असे आणि शरद तिला पहात होता पण आताही तिच्याशी काही बोलावे असे त्याला वाटत असून, पाऊल पुढे पडत नव्हते.

आणि एक दिवस त्या मुलाला शाळेत सोडायला एक मुलगी म्हणजे त्या मुलाची आई आली होती..... मध्ये दोन-तीन दिवस गेले शरदला रहावे ना त्याने त्या मुलीला विचारले, त्या आजीबाई दिसत नाहीत दोन-तीन दिवस!"

"हो त्या आजारी आहेत, हॉस्पिटलला ऍडमिट आहेत गेले २/३दिवस...." मुलगी

"का? काय झाले आहे !"

हार्टचा माईंड अटॅक येऊन गेला!" मुलगी

"आता कशा आहेत?"

"सेटलं आहे... पण अजून डिस्चार्ज नाही झाला, डॉक्टर म्हणाले अजून ८/१० दिवस त्यांना ठेवावे लागेल." मुलगी

"कोणत्या हॉस्पिटलला आहेत त्या!" शरद

"मुंबई हॉस्पिटलला!" मुलगी

पण आता ठीक आहेत ना?"

"हो! काळजीचे कारण नाही." मुलगी

"तुमच्या त्या कोण?" शरद

"आई!" मुलगी

"अच्छा! त्या कोठे राहतात?" शरद

"कोल्हापुरला!" मुलगी

"ठीक...

"मी मोठ्या काळजीत आहे! मला उद्या ऑफिसला जायचे आहे ! मुलाला सोडायला कोणी नाही! काय करावे काहीच कळत नाही!" मुलगी

"तुम्ही चिंता करू नका! तुमच्या मुलाला माझ्या घरी सोडा! मी काळजी घेईन ! तुम्ही निवांत राहा!" शरद

दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवारी शरद त्या मुलीबरोबर बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तिला पहायला गेला.... तिला पाहताच त्याने तिला हात केला, तिही हसली... त्यांच्या सोबत तिची मुलगी होती शारदा.... आज शरद थोडा रिलॅक्समध्ये होता... तिला. भेटून त्याला खूप बरे वाटले.

महिना झाला तरी डॉक्टरांनी तिला सोडले नाही आणि तेवढे दिवस शारदा मुलाला शरदकडे सोडत होती, संध्याकाळी घेऊन जात होती. आपण कोणाच्या तरी कामाला आलो अडचणीत, त्यात आपल्या या गोष्टीचे याचे शरदला खुपच अप्रूप वाटत होते.

“आज आईला सोडणार आहेत हॉस्पिटल मधून... पण काही दिवस तिला घराबाहेर पडता येणार नाही तेव्हा काका! अजून आठवड्या दोन आठवडे माझ्या मुलाची काळजी तुम्ही घ्याल ?”

“हो! का नाही ? तू निश्चिंत रहा!” शरद

“तुमच्या आई येथे राहणार आहेत की कोल्हापूरला जाणार आहेत?” शरद

“नाही ती आता येथेच कायम राहणार आहे ! आता तिचे वय झाले आहे. कोल्हापूरला आता कोणी नाही! तेव्हा ती येथेच राहणार आहे! माझ्याजवळ !” शारदा

“ठीक आहे! तू चिंता करू नको! मी काळजी घेईन तुझ्या मुलाची!” शरद

आणि एक दिवस 'ती ' नातवाला सोडायला शरद कडे आली....

“तुम्हाला कुठेतरी पाहिल्यासारखे वाटतेय?”

“बरोबर! आपण यापूर्वी म्हणजे खूप खूप वर्षांपूर्वी भेटलो आहोत... पण!” शरद

“पण काय ?” ती

“तुम्ही संध्याकाळी मुलाला न्यायला या तेव्हा बोलू.... आता मुलांना सोडायला मी जातो! संध्याकाळी मात्र नक्की या!” शरद

आणि शरद मुलांना गाडीला सोडून आला, पण संध्याकाळी शमा येणार त्या मुलाला न्यायला यासाठी तो बेचैन होता... त्याचा वेळ जात नव्हता.

संध्याकाळी सहा वाजता शरद मुलांना घेऊन घरी आला आणि 'ती ' आली

“ बसा! “ शरद

“तुम्ही एकटेच असता का येथे?” ती

“नाही! मी, माझा मुलगा, सून आणि नातू .” शरद

“तुमची पत्नी “ ती

“आता नाही ती....” शरद

“ओके!” ती

“तुम्हाला कुठेतरी पाहिले असे गेले सहा महिने मला वाटत होते...” ती

हो! मलाही!...तो

शरद तुम्ही आर एम भट शाळेत होतात का? ती

“हो! बरोबर तुम्ही आर एम भट होतात, 1966 च्या बॅचला ?” ती

“हो! तुम्ही त्याच बॅचला?... शरद

“हो!” ती

आणि थोडा वेळ शांतता पसरली.

“तुम्ही कॉफी घेणार का?” शरद

“हो!” ती

आणि शरदने छान कॉफी बनवली आणि ती पिता पिता सगळ्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शाळेतले दिवस, शिक्षक, सगळ्यांच्या आठवणींच्या उजळणीत एक तास केव्हा गेला ते समजले नाही. तोवर दोन्ही नातवंडे खेळत होती.

"तुम्ही काय करता?" ती

"मी एक लेखक आहे, माझी वीस-बावीस पुस्तके झाली - त्यात कादंबऱ्या, कथासंग्रह, कवितासंग्रह ही आहे..." शरद

"म्हणजे शरद कारखानिस आपणच का?" ती

" हो! मीच तो." शरद

"वा! छान! मी तुमच्या पुस्तकांची चाहती आहे. मला खूप भावतात आपल्या कथा आणि तुमची ' रसरंग ' ही कादंबरी तर मला खूपच आवडली." ती

छान...! तो

"एक लेखक कमी वाचक म्हणून आपण एकत्र आलो." शरद

"खूपच आनंद झाला, सध्या काय करताय?" ती

"मी माझे चरित्र लिहितोय!!" शरद

"वा! छान म्हणजे आता आपली शाळा शिक्षक सगळ्याचा यात उल्लेख असेल." ती

"हो! नक्कीच..." शरद

“खूप आवडेल वाचायला मला!” ती

“मी देईन कॉपी तुम्हाला.” शरद

“कधी!” ती

“अजून एक महिना लागेल...” शरद

“अच्छा! येते मी! खूप उशीर झालाय, शारदा ही आता येईल मला जायला हवे!” ती

“तब्येत कशी आहे?” शरद

“चांगली... काही काळजी नको.” ती

आणि ती नातवाला घेऊन निघून गेली. आज शरद अगदी हवेत तरंगत होता. त्याची प्रेयसी त्याला भेटली होती प्रत्यक्ष... संवाद झाला... आता ती येथेच राहणार आहे... हेही समजले... म्हणजे आता आपल्या भेटी होतील... मनाला विरंगुळा वाटेल...

शरद आज अगदी हवेत होता. खूप दिवसांनी मनावरचे दडपण आज उतरले होते. मनात तिच्याबद्दल प्रेमाचा अंकुर फुलला ती माझी प्रेयसी आज जवळ आली याचाच त्याला खूप आनंद झाला होता. हे अनपेक्षित होते.

ती भेटली आणि शरदचे मखमली जीवन आता नवनव्या धुमाऱ्यानी फुलून आले. कवितांना उसळी आली. नवनव्या कथांना उत्सव आला, नवी बहर आली. गतिमान जीवन झाले त्यांचे.

त्याने कविता केली

कोंब आले पत्थराला

संभ्रम ही संपला

जीवनाच्या चांदण्याला

मंद वारा झोंबला!

आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलणारा शरद आता छान कविता करू लागला होता. नी त्याचे जीवन अधिक सुसंगत झाले होते अगदी तरुण... धुमारे फुटल्यासारखे!!

आता सत्तरीकडे झुकताना मनाला हिरव्या पालवीचे कोण फुटले होते आणि त्यांच्या जीवनात सकाळचे कोवळे सोनेरी ऊन आता उत्साहाच्या लाटाने अगदी भरून ओसंडत होते. जगण्याला नवे कोवळे धुमारे फुटले होते... हिरव्यागार पालवीचे !!

# काडीमोड

रवी आणि शारदा यांचे एकमेकांवर जीवापाड प्रेम.

ते दोघेही पाटकर कॉलेजमध्ये शिकत असताना पासूनचे.

दोघेही दिसायला छान, एकमेकांना अनुरूप. हे प्रेमाचे गुऱ्हाळ तेव्हापासून चालू होते ते त्यांचे शिक्षण संपून नोकरी व्यवसायात स्थिर होईपर्यंत चालू होते.

त्यांना लग्नाच्या बंधनात बांधून घ्यावे असे वाटू लागले आणि शारदानेच यासाठी पुढाकार घेतला आणि प्रकरण त्यांच्या कुटुंबीयांच्या समोर ठेवले.

रवी हा डॉक्टर होऊन आपल्या प्रॅक्टिस मध्ये स्थिर होत होता तर शारदा ही टीसीएसला होती. इंजिनीयर झाली होती. एक वर्षांपूर्वी ती इंग्लंडला जाऊन आली होती आणि येथे येतात तिने याबाबत रवीला विचारले त्याने तात्काळ याला संमती दिली.

मामला आता दोन्ही कुटुंबाच्या संमतीने पुढे रेटला गेला होता. साखरपुडा करून घ्यावा व मे मध्ये लग्न करावे असे ठरले. नाहीतरी ठरवायचे काय होते, दोघांच्या संमतीने एकमेकांच्या प्रेमाला लग्नाचे मूर्त स्वरूप देणे एवढेच होते.

गेल्या जून मध्ये शारदा लंडन वरून आली आणि या गोष्टीला चालना मिळाली. ती तेथे वर्षभर होती पण एकमेकांशी संवाद चालूच होता. फोन व्हाट्सअप च्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण चालू होतीच. पण मधल्या एक वर्षाच्या काळात रवी मात्र शामाकडे थोडा झुकला होता. कारण शारदाचे येथे नसणे.

शामा ही त्यांच्याच वर्गात होती. सुंदर फटाकडी होती. ती एक उडता पक्षी अनेकांशी तिची मैत्री होती. सर्वांना हवी अशी वाटणारी आकर्षक व्यक्तिमत्व, नाटकात सिरीयल मध्ये काम करणारी. शामाने बीएससी करून पुण्याच्या ड्रामा इन्स्टिट्यूट मधून कोर्स केला होता. पाटकर कॉलेजने तिच्या नृत्याचा कार्यक्रम त्यांच्या गॅदरिंग मध्ये ठेवला होता, त्याला अनेक माजी विद्यार्थ्यांना निमंत्रित केले गेले होते. गॅदरिंग छान पार पडले आणि त्यात रवी शमा यांची भेट झाली. डॉक्टर असणाऱ्या रवी कडे शामा ओढली गेली. रवीचे शारदा वर प्रेम आहे अगदी कॉलेजमध्ये असल्यापासून हे तसेच जग जाणत होते. अगदी बारावीला असताना पासून. पण शामाची लुडबुड त्यात चालू होतीच. तिलाही रवी आवडत होता. अगदी मनापासून आणि त्या शारदा लंडनला गेल्यावर या प्रकरणाला ऊत आला होता.

या त्रिकोणात रवी रंगून गेला होता. इकडे शारदाशी त्याचे प्रकरण चालू होते आणि तिकडे शामा त्याला आपल्या जाळ्यात पकडून शारदा पासून दूर नेण्याच्या प्रयत्नात होती. शामा तशी खूपच आकर्षक सुंदर होती त्यात वाद नव्हता. तिचे सौंदर्य हेच तिचे भांडवल होते आणि रवी सारखा डॉक्टर तर आपल्याला मिळावा यासाठी ती त्याच्या मागेच होती गेले सहा महिने...

शारदा लंडनहून आली आणि रवीलाही तिची अडचण वाटू लागली होती. शारदा चे हे ध्यानात आले तेव्हा श्यामाचे हे प्रकरण तिला माहिती झाले की रवी आता पहिल्यासारखा नाही. तो बदललाय, अनेक बहाने करून तो शामालाही मध्ये भेटत होता, तिच्या नाटक सिनेमाच्या माध्यमांचे त्याला अधिक आकर्षण होते. त्यात शारदा चे लग्नाचे प्रपोजल त्याच्या घरच्यांपर्यंत पोहोचले होते. दोन्ही कुटुंबानी त्यांच्या प्रेमाचा शेवट लग्न बंधनात करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्या दृष्टीने त्यात प्रगती होऊन साखरपुडाही करण्याचे ठरले होते. ते व्हॅलेंटाईन डे च्या म्हणजे 14 फेब्रुवारीला. शारदाने तिला ऑस्ट्रेलियाची आलेले ऑफर ही धुडकावून लावली व प्रथम लग्न करून मगच त्याचा निर्णय ती घेणार होती.

14 फेब्रुवारीला साखरपुडा ठरला. पण या गेल्या सहा महिन्यात म्हणजे ती जूनला लंडन मधून आल्यापासूनचा रवीच्या वागण्यातल्या फरकाने ती साशंक झाली होती. रवी अनेक बहाने करून तिला टाळीत होता आणि यातूनच त्या दोघात थोडा तणाव आलाही होता. कारण होते शामा.

बऱ्याच वेळा शारदा शामाच्या नाटकांना रवी बरोबर गेली होती त्यातूनच त्याच्या शामा बद्दलच्या आकर्षणाची जाणीव तिला झाली होती. रवी ही शामा कडे ओढला जात होता. शारदाला काय करावे समजत नव्हते. जेव्हा शिफ्ट नसेल तेव्हा शामा मोकळी होती. तर शारदाच्या कंपनीतल्या ऑड टाईम शेड्युलमुळे रवीचा पाठपुरावा करू शकत नव्हती. या प्रकरणापासून रवीने दूर राहावे असा प्रयत्न शारदा करीत होती. तिने रवीला तसे सांगितले ही अगदी कुटुंबीयांच्या समोर. कारण त्यांचे आत्ताच लग्न ठरले होते. भविष्यात जर

लग्नानंतर रवी असाच वागला व आपल्याशी एकनिष्ठ राहिला नाही तर! या विचाराने शारदा फार हादरून गेली होती. त्यात एंगेजमेंट ची तारीख अगदी जवळ आली होती. दोन दगडावर पाय ठेवलेला रवीवर मात्र शारदाच्या या सांगण्याचा काही परिणाम होत नव्हता. त्याच्या शामा बरोबरच्या भेटी चालूच होत्या. शारदा अगदी कंटाळून गेली होती !

शेवटी 14 फेब्रुवारीला त्यांची एंगेजमेंट झाली. शारदा ने रवीला शामाच्या प्रकरणातून स्वतःला दूर राहण्याचा इशारा अनेक वेळा दिलाच होता. लग्न मे च्या पाच तारखेला ठरले होते. पत्रिका छापायला दिल्या होत्या. एका हाताला शारदा तर दुसऱ्या हाताला शामा यामुळे शारदाची मोठी पंचायत झाली होती. तिच्या अजोड सौंदर्यामुळे शामा उजवी होती. त्यामुळे रवी तिच्या प्रेमात नव्हे तर आकर्षणात गुंतला जात होता त्याला बाहेर कसे काढावे या साठी शारदा प्रयत्नशील होती.

आता तर रवी आणि शारदा यांच्यात बराचसा तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणात शामाला आपण सांगून दूर करावे असे वाटून तिने शामाची भेट घेतली. तशी ती तिला पहिल्यापासून ओळखत होतीच. मैत्रिणी होत्या त्या. पण रवी प्रकरण सुरू झाले आणि शारदाला शामा व्हीलनच्या रूपात दिसू लागली, भासू लागली.

एक दिवस शारदा ने शामाची भेट घेतली, “शामा आता मी व रवी एंगेज झालो आहोत, तू आता रवी पासून दूर राहा.” असाही विनंती वजा सल्ला तिने शामाला दिला पण शामाने तो झुगारून दिला.

“तो माझा मित्र आहे..” शामा

“हो मला माहित आहे, पण आता आमचा विवाह होणार आहे शिवाय आमचे एकमेकांवर प्रेम आहे तेव्हा तू त्याच्यापासून दूर राहा.... माझे वैवाहिक जीवन तुझ्यामुळे नासू नये असे मला वाटते म्हणून मी तुला या प्रकरणातून दूर राहा असा सल्ला देण्यासाठी आली आहे..” शारदा

“कबूल! पण आमची मैत्री ही निर्मळ आहे, तो मला आवडतो... आमच्या भेटी गाठी होतात... त्यात काय वाईट, तुम्ही लग्न करा.... माझी ना नाही...” शामा

“तीच तर अडचण आहे रवी आता पहिल्यासारखा राहिला नाही, आम्ही एंगेज झालो आहोत पण तो दूर दूरच जात आहे. याची जाणीव मला होत आहे. त्यात त्याच्या क्लिनिकच्या वेळा आणि माझ्या ऑफिसच्या वेळा ही मोठी अडचण आहे, तू सदानकदा मोकळी आहेस.” शारदा

“आम्ही भेटलो दुपारच्या लंच नंतर बाहेर त्यात काय वाईट.” शामा

“वाईट काही नाही! पण मला यात धोका वाटतो आहे तुझ्या बेजबाबदार वागण्यातून, आमचा विवाह अडचणीत येईल...” शारदा

“हे सगळे तू रवीला सांग!” शामा

शारदा आज प्रचंड तणावात होती. रवीचे वागणे शामाचे आकर्षण या कैचीत ती सापडली होती. आपला जॉब फिरता आहे. कधी कधी परदेशात महिना पंधरा दिवस जावे लागते. या काळात शामाची जवळीक अधिक धोकादायक होणार याच विवंचनेत शारदा बेचैन झाली होती.

काही कामाच्या निमित्ताने रवी शारदा च्या घरी आला होता, दागिन्यांची खरेदी करायची होती, शिवाय कपड्यांच्या खरेदीचा दिवसही ठरला होता. ती संधी साधून आपण रवीला श्यामाप्रकरणाचा शेवट करावा यासाठी तिने सर्वांसमक्ष हा विषय काढला...

"रवी! तू आता शामा पासून दूर राहा अन्यथा..." शारदा

"अन्यथा काय ?" रवी

"हा विवाह होऊन आपण सुखी होऊ असे मला वाटत नाही..." शारदा

"तिची माझी मैत्री आहे!" रवी

"मला कल्पना आहे! पण हे प्रकरण दिवसेंदिवस वेगळेच वळण घेत आहे. तुमच्या दररोज होणाऱ्या भेटीगाठी जवळीक मला अस्वस्थ करीत आहे या लग्नातून मला प्रचंड ताप होईल भविष्यात, असे मला वाटते आहे, नव्हे दिसत आहे, तेव्हा तू शामा पासून दूर राहा!" शारदा

"शक्य नाही! ती माझी मैत्रीण आहे तशीच ती तुझीही मैत्रीण आहे..." रवी

"मान्य आहे! पण लग्न, प्रपंचात मला धोका दिसतो आहे... मला प्रचंड मनस्ताप होत आहे... रात्र रात्रभर मला झोप लागत नाही... तेव्हा..." शारदा

"तो तुझा प्रश्न आहे.." रवी

दोघांच्याही आवाजाचा स्तर वाढला होता त्यात तडकाफडकी रवी निघून गेला. कॉफी ही तशीच तेथे होती.

त्यादिवशी नंतरचे दोन दिवस रवी चा काहीच संपर्क नव्हता... शारदाची ही पार झोप उडाली होती. दोन्हीकडून लग्न पत्रिकांचे वाटप नातेवाईक मित्रमंडळीत चालू होते.

तिसऱ्या दिवशी शारदाने रवीला फोन केला... त्याने तो कट केला असे दोन-तीन वेळा झाले... शारदा अधिकच अस्वस्थ होत होती...

त्या दुपारी एक वाजता रवीच्या क्लिनिक वर आली तर शामा तेथे हजर पाहून शारदाच्या मस्तकाची कळ तापली होती.

रवीला न भेटताच ती घरी आली आणि तिने रवीला मेसेज केला,

"मला तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा नाही... तेव्हा आपला ब्रेकअप झाला आहे हे तुझ्या आई वडिलांना सांग, मीही माझ्या आई वडिलांना सांगितले आहे.." शारदा

गोल्डन लँड हॉटेलमध्ये दुपारी शामा बरोबर लंच घेताना त्याने तो मेसेज पाहिला... आणि तोही चक्रावून गेला... लंच न घेताच की दोघे बाहेर पडली...

शारदा ला त्यांनी फोन केला पण आता शारदा ने ते सिम कार्डही बदलले होते. संपर्क टाळण्यासाठी...

आपल्या भविष्यातल्या सुरील जीवनासाठी तिने हा कठोर निर्णय घेतला होता प्रेमाची तिलांजली देत काडीमोड घेण्याचा...!!

# कुछ कुछ

तो कॉलेजचा पहिला दिवस होता. कोकणातून आलेला रमेश अगदी बुजल्यासारखा त्या वातावरणात वावरत होता कोणी मित्र नव्हते, ना कोणी सोबती अजून ओळखी पाळखी व्हायच्या होत्या.

ती एसपी कॉलेजची उंच इमारत तो प्रथमच पहात होता. आणि त्यांचा वर्ग चौथ्या मजल्यावर, लिफ्ट कशी वापरतात हे त्याला माहिती नव्हते, कोणाला कसे विचारावे या विवंचनेत तो होता.

एफ वाय आर्ट्सला त्यांनी ॲडमिशन घेतले होते. रमेश हुशार मुलगा. कोकण डिव्हिजन मध्ये तो दहावी बारावीला पहिला आला होता. घरातले गावचे वातावरण एका शेतकऱ्याच्या घरातले. त्यावेळी तालुक्यात चांगली कॉलेज सुरू झाली नव्हती. म्हणून वडिलांनी त्याला त्याच्या काकांकडे पुण्याला पाठविले पुढचे शिक्षण घेण्यासाठी.

तळमजल्यावरच्या लिफ्ट जवळ तो बराच वेळ रेंगाळत होता. आणि एवढ्यात एक छान गोरीपान मुलगी छान कपडे केलेली लिफ्ट जवळ आली रमेश तेथेच उभा होता..

“मला चौथ्या मजल्यावर जायचे आहे”

“ये ! मी पण चौथ्या मजल्यावर जात आहे.” चंदा

लिफ्ट चौथ्या मजल्यावर आली रमेश त्याच्या क्लास मधून गेला तोवर बहुतेक सगळी मुले वर्गात स्थानापन्न झाली होती. लाजरा बुजरा रमेश वर्गात पुढच्या बेंचवर येऊन बसला त्याच बेंचवर चंदाही येऊन बसली. मुलांच्या बेंचवर मुलींनी बसावे हे रमेशला अवघडल्यासारखे वाटले व तो उठून मागच्या बेंचवर एका मुलाच्या बाजूला बसला. रमेशही दिसायला अगदी हँडसम गोरापान तरुण रुबाबदार व्यक्तिमत्व असलेला मुलगा, उठून मागे गेला नी चंदा पुन्हा पुन्हा त्याला मागे वळून पाहत होती. रमेश ला त्यामुळे अगदी ओशाळल्यासारखे वाटले. तो पहिलाच पिरीएड होता आणि कोणीही प्रोफेसर आले नाहीत म्हणून सगळी मुले पांगली... वर्गामध्ये फारच थोडी मुले होती, रमेश आपले इंग्रजीचे टेक्स्टबुक घेऊन वाचत होता.

चंदाही त्याचं जागेवर बसून होती पण पुन्हा पुन्हा वाकून मागे पाहत होती रमेशला मध्येच. रमेशचे लक्ष तिच्याकडे गेले. क्षणभर रमेशने डोळे बंद केले. हा असा अनुभव त्याला प्रथमच येत होता. पूर्वी कोणाही मुलींजवळ तसा बोलण्याचा वा मुलीकडे पाहण्याचा त्याचा अनुभव नव्हता... या सगळ्या प्रकारात तो अनभिज्ञच होता. दुपारी एक वाजता कॉलेज सुटले व रमेश घरी गेला.

रमेशच्या घरची कमालीची गरिबी. वेळेला अन्न यापलीकडे मौज मजा त्याला माहिती नव्हती. हा एक हुशार मुलगा आहे घराण्याचे नाव काढील याच उद्देशाने त्याला त्याच्या वडिलांनी पुण्याला काकांकडे पाठविले होते. साऱ्या घरच्यांच्या आशा त्याच्यावरच केंद्रित झाल्या होत्या. लहानाचा मोठा गावात झालेल्या रमेशला गावचे घर सोडताना मनाला खूप यातना झाल्या होत्या. पण

त्याच्या आईवडिलांच्या संस्कारातून काहीतरी जीवनात भव्य दिव्य करावे या विचाराने मनावर दगड ठेवून रमेश पुण्याला आला होता. शहरी वातावरणाची इथल्या शांतीची त्याला कल्पना नव्हती. तो यापूर्वी कधीही हॉटेलमध्ये गेलेला नव्हता. तसे त्याच्या काकांचे घर कॉलेजच्या जवळ होते म्हणून तो चालतच कॉलेजला येत असे.

आता कॉलेज सुरू होऊन पंधरा दिवस झाले होते. मराठी मिडीयम मध्ये शिकलेल्या रमेश ला इंग्रजीतला अभ्यास तसा कठीणच जात होता. त्याला क्लासला जायलाही पैसे नव्हते. तेव्हा कोणाची तरी मदत हवी होती. रात्रंदिवस झटून त्याने पहिला महिनाभर अभ्यास रेटला होता. मराठी मिडीयम मधून एकदम इंग्रजी माध्यमामुळे त्याला सारे जरा कठीण जात होते.

एक दिवस दुपारी एक वाजता कॉलेज संपले. फळयावर लिहिलेल्या काही गोष्टी रमेशला आपल्या उतरवून घेण्यास वेळ झाला. चंदाही वर्गात थांबून होती.

त्या नोट्स कॉपी करीत होती. हळूहळू वर्ग खाली होत गेला. रमेशचे काम झाल्यावर तो निघाला तशी चंदाही त्याच्या मागून निघाली.

लिफ्ट जवळ ते दोघेही उभे होते. लॉबीमध्ये शुकशुकाट होता. आता ते दोघेच लिफ्टमध्ये होते.

"तुझे नाव काय?" चंदा

"रमेश देशपांडे" रमेश

मग कोणीच कोणाशी बोलले नाही लिफ्ट तळमजल्यावर आली...

तुला अभ्यासाला काही मदत लागली, नोट्स हव्यात तर मला सांग मी त्या देईन... चंदा

“ठीक! रमेश म्हणत रस्ता ओलांडून आपल्या घराकडे गेला...

या पहिल्याच संवादाने त्याचा धीर चेपला होता. मग मात्र अभ्यासासाठी वह्यांची देवाण-घेवाण होऊ लागली. मैत्री वाढतच गेली पण त्यातही रमेश सावध होता. झकपक असणारी श्रीमंत घरची ती मुलगी होती हे त्याला तिच्या राहणीमानावरून जाणवत होते. आपण गरीब घरचे दोन-तीन दिवस तेच कपडे तो वापरायचा, कोणाला धुवायचा त्रास नको म्हणून स्वतःच आपली सगळी कामे रमेश करायचा.

तो स्कॉलर होता. त्याला कॉलेजने स्कॉलरशिप दिली होती. फी माफ होती. आणि तसा खर्चही नव्हता. आपण कोणावर बोझ होऊ नये यासाठी तो सावध होता. यापुढे आपले ध्येय दिसत होते. खूप शिकायचे छान करिअर करायचे याच विचारांनी तो अगदी भारला होता.

एक दिवस मधल्या सुट्टीत...”रमेश काही घेणार?” चंदा

“नाही!” रमेश

“अरे चहा कॉफी काय सगळेच पितात, चल आपण कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये जाऊ..!” चंदा

“ठीक येतो मी!” रमेश

आज दोन अडीच महिन्याच्या काळात तो कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये फिरकलाही नव्हता. नव्हे तशी त्याला गरज भासली नाही. तो घरूनच सकाळी

पोळी भाजी खाऊन यायचा आणि कॉलेज सुटल्यावर जेवायला ही घरी जायचा. दुसरे म्हणजे पैशाची अडचण... कधी कधी एक पैसा ही त्याच्या खिशात नसायचा... त्याचे त्याला जराही वैगुण्य वाटत नव्हते. नव्हे गरजही भासत नव्हती. पुस्तके त्याला कॉलेजच्या बुक बँक मधून मिळाली होती. खर्च होता तो वह्यांचाच... तो त्याला काका देत. जाण्या येण्याचा खर्च नव्हता. आपण फक्त आपले शिक्षण पूर्ण करायचे हाच मुख्य उद्देश होता त्याच्या मनात. बाकी उनाडपणाला त्याच्या जीवनात काहीही स्थान नव्हते.

कॅन्टीन मध्ये आज चंदाबरोबर तो आला होता. तिने पुढे होऊन दोन कॉफी मागवल्या... आजूबाजूला बरीच मुले होती. रमेश चा हा पहिला अनुभव होता... आपणास सगळेजण पहात आहेत हे त्याला जाणवले व तो थोडा ओशाळला.... आज तिने आपल्याला कॉफी पाजली उद्या आपल्याला पण पाजावी लागेल या विचाराने तो ओशाळला.

ती त्याला आवडली होती. मर्यादा तो ओळखत होता. होता होईल तो तिच्यापासून दूर राहायचा. कामाशिवाय बोलणे नाही तेही फक्त अभ्यासाबद्दल बस!

शाळेत असताना त्यांनी खेळात नॅशनल लेवलवर धावण्याच्या शर्यतीत 100 मीटर 400 मीटर मध्ये भाग घेतला होता. त्यामुळे या वर्षाच्या नोव्हेंबरच्या इंटर कॉलेज मध्ये त्याने त्याच्या एसपी कॉलेजचे प्रतिनिधित्व केले होते. व शंभर मीटर मध्ये गोल्ड तसेच 400 मीटर मध्ये सिल्वर मेडल मिळाले होते.

चंदा बॅडमिंटन खेळायची. तिनेही त्याच्या एसपी कॉलेजच्या तर्फे एक सिल्वर मेडल मिळाले होते.

स्पोर्ट्स फॅन म्हणून दोघांना सगळे गोल्डी एव्हाना ओळखत होते. चंदा सतत आपली मैत्री रमेशजवळ वाढवण्याच्या विचार करीत असे पण आपल्या परिस्थितीची जाणीव असल्याने तिचे थेर आपल्याला परवडणार नाहीत हे तो पूर्णपणे जाणून होता. म्हणून पुढे लेक्चर मध्येही त्यांनी येण्याचे टाळले. पण चंदा मात्र त्याच्या मागेच असायची. रमेशला ते सगळे ओशाळल्यासारखे वाटायचे. पण त्याही परिस्थितीत त्यांने स्वतःला ऍडजेस्ट करून घेतले होते. चंदा इंग्रजी माध्यमातून शिकली होती. ती हुशार होती म्हणून गरजेपोटी रमेश ला तिची मैत्री हवी होती पण... मर्यादा ठेवूनच.

एक दिवस परीक्षेपूर्वी चंदाने रमेश ला आपला मोबाईल नंबर दिला.

“याचा मला काय उपयोग?” रमेश

“पण मला आहे!” चंदा

“माझ्याजवळ मोबाईल नाही... मला त्याची गरजही वाटत नाही...!” रमेश

“मी तुला मोबाईल देते... माझ्याकडे दोन आहेत...!” चंदा

“नको! ते मला परवडणारे नाही! चंदा मी एक गरीब मुलगा आहे गरीब घरातून आलेला आहे, खेडेगावातून.... मला याचा खर्च परवडणार नाही... प्लीज नको मला!” रमेश

चंदाचा हिरमोड झाला.

“ठीक... आपण भेटूनच बोलत जाऊ... मग तर चालेल!” चंदा

“हो! पण कॉलेजमध्येच... बाहेर नाही.” रमेश

“कबूल!” चंदा

वर्ष संपत आले होते. रमेश ची अभ्यासातील प्रगती चांगली होती. उत्तम मार्क तो मिळवत असे अर्थात चंदाची मदत त्याला होत होतीच...

एकदा चंदाने रमेश ला त्यांच्या घरी बोलावले... त्यांच्या बंगल्यावर.... तिचे वडील मुंबईचे कलेक्टर होते, अशा बड्या बापाच्या मुलीची आपली मैत्री मर्यादित राहायला हवी म्हणून त्याने तिच्या घरी जाण्याचे टाळले.... फार जवळीक नको यासाठी.

परीक्षा संपल्या. रमेश गावाला आला व दोन महिन्यांनी पुन्हा पुण्याला आला. त्याला डिस्टिंक्शन मिळाले होते. आता बारावीचे वर्ष आपण झोकून अभ्यास करावा, चांगले मार्क मिळवावे हे त्याने मनोमन ठरविले होते. चंदाही चांगल्या मार्कांनी पास झाली होती.

कॉलेजचा पहिला दिवस. रमेश चा क्लास आता पहिल्या मजल्यावर होता... फारच थोडी मुले उरली होती... पहिल्या दिवशी चंदा आली नाही ती त्याच्याच डिव्हिजन मध्ये होती... दुसऱ्या दिवशीही नाही... रमेशला चैन पडेना... एक आठवडा झाला तरी चंदा आली नाही... मग मात्र रमेशला राहावेना...

त्याने तिने दिलेल्या मोबाईलवर टेलिफोन बूथ वरून फोन केला... तिने उचलला,

“आम्ही नैनितालला आहोत... तीन-चार दिवसांनी येणार आहोत असे म्हणून तिने फोन ठेवला.”

पण त्या आठवड्याभरात रमेशचे चित्त काही क्लासमध्ये लागत नव्हते. पुढच्या बेंचवरची तिची खाली जागा त्याला चैन पडू देईना. सतत ती त्याच्या डोळ्यासमोर येई... त्याची बेचैनी वाढतच गेली.

त्या आठवड्यात येणारी चंदा पुढचे पंधरा दिवस आलीच नाही... मग मात्र रमेश चा बांध फुटला... त्याने पुन्हा तिला फोन केला....

दुसऱ्या दिवशी ती आली...

“माझ्या वडिलांची बदली नैनितालला आयएएस ट्रेनिंग सेंटरमध्ये झाली आहे पण आता म्हणजे मी व आई येथेच राहणार आहोत अजून एक वर्ष...”चंदा

“छान!” रमेश

“का?” चंदा

“काही नाही! मला वाटले की कॉलेज सोडून गेलीस की काय?” रमेश

“तुला आठवण येत होती माझी?”

रमेश काहीच बोलला नाही. चंदा काय ते समजली... तिला तो आवडत होता... खरे तर अजून एक वर्ष आपण पुण्यातच राहावे हा तिचा हट्ट होता... वडिलांनी तो मान्य केला... तिच्या हट्टापायी... तिच्याही मनात रमेश बद्दल ओढ निर्माण झाली होती आणि रमेशच्याही...

पण नको ही विषाची परीक्षा म्हणून रमेश अंतर ठेवूनच होता.

रमेशचे काका गेले. त्यांना ती सरकारी जागा रिकामी करावी लागली आता रमेशला राहण्याची खाण्यापिण्याची काही व्यवस्था नव्हती. होस्टेलमध्ये

मधीच जागा मिळणे शक्य नव्हते. आणि मुळात खर्च परवडणारा नव्हता... या संकटाने तो असाही खचून गेला होता...

चंदाला त्याची ही अडचण माहिती पडली, तिने रमेशला त्यांच्या घरी राहण्याचा सल्ला दिला पण रमेशने तो प्रांजळपणे टाळला. शिवाय खर्चाची अडचण होतीच निदान खाण्यापिण्याची व्यवस्था होणे गरजेचे होते गेला महिनाभर रमेश सैरभैर अवस्थेत होता अडचणींचा डोंगर समोर उभा होता हातात पैसा नाही...

कॉलेजच्या प्रिन्सिपलनी त्याची ही अडचण सोडवली व त्याला होस्टेलच्या रेक्टर बरोबर राहण्याची परवानगी दिली व कॉलेजमधील पार्ट टाइम जॉब कॅन्टीनमध्ये कॅशिएरची जबाबदारी सांभाळण्याचा दिला. एका मोठ्या अडचणीतून तो बाहेर आला...

बारावीची परीक्षा संपली. एक दिवस चंदा कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये आली व जाणून बुजून आपला मोबाईल काउंटरच्या कॉर्नरवर विसरून गेली.

तिने त्या मोबाईलवर फोन केला, “रमेश! मी हा फोन तुझ्यासाठी ठेवून जात आहे... मी तुला फोन करीत जाईन. तू मला आवडतोस I Love you!” चंदा

आम्ही नैनितालला जात आहोत, असे तिने रामेशला सांगितले.

रमेश उडालाच... ती पुन्हा आता भेटणार नाही याची खंत मनात होती पण दोन वर्षांचा तिचा सहवास त्याला फुलासारखा वाटत होता... तिने अभ्यासात मदत केली, शिवाय अडचणीच्या वेळी घरी येऊन राहण्याचा ऑफर

दिली. खरंच म्हणजे ती माझ्या प्रेमात पडली ? पण असेल... आणि मीही! पण... पण... पुढे काय?

असे कितीतरी मृगजळाचे प्रसंग जीवनात येत राहतील आणि आपण अडकत जाऊ, पण ते धोक्याचे आहे हे रमेशला समजत होते. यातून मोकळा झाला असे त्याला वाटले आणि डोक्यातून चंदाचा विषय त्याने काढून टाकला, पुढे आपले ध्येय शिक्षण यात त्यांनी स्वतःला गुंतवून घेतले. हे नाकापेक्षा मोठे मोठे मोती त्या प्राप्त परिस्थितीत त्याला अवघड वाटत होतेच पण मन एका बाजूने चंदाकडे ओढले जातही होते... निदान सध्या तरी तो मोकळा झाला होता एवढे खरे...

पण या दोन वर्षात तिने त्याला खूप मदत केली जेव्हा तो येथे नवीन होता हेही तो विसरु शकत नव्हता...

रमेश ला आपल्या मर्यादा माहिती होत्या आणि त्या त्याने पाळल्या ओलांडल्या नाहीत...! पण! मन चाळवले होते हे मात्र खरे... त्याने तिला फोन करणे पुढे टाळले... तिचे फोन येतच होते तो कट करीत होता...

पण! मनातली हुरहुर मात्र चैन पडून देत नव्हती...! कुछ कुछ झाल्याची... एवढे मात्र खरे!!

# निळाई आकाशाची

त्या दिवशी गोरज मुहूर्तावर निशाचे लग्न अगदी थाटामाटात पार पडले. पत्रिका पाहून एकमेकांची पसंती झाली. त्यापूर्वी पत्रिकेतील गुणांची. पत्रिका 32 गुण जुळतात असे भटजीनी सांगितले, छान संसार होईल, दोघे सर्व गुणसंपन्न व एकमेकांना अनुरूप आहेत. पत्रिकेप्रमाणे दोन्ही कुटुंबे सधन. खर्चाची नो घासा घासी सगळे मानपान अगदी मनासारखे पार पडले. दोन अडीच हजारावर पाहुण्यांनी आहेर नसल्याने मनासारखे पुष्पगुच्छ आणले होते त्यांचा ढीग पडला होता. शोभेचे म्हणून काही समोर प्रदर्शन लावून छान सजावट केली होती लग्न थाटामाटात पार पडले.

मुलगा खूप शिकलेला लाखावर पगार, आयटीमध्ये मोठ्या हुद्द्यावर, हुंड्या बिंड्याचा प्रश्नच नव्हता. अर्धा अर्धा खर्च करून लग्न करावे असे संकेत दोन्ही कुटुंबाने दिले तरी निशाच्या वडिलांनी एक मर्सिडीज जावयाला आहेर म्हणून दिली. खूप दागिने लग्नापूर्वीच केले गेले होते. लंकेची पार्वती बनून ती ही माप ओलांडून त्यांच्या घरात आले.

लग्नाच्या दिवशी रात्री अकरा बारा वाजता वरात त्यांच्या बंगल्यात आली. सात आठ बेडरूमचा तो बंगला. घरात इन मीन तीन माणसे. त्यादिवशी घरात लग्नासाठी आलेल्या पाहुण्यांना इतर बेडरूम हॉल होतात आणि अनिलच्या बेडरूम आम्हाला.

लग्नापूर्वी म्हणजे आमची एंगेजमेंट झाल्यावर दोन वेळा आमची ओळख व्हावी एकमेकांना समजावून घेण्यासाठी काही खास खरेदी करण्यासाठी भेटलो होतो. गिरगाव चौपाटी, वरळी चौपाटी वरून फेरफटका मारला होता. अगदी हातात हात घेऊन खूप उबदार, आणि प्रेमळ स्पर्श वाटला निशाला.

त्या पहिल्या दिवसासाठी तरुण मने उत्साहीत असतात. अनोखा अनुभव, हृदयस्पर्शी दोन मनांचे मिलन, देवाधर्माच्या साक्षीने झालेले लग्नाची पूर्ती, असे ते जीवनभर जपून ठेवावे असे क्षण, आणि होणारी जीवनभर पुनरावृत्ती. आणि पत्रिकेत जमवलेल्या गुणांची परीक्षा, परीक्षाच म्हणायला हवी, त्याला कारण पास नापासाचा निकाल काही क्षणात लागणार होता.

रात्रीचे बारा वाजून गेले होते. दागिने उतरून कपडे बदलून निशा सासुबाईंनी दिलेला दुधाचा ग्लास घेऊन अनिलच्या दुसऱ्या मजल्यावरच्या बेडरूम मध्ये आली, प्रसन्न मनाने अनिलने तिचे स्वागत केले, छान हसले मी, त्याने माझे दोन्ही हात हातात घेतले. छानसे चुंबन घेतले हाताचे. मी क्षणभर सुखावले. पण... क्षणभरच ह!

मग मात्र त्याचा व्यवहार रानटी, अव्यवहार्य, माझ्या कल्पनांचा चक्काचूर करून त्यावर बॉम्ब लावावा असा होता. गुरांसारखा अमानवीय, नाही...! नाही! त्याचे वर्णन करू शकत मी...! तो खुश दिसला...! पण मी तुटले ती कायमची....! त्याच्या त्या व्यवहाराने...!

बराच वेळ मी त्याच्या पलंगावर पडून होते. त्यांनी मला पुन्हा चाळवण्याचा प्रयत्न केला आणि... माझ्या डोळयातली आग... त्याला जाणवली...

मी अंगावरची चादर खाली अंथरून खाली झोपले. झोप लागत नव्हती पण ती रात्र म्हणजे चार-पाच तास मला तसेच काढायचे होते. डोळा जराही लागला नाही. सुरुवातीला डोळयात तरळलेले अश्रूही माझ्या डोक्यातल्या अंगाराने आटले होते.... सकाळपर्यंत मी जागीच होते.

पण त्या चार तासात अनेक प्रश्न माझ्या मनात तरळून गेले. माणूस म्हणून आपल्यावर जे संस्कार होतात त्या त्या संस्काराचा अभाव आहे, की अपूर्ण असतो का माणूस... अनभिज्ञ. इतकी प्रचंड ओढ मिलना पूर्वी माणसाच्या मनात असते, ती का? कशासाठी, अशा जनावरा नाही लाज वाटावी अशा व्यवहारासाठी? हळुवार स्पर्शाच्या अपेक्षांची हिरवीगार पाने जेव्हा चुरगळली जातात, मनाच्या चिंधड्या चिंधड्या करीत हृदयही अशावेळी बधीर होते.

खूप आनंदी आशावादी होते मी लग्नापूर्वी. पत्रिकांबाबत ज्योतिषांनी केलेल्या वक्तव्याची ही परीक्षा अशी जीवघेणी होईल असे वाटले नव्हते. हाच... हाच प्रकार पुन्हा पुन्हा झाला तर? तर मरेन मी... बस ठरवले... पुन्हा या अनुभवाला सामोरे जायचे नाही आणि...

मी पाहिले तो शांतपणे झोपला होता पलंगावर. पाच वाजता मी उठले आणि सरळ खाली आले तशाच अवस्थेत... आणि माझ्या वडिलांनी दिलेल्या मर्सिडीज ची चावी मी चावीच्या बॉक्स मधून काढली. सारे काही चिडीचूप

होते. मी दरवाजा उघडून बाहेर आले... आणि गॅरेज मधली गाडी घेऊन घरी परतले... कायमची परत न जाण्याच्या इराद्याने.

खूप उबदार स्वप्न मी रंगवली होती मनात. आम्ही हनिमूनला उटीला जाणार होतो. विमान दुसऱ्या दिवशी संध्याकाळचे होते. आम्ही केसरीच्या हनिमून टूर मध्ये सामील होणार होतो.

घरी आले तेव्हा सहा वाजले होते. आमच्या घरी ही चिडीचूप होते. मी आमच्या बंगल्याच्या दरवाजाची बेल वाजवली. आईने दरवाजा उघडला. मला तिला पाहताच भडभडून आले आणि मी तिच्या कुशीत पडून मग मनसोक्त रडले... अगदी आटलेल्या अश्रूनाही जागा करून देत.

आईला आश्चर्य वाटले मी आलेली पाहून तीही घाबरली. पण एक अक्षर न बोलता मी माझ्या बेडरूम मध्ये आले. तो सुना सुनाच होता. दरवाजाला कडी लावून मी पुन्हा माझ्या अश्रूंना वाट करून दिली... मग झोप लागली... पण पुन्हा पुन्हा दचकून मी जागी होत होते, रात्रीच्या रानटी अत्याचाराने...

माझा दरवाजा बराच वेळ कोणीतरी ठोकत होते पण मी दरवाजा उघडला तो दुपारी बारा वाजता. अजूनही मी त्याच कपड्यात होते.

मग मी अर्धा तास मनसोक्त नहात होते माझ्या बाथरूम मध्ये खूप फ्रेश वाटले नंतर. आईने नाश्ता दिला पण कोणताही प्रश्न मला विचारला नाही, ना एका शब्दाने विचारले, "तू अशी अचानक इकडे कशी?" काहीतरी अघटीत

घडले आहे एवढे मात्र तिला समजले असणार. कारण बाजूच्या आई-बाबांचे बेडरूम मध्ये मला कुजबुज ऐकू येत होती.

तिच्या सासरी मात्र लोकांना हे माहित पडले ते फार उशिरा, कदाचित ती आपल्या आई-वडिलांना भेटायला गेली असेल असा समज झाला होता. आज संध्याकाळी ती दोघे हनिमूनला निघणार होते, त्याची घरात तयारी चालू होती. अनिलने स्वतःचे सामान भरले आणि निशाचेही आणि दोन्ही बॅगा भरून तो निशाच्या घरी आला.

तत्पूर्वी त्याला खूप पश्चाताप झाला होता. अगदी हमसा हमसी रडला तो. ती दुखावली आहे हे त्यांने जाणले. तिचा राग काढायला हवा. माफी मागायला हवी, आपण तिच्या भावनांची, स्त्रीत्वाची कदर केली नाही. खंत त्याला रात्रभर वाटत होती जशी निशा झोपली नव्हती तसाच अनिलही. आपण खरंच वेडाचार केला. तिच्या कोमल भावनांचा चक्काचूर केला याचा त्याला पश्चाताप झाला होता. त्यात तो घाबरत होता त्याचे कारण जर आज आपण त्याचे निराकरण केले नाही तर अनेक गैरसमज निर्माण होतील त्याने दोघांमधले अंतर वाढत जाईल आणि ते कधीही संपवता येणार नाही. त्याने ठरवले तिच्यापुढे आपण माफी मागायची. ती जे म्हणेल ते करून घ्यायचे, त्यामुळे दोन्ही घराण्यांची अब्रू पण चव्हाट्यावर येणार नाही. अनिल निशाच्या घरी आला. त्याचे स्वागत झाले.

“निशा कुठे आहे?” अनिल

“तिच्या बेडरूममध्ये!” आई

अनिल तिच्या बेडरूममध्ये गेला त्याने कडी वाजवली...

“कोण?”

“मी अनिल!”

ती चपापली... तो येथे येईल अशी सुतभर शक्यता तिच्या मनात नव्हती...

“काय काम आहे?”

“मी तुला भेटायला आलोय! I am sorry! मी असे वागायला नको होते, पण मी स्वतःला थांबवू शकत नव्हतो! माझा तोल गेला होता... निशा प्लीज... मला क्षमा कर! मी पुन्हा असा वागणार नाही कधीच... पुढेही..

“खरंच, पुन्हा एकदा मी माफी मागतो!” अनिल

बराच वेळ ती काहीच बोलली नाही.... दोघेही एकमेकांसमोर उभे होते... तो तिच्याकडे पाहत होता पण तिची नजर मात्र खाली होती....

“एकवेळ आपण याला क्षमा करूया! असा विचार तिच्या मनात येऊन गेला...

“ठीक! केले माफ!... पण पण पुन्हा असे वागायचे नाही!” निशा

“खरंच! मी असा पुन्हा वागणार नाही मला माफ कर!”

“ओके...” निशा

आणि त्याला आत बोलावले.... त्याने तिला आपल्या मिठीत घ्यावे असे निशालाही वाटत होते आणि तसेच घडले...

“आपण निघूया...” अनिल

“तुझे सामानही मी आणले आहे...!’’ अनिल

आणि ती दोघे बाहेर पडली, टॅक्सी एअरपोर्ट कडे जात होती... आणि त्यांचे हात हातात बंद होते.

मनातील गैरसमज दूर होत होते...! समंजसपणाच्या समजूतदारपणाने...

निशाचे आई वडील मात्र चक्रावून गेले होते, ते ती का अशी सकाळीच आली? हमसा हमसी रडत का होती?

ती जेव्हा निघून गेली, त्यांचाही जीव भांड्यात पडला!

आणि... आणि विमानाने आकाशाची निळाई गाठली होती!!

# छापा-काटा!!

यशवंतरावांची सरकारी खात्यातली नोकरी, कधी लवकर जाणे कधी उशिरा. ते लवकर जायचे तेव्हा पत्नी पूजा करायची घरच्या देवांची. पण जेव्हा उशिरा जात ते स्वतः पूजा करीत. सारे काही सुरळीत चालले होते. जेव्हा ते नोकरीत होते.

पण जेव्हा निवृत्त झाले, तेव्हा तर सुरुवातीच्या सहा महिन्यानंतर त्यांना पूजा करावी असे वाटेना. कामधंदा काही नव्हता. आळसावल्यासारखे शरीर मन आणि पूजेला चालढकल सुरू झाली. ते सकाळी फिरायला जात आणि उशिरा घरी येत. तोवर देवांची पूजा झालेली असे. घरी आल्यावर आंघोळ करून देवाला नमस्कार केला की ते मोकळे. त्यांच्या या वागणुकीने पत्नीला खूप त्रास व्हायला लागला. तिची कुरकुर सुरू होती.

मग वर्षभरानंतर त्यांनी आपला बिस्तरा गावाला आणला. मानकराचे घर, पण इतर भाई बंद त्या देवांची पूजा करीत नसत. प्रत्येकाचा सवता सुभा. या सगळ्याची यशवंतरावांना कल्पना नव्हती असे नाही. पण मग देवाची पूजा त्यांनाच करावी लागत होती. गावात मानकराचे सारे सोपस्कार त्यांनाच आता निस्तरावे लागत होते. भाऊबंद होते पण हात झटकून मोकळे.

दोन-तीन वर्षांनंतर वाढत्या वयामुळे त्यांना सारे जड जाऊ लागले होते. शिवाय अधले मधले आजार होतेच. त्यामुळे पत्नी पूजा करीत असे.

यशवंतरावांना आता त्याचाही कंटाळा येत होता. पण नाईलाज म्हणून देवावर पाणी घालणे भाग होते. मंदिरात देखील शिमगा, दसरा याशिवाय इतर पुजेकडे त्यांचे दुर्लक्ष होत गेले आणि मन, शरीर आळसावल्यासारखी झाले. ते देवाची पूजा करण्यात अळमटळम करीत असत. आणि बिचाऱ्या पत्नीला सारे निस्तरावे लागत असे. त्यांच्यापुढे पत्नीचे फारसे चालत नसे. सरकारी खात्यातल्या अधिकाराची वस्त त्यांनी उतरून ठेवली नव्हती. तेच त्याचे कारण होते. आता त्यांची सत्तरी जवळ आली होती. ढोपरे, कंबर ही आयुधे रुसणे सुरू झाले होते. पण घरच्या देवांच्या पूजेचे जंजाळ काही चुकत नव्हते.

बरेच दिवस ते याचाच विचार करीत यातून सुटका कशी होणार. खरे तर त्यांची पत्नी धार्मिक, नेहमी नामस्मरण, पूजा चे तिच्या पुऱ्या दिवसाचा वेळ जायचा. शिवाय घरात काय कमी कामे होती? ते सगळे निपटता निपटता त्या बिचारीचा जीव टोकीत येई. आणि त्यांची पूजेची बसलेली घट्ट गाठ काही सैल व्हायला तयार नव्हती. त्यातून कायम सुटका होईल जेव्हा सुतक सुयेर येई तेव्हा. ह्यावेळी पूजा कोणावर तरी सोपवता येई.

बरे मुंबईवरून मुले येत, पण त्यांना या गोष्टीत जराही स्वारस्य नव्हते. दावे सोडलेल्या वासरा सारखी ती गावाला येत आणि आपल्या गाड्या घेऊन हुंदडत कधी चिपळूण, कधी गुहागर यातच त्यांचा अधिक वेळ जाई. शिवाय उशिरा उठणे, रात्री उशिरा झोपणे हा नेहमीचा फंडा असे. अनेक वेळा त्यांची जेवणे बाहेरच होत. घरात म्हणाल तर चित्त नाही. तेव्हा देवांचा प्रश्न तसाच अधांतरी राहिला. मुले निघून गेली की येरे माझ्या मागल्या सुरू राहिले.

यावर तोडगा शोधण्याचे विचार त्यांच्या मनात बरेच दिवस घोळत होते. आणि एक तोडगा दृष्टीपथात आला. पण तो आपल्या पत्नीला कसा पटवावा याचाच विचार यशवंतराव करीत होते.

एक दिवस निवांतपणे दोघेजण, आपल्या गच्चीवरील झोपाळयावर बसून गप्पा मारीत होते आणि मुंबईला जाण्याचे ठरले. आपण दिवाळी मुलांकडे साजरी करावी. आपल्या प्रकृतीचे चेकअप करून घ्यावे व डिसेंबरला गावाला यावे असे ठरले. खरे तर त्या दीड दोन महिन्यात देवाची पूजा त्यांनी त्यांच्या नोकराणीकडे सोपवली. पण ही तात्पुरती व्यवस्था झाली हो. शिवाय मुंबईला गेल्यावर तिथल्या देवांची पूजा करावीच लागणार होती, कारण मुले जेव्हा त्यांना वेळ मिळेल तेव्हा करीत असत. तो विषय चर्चेला निघाला तेव्हा आपण ती पूजाही आठवड्याचे अर्धे अर्धे दिवस दोघांनी करावी असा प्रस्ताव त्यांनी पत्नीकडे मांडला.

“ते सगळे खरे, आठवड्याचे पहिले तीन दिवस तुम्ही पूजा करा आणि नंतरचे तीन दिवस मी करीन!” पत्नी सुमिता

“हो! जरूर!” यशवंतराव

“आणि उरलेल्या एका दिवसाचे काय?” पत्नी सुमिता

“हो तो प्रश्न आहेच. त्या एका म्हणजे रविवारी पूजा कोणी करायची?” यशवंतराव

“त्याचाही विचार मी केलाय!” पत्नी

“काय?”

“त्यावर तोडगा म्हणजे आपण आदल्या दिवशी 'छापा काटा' करायचा दोघांनी. आणि या खेळात जशी बाजू असेल त्याप्रमाणे पूजा करावी कसे!” पत्नी

“वा! छान! मला मान्य आहे!” यशवंतराव

“हे मुंबई पुरते ठीक पण? गावातल्या पूजेचे काय?” यशवंतराव

“हाच नियम आपण गावातही अमलात आणू!” पत्नी

“कबूल! मग मागे हटायचे नाही! किती हुशार आहेस ग तू?” यशवंतराव

“आहेच मुळी!” सुमिता

निदान पूजेचे अर्धे ओझे उतरले याचा आनंद यशवंतरावांना झाला आणि डोक्यावरचे अर्धे ओझे उतरल्याचे त्यांना समाधान झाले हे काय कमी झाले. ही करामत छापा-काट्याची, खरे की नाही!!

# विळखा जातीचा

आपला मूळचा गाव कोणता? याचा ठाव ठिकाण नसलेल्या श्यामचा बाप आपल्या बकऱ्या घेऊन सह्याद्रीच्या खोऱ्यातून कोकणात उतरला त्याला पन्नास साठ वर्षे होऊन गेली. त्याचा बाप रमला तो कोकणात. गावोगावी बकऱ्याचे आपली पाले घेऊन तो त्याची बायको रकमा आणि मुलगा हे गावोगाव फिरत. ज्या गावात जात त्या गावचे ते होत. उन्हाळ्यात फिरत राहात पण पावसाळा आला की जेथे असं त्या गावात आसरा शोधित आणि दसरा दिवाळीला पुन्हा भटकंती सुरू की पुढच्या पावसाळा येई तोपर्यंत.

कोकणात शिरगावात असताना त्याचे लग्न झाले. ती ही मेंढपाळाचीच मुलगी. भटकंतीची सवय लहानपणापासून पण शिक्षणाची बोंब कारण एका जागेवर स्थिर राहतील तर ना.

पण शामूला कोकणात आल्यावर शिरगावात स्थिरता लाभली. बकऱ्यांची पाले सह्याद्रीत चरत. कोणाला नड नव्हती. शिवाय तेथील एक गृहस्थ राजाराम आप्पा यांच्या मदतीमुळे त्यांनी एक मटन शॉप काढले. एक दुकान भाड्याने घेतले व गावात एक घर राहायला. आता त्याचा मुलगा तेथेच शाळेत जाऊ लागला. मग आप्पांच्या शाळेतून बारावी व पुढे कॉमर्स ला जाऊन बीकॉम झाला.

शनिवार रविवारी तोही बकऱ्या चरायला जाई. शामूला कामात मदत करी. आता शिरगावच त्याचे गाव झाले होते. शामू तेथील देवीला, वर्षाला दोन बकरे देत असे. हा उपक्रम गेली चार वर्षे चालू होता. देवीची सेवा होईल व गावाचा विश्वास त्याने संपादन केला होता. आप्पांच्या कॉलेजमध्येच रमेश कारकून म्हणून काम करू लागला.

तेथील सावंत सरांचा तो लाडका होता.

एक दिवस दुपारी सावंत सरांनी रमेश ला आपल्या केबिनमध्ये बोलावले. रमेश हुशार होता त्याला बीकॉम ला 70 टक्के मार्क मिळाले होते. खरे तर त्याला सरकारी खात्यात नोकरी मिळाली असती पण त्याच्या सर्टिफिकेटवर मेंढपाळ असा शिक्का बसला होता. त्यांना कोणतेही आरक्षण नव्हते. नाहीतर तो आयएएस, आयपीएस ची नक्कीच परीक्षा पास झाला असता. पण जात आडवी आली.

शिरगावला आप्पांच्या कॉलेजमध्ये असल्याने पगार फारसा नव्हता. आता तर तो 23 वर्षाचा होता. शिक्षणात त्याला उत्तम मार्क होते पण तीच जात आडवी येत होती, एकदा तर त्याने ओपन क्लास मध्ये एमपीएससीची परीक्षा दिली होती आणि तोंडी परीक्षेत त्याचा नंबर लागला नाही तरीही तो प्रयत्नांची पराकाष्टा करीत होता.

याच काळात एकदा त्या समाजाची काही नेते त्याच्या कॉलेजच्या आमच्या हॉस्टेलमध्ये येऊन राहिले होते. एका चर्चासत्रासाठी. रमेश त्यात सामील झाला. तेव्हा त्याला आपल्या जाती बद्दल, आरक्षणाबद्दल, सरकारी धोरणाबद्दल बरीच माहिती झाली. बरे त्या आलेल्या लोकांमध्ये सर्व पक्षाचे

लोक होते. पण विचार एकच होता समाजाच्या भल्याचा. ही गोष्ट रमेशला भावली व आपणही आपल्या समाज बांधवांसाठी काहीतरी करावे ही भावना त्याच्या मनात मूळ धरू लागली. त्यातील बहुतेक लोक वयस्कर होते, पण रमेश हा तरुण होता. या मुलांनी आपल्याबरोबर यावे असा विचार काही लोकांनी मांडला. रमेश नाही तो पटला तो उत्तम भाषण करीत असेल तेव्हा एक कार्यकर्ता भविष्यातील नेता म्हणून त्याची वर्णी या आंदोलनाला लागली. रमेशही त्यामुळे पार हूरळून गेला.

पण आठवडाभरातच रमेश च्या एमपीएससीच्या परीक्षेचा निकाल आला. रमेश चे त्यात सिलेक्शन झाले होते. ही क्लास वन नोकरीची ऑफर बरोबर त्याची पोस्टिंगही नाशिकला डे. कलेक्टरच्या पोस्टवर झाली. आणि पुढच्या आठ दिवसात हजर राहावे लागणार होते. शिवाय ट्रेनिंगला जावे लागणार होते ताबडतोब. आता मात्र पंचायत झाली होती रमेशची. मन द्वीधा झाले होते. ही सोन्यासारखी नोकरी सोडून मेंढपाळांच्या आरक्षण आंदोलनात जाणे की नोकरीचा स्वीकार या कैचीत रमेश अडकला होता.

आज त्याची निवड ही ओपन कॅटेगरीतून झाली होती. तो हुशार होता. भवितव्य अत्यंत उज्वल होते. आई वडील पूर्वीच्या लोकांच्या भटकंतीतले जीवन त्याच्या कुटुंबीयांनी अनुभवले होते. आपण यातील कशाची निवड करावी या जातीच्या विळख्यात अडकला होता. त्याचा निर्णय काही होत नव्हता. आई-बाबांनी नोकरी स्वीकारावी असे सांगितले व या संधीतूनही समाजातील मुलांना मार्गदर्शन करावे, समाजाची उन्नती यातूनही साधता येऊ शकते हे त्यांनी रमेशला पटवले.

शिरगावच्या पंचक्रोशीने रमेश चा भव्य सत्कार करण्याचे ठरवले. कार्यक्रम पुढच्या रविवारी होता. रमेश जवळ आता तीन-चार दिवसच शिल्लक होते. तत्पूर्वी तो त्याच्या कॉलेजचे ट्रस्टी सावंत साहेब यांना भेटण्यास गेला.

“रमेश साहेब, अभिनंदन तुमचे!” सावंत

“थँक्यू सर!” रमेश

“मग कधी जॉईन होणार?” सावंत

“सर! अजून विचार होत नाही!” रमेश

“का?” सावंत

“ते आरक्षणासाठीचे आंदोलन!” रमेश

“सोडून दे यार! मी बघ आज सेक्रेटरी असतो, पण या आरक्षणाच्या आंदोलनात तरुण वयात ओढलो गेलो, दंगली झाल्या माझा तुरुंगवास! संपले सारे आजही खर्डेघाशी करतो आहे! तू हा नाद सोड. ही सोन्यासारखी नोकरी स्वीकार, समाजापुढे आदर्श उभा कर! हे कामही समाजासाठी उन्नतीसाठी उत्तम ठरेल, या जातीच्या चक्रात अडकू नकोस. आजचे सगळे राजकारणी तू पाहतोसना, तोंडाला पाने पुसणारे आहेत. काही खरे नाही. राजकारण हा पैसेवाल्यांचा खेळ! तुझ्यासारखी शेकडो हुशार मुले तू नोकरीत आणि तुला एक उदाहरण देतो ते युपी मधले 'मिणा' आज अख्या गावात शंभर आयएएस आयपीएस आहेत. त्यामुळे पुढची पिढी आज त्याच मार्गाने जात आहे.

हे काम तू नोकरीतल्या तुझ्या पोझिशनने तू समाजासमोर उभे करू शकतोस. आंदोलने मोर्चे काढून काहीही होणार नाही, हे ध्यानात घे आणि सोमवारी नोकरीवर रुजू हो!"

तू पुढे हो! त्यातच तुझे भले आहे! सावंत

रमेश, सावंत सरांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत होता हा त्यांचा विचार त्याला पटला होता. आपण नोकरीत राहून हे उद्दिष्ट ही सफल करू शकतो असा विचार करून तो उठला, सावंत सरांना नमस्कार करून त्याच्या केबिन मधून बाहेर पडला.

तो घरी पोहोचला, तो ही गर्दी. त्याला भेटण्यासाठी आले होते. त्यात त्याचे मित्र चिपळूणचे तहसीलदार अरुण जागीरदार, काही आरक्षण वाले आंदोलन करणारे पुढारी, सगळ्यांचा कौल असा झाला की रमेशनेही नोकरी स्वीकारावी. हा आरक्षणकर्त्यांच्या लोकांचा नाद सोडावा, व आपल्या अधिकाराच्या जोरावर समाजासाठी चांगले काम करावे. वाटक्या विमुक्त जातीतील मेंढपाळ या वर्गाला अजून आरक्षण नव्हते त्या जातीतला तो पहिलाच कलेक्टर होता.

सगळे भेटून निघून गेले. दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या नोकरीचा स्वीकार केला व तो ट्रेनिंग साठी नागपूरला रवाना झाला. मनातले आंदोलनाचे भूत त्याने गाडून टाकले.

नोकरीत रमला तो खूप मोठ्या पोस्टवर गेला. वयाची चाळीशी पार झाली. मेंढपाळ जातीतला असून ओपन मधून आला याचा अभिमान त्याला

होता आणि त्याच्या असंख्य सहकारी अधिकाऱ्यांना. शिवाय ज्या ज्या ठिकाणी रमेश ची पोस्टिंग झाली सगळा स्टाफ, सहकारी आणि त्याचे वरिष्ठ अधिकारी त्याच्या कामावर खुश होते.

सध्या रमेश ची पोस्टिंग महाराष्ट्र सरकारच्या वेलफेअर खात्याचा सेक्रेटरी म्हणून त्याच्याकडे या आरक्षणासंबंधी अनेक प्रस्ताव आले, त्यात त्याच्या जातीचाही होता म्हणजे अजून हा तिढा सुटला नव्हता.

रमेश ला आता आपण ही नोकरी स्वीकारली हे उत्तम केले याची पूर्ण कल्पना आली. अन्यथा माझ्या जीवनाचा चिखल झाला असता हेही रमेशच्या ध्यानात आले. सावंत सरांनी माझे सगळे गैरसमज दूर करून माझ्या चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या मनाला रोख लावला आणि म्हणून आज सोन्याचे दिवस तो पहात होता. नाहीतर या जातीच्या विळख्यात माझे काय झाले असते? सांगता येत नाही.

मे महिना होता, रमेश आपल्या कुटुंबासोबत शिरगावला आला. आता शिरगाव हेच त्याचे गाव झाले होते. वडिलांनी वय परत्वे व्यवसाय बंद केला. रमेशने छानसा बंगला या गावात बांधला होता.

येथे येताच तो सावंत सरांना भेटायला गेला. ती संस्था अजून सुस्थितीत चालू होती. रमेशची भावंडेही या संस्थेत शिकली आणि रमेशच्या पावलावर पाऊल टाकत प्रगती करीत होती.

सावंत सरांनी रमेशचे यथोचित स्वागत केले. त्यांचेही वय आता ऐंशी पार गेले होते. आपण रमेशला या जातीच्या विळख्यातून सोडवला आणि सत् मार्गाला लावला याचा त्यांना सार्थ अभिमान वाटला.

रमेशने आपल्या खात्यामार्फत या समाजासाठी अनेक योजना आणल्या, शाळा कॉलेजमध्ये मुलांची शिक्षणाची व्यवस्था केली. जे जे काही समाजातील नव्या तरुण पिढीसाठी करता येईल ते तो करत होता.

अन्यथा.... सरकारच्या नावाने मुर्दाबाद! च्या घोषणा देण्यात त्याचे आयुष्य वाया गेले असते. या कल्पनेने त्याच्या मनाचा थरकाप होई, जेव्हा तो एकांतात आपल्या गत आयुष्याचा विचार करी.

जातीच्या कुबड्यांनी इतर सहकारी पुढे जात होते पण त्यापेक्षा आपण ओपन मधून आलो याचा रमेशला सार्थ अभिमान वाटत होता आणि आपल्या कार्य सफलतेचा.

# अग्निदिव्य

रात्रीचे अकरा वाजून गेले होते, सगळा परिसर सामसूम होता. शेजारी सगळे झोपी गेले होते. फक्त एकाच घरात लाईटचा उजेड होता.
आणि तर अवस्थेत राज घरी आला. त्याला भूक लागली होती पण त्यापेक्षा त्याच्या शरीराची भूक त्याला अधिक घराकडे येण्यास कारणीभूत झाली होती.

घरात शकु त्याची बायको आणि मुले झोपली होती. राज येताच तिला जाग आली पाहते तर काय राज धडपडत होता आधारासाठी त्यांनी शकूची बकोटी पकडली. आणि बाजूच्या रूममध्ये तिला घेऊन गेला.
"अहो तुम्हाला जेवायला वाढते!" शकू
"नको! तु खाली झोप!" राज

आणि त्याने शकुला जमिनीवरच आडवी केली पण त्याला न जुमानता ती उठून उभी राहिली आणि चुलीच्या खोलीत जाणार एवढ्यात रागाने पुन्हा तिला मागे घेतले आणि तिचे कपडे काढायला सुरुवात केली. जेव्हा ती ऐकणार तेव्हा राजने तीच्या डोक्यात जात्याचा कोयंडा घातला. रक्तबंबाळ झाले तिचे डोके. तिने त्याच्यापासून सुटका करून घेतली. गुरासारखी ती रडत होती पण दारूच्या नशेतल्या राजला त्याचे काही पडले नव्हते.

तिच्या रडण्याचा आवाज आणि आजूबाजूच्या घरातील पुरुष मंडळी शकूच्या घराकडे आली, पण आता आपण जीव द्यावा विहिरीत उडी टाकून या इरादाने ती विहिरीकडे पळत सुटली. त्यातले काही लोक विहिरीकडे गेले तर एक दोघांनी राजला ओढत अंगणात आणले. थोबड थोबाड थोबाडला. अगदी त्याची नशा उतरेपर्यंत.

विहिरीकडे गेलेल्या लोकांनी तिला समजावले आणि घरी आणले. ती रात्रभर जागीच होती. वाडीतले लोक रात्री दोन वाजेपर्यंत अंगणातच होते. त्याला राजला तसाच सोडून सगळे जण आपापल्या घरी गेले.

मग मात्र घरचे वातावरण ठीक होते. शकू डॉक्टर कडे गेली डोक्याला पट्टी मारून आली. पण जाताना राजला सांगून गेली मी पोलीस स्टेशनला जात आहे! राज घाबरला आणि पुढचे आठ पंधरा दिवस घरात शांतता होती. तो घरातून बाहेर जात नव्हता.

राज एरवी घरी तरी असे अन्यथा संध्याकाळी किंवा दारूची तलप आली तर दोन पॅक मारून यायचा आपल्या बाईक वरून खेर्डीत जाऊन, तसा आता तो काहीच काम शेती व्यतिरिक्त करीत नव्हता. सरायची वेळ संपली होती. लोक शेती व्यतिरिक्त कुंपणे व इतर छोटी मोठी कामे मजुरांकडून करून घेत. राज ही इतर लोकांबरोबर कधी कुंपण करायला, जंगलात लाकडे तोडायला जात असे. मजुरी चारशे रुपये आणि पैसे मिळाले मजुरीचे की त्याचे पाय खेर्डीकडे वळत आणि गाडीला किक मारून खेर्डी गाठायचा.

जेव्हा पैसे असतात मजुरीचे तेव्हा ठीक नाहीतर बायको शकू नाहीतर आईला सतवायचा. त्या बिचाऱ्या काय करणार? गाडीत पेट्रोल असेल तर ठीक नाहीतर दोन पायांची गाडी खेर्डीला जायची. आणि येताना हलत डुलत घरी यायचा कधी दहा नाहीतर अकरा साडेअकरा पर्यंत. मग कैपाच्या प्रभावाने बायकोला बडवायचा. नशाच ती. तार उत्तरेपर्यंत हे नाटक घरात रंगायचे शकू बिचारी गेली दोन वर्षे हे सहन करीत होती. दोन पोरांची आई. तब्येत तोळा

मासाच. पण तरीही ती सगळया या अन्यायाचे अग्निदिव्य सहन करीत होती. एक एक दिवस वर्षाचा वाटायचा तिला.

हे पिण्याचे वेड त्याला लागले त्याला चार-पाच वर्षे होऊन गेली. पूर्वी थोडी घ्यायचा पण त्या पिण्याने अक्राळ विक्राळ स्वरूप धारण केले त्याचे मुख्य कारण त्याचे लग्न पूर्वीचे एक प्रेम प्रकरण शमाचे. ते तुटले, तिचे लग्न बापाने दूर साताऱ्याला करून दिले ती दिसेनासी झाली आणि राजची जीवनाची भट्टीच बिघडली.

पूर्वी त्याचा खेर्डीला चांगला धंदा होता. दिवसाला सात आठ हजाराचा गल्ला यायचा. क्षमासाठी खूप खूप खर्च करायचा तो. तशी शमा दिसायला गोरीपान, उफाड्याची , वेडा झाला होता तो तिच्यासाठी. तोवर तिचा बाप गप्प होता. पैशाची मदतही तो तिच्या बापाला करायचा. जेव्हा लग्नाचा विचार समोर आला, प्रश्न जातीचा समोर आला. या लग्नाला राज शमा दोघेही तयार होते . पण बापाचा इगो पुढे आला. आपल्या मुलीचे लग्न आपल्या जातीतच व्हावे असे त्याच्या डोक्यात फेर धरू लागले. त्याने राजला घरी येण्यास बंदी घातली. आणि संघर्षाची ठिणगी पडली. शमा चा बाप आणि राज यांच्या शमाच्या बापाने त्याला चोप चोप चोपला. ठार मारण्याची धमकी दिली. आणि शमाला त्याने आपली बहीण जी खेडला होती तिच्याकडे सोडली. आणि राज आणि शमा यांच्या भेटीला खीळ बसली. आणि एक दिवस समाजात बापाने कोणाला न कळताच बाहेर लग्नाचा बार उडवला तिला कुठे दिली याचा थांग पत्ता राजला लागू दिला नाही आणि ती पुन्हा गावात फिरकली नाही आणि राज शमाच्या प्रेमाची इतश्री झाली.

परिणाम असा झाला की राज चे ध्यान त्याच्या धंद्यातून उडाले ते कायमचे. त्याचे मानसिक संतुलन बिघडले आणि त्याला ग्रासले व्यसनानी. जुगार, दारू यात तो पुरा बुडाला. त्यावेळी त्याचे लग्न झाले नव्हते. तसे त्याचे वय लग्नाचे होऊन गेले होते. तरुण व शेवटी त्याचे लग्न एका सामान्य पण शिकलेल्या मुलीशी ठरविले राजच्या बापाने. मनात नसतानाही तो लग्नाला तयार झाला. त्याच्या होणाऱ्या बायकोचे नाव होते शकू'. तशी ती दिसायला खास नव्हती काळी सावळी पण राज गोरापान. पण त्याने तिला पत्करले शरीराची भूक भागवण्यासाठी.

लग्नानंतर तीन वर्षात दोन मुले झाली पण मग राजचे लक्ष प्रपंचातून उडाले. गरज म्हणून बायको बस. आणि त्याचे पिण्याचे व्यसन वाढतच गेले. लग्नानंतर दीड वर्ष त्याचे पिणे लिमिटमध्ये होते. पण ते वाढले त्याचे कारण शमा तिच्या बाळंतपणाला गावाला आली. हे त्याला समजले. त्याचे मन विचलित झाले. त्याने खेर्डीतला आपला धंदा गुंडाळला, त्याला कारण त्याच्यावर झालेले कर्ज. देणेकरांचा ससे मीरा चुकवण्यासाठी, पण ते घरापर्यंत आले. बँकेचे हप्ते थकले. बँक वाल्यांचे घरावर जप्तीचे प्रयत्न सुरू झाले, पण घर आईच्या नावावर होते म्हणून वाचले नाही तर छप्परही गेले असते डोक्यावरचे आणि सगळे कुटुंब रस्त्यावर आले असते.

त्याची बायको शकू हुशार, ती एसएससी झाली होती तिने तिचे नाव त्या घराला लावले ग्रामपंचायतीत जाऊन.

आता राज शेती करी. तशी त्यांची शेती नव्हतीच. कोणाची तरी मक्त्याने शेती तो करी. त्याच्याकडे बैलाचा नांगर होता. एक गाय होती. दूध दुभते घरात असे. शिवाय सरकारचे सवलतीचे धान्य त्यांना मिळत होते.

पण काय अवदसा आली बघा त्यांनी नांगराचे बैल विकले, आणि कोणाच्यातरी नांगरावर नांगरी म्हणून तो काम करू लागला, मजुरी करू लागला, त्याची आई ही मजुरी करत असे कसातरी प्रपंचाचा गाडा चालत होता.

आणि खेर्डीतल्या ज्या मुसलमानाचे पैसे तो देणे होते त्यांनी त्याला एका भयानक व्यवसायात गुंतवला, गावोगाव भटकून जनावरे आणायची आणि खाटीक खाण्यात विकायची. त्याला त्यात कमिशन मिळायचे आणि या येणाऱ्या पैशामुळे दारूचे व्यसन अधिक वाढले. आता तर तो दररोज तरर होऊन घरी येऊ लागला आणि घराचा माहोल बदलला.

आणि एक दिवस तो घरातून गायब झाला कायमचा. खूप शोधाशोध केली, पोलीस ठाण्यात तक्रार केली, पण कोठेच सापडला नाही. पण एक गोष्ट झाली तेव्हापासून घरात शांतता नांदू लागली.

आता शकूला कंबर कसल्याशिवाय उपाय उरला नाही. पण तिला होणारा त्रास मात्र थांबला होता. एखादे वस्त्र वस्पटावे असा तो तिला वस्पटत आपली वासना शमविण्यासाठी बस. त्यात तिला समाधान नव्हते, पण प्रचंड भीतीने ती पूर्णपणे ग्रासली होती. सहा महिने तिने त्याची वाट पाहिली आणि लाजे कजेस्त शेजाऱ्या पाजारांची कामे करायला सुरुवात केली. झाडलोट, लादी पुसणे, जेवण करणे अशी जमेल ती काम आहे ती करू लागली. तिला दुसरा उपाय नव्हता. पण शेजारी चांगले होते. तिला सर्वतोपरी मदत करीत. सासूनेही

काही कामे पत्करली. मुले आता मोठी झाली होती. मुलगी चौथीत आणि मुलगा तिसरीत होता. आता तिच्या प्रपंचाचा गाडा तिच्या खांद्यावर होता आणि हा हा म्हणता वर्ष होऊन गेले, राजचा पत्ता नव्हता, पोलीस अधून मधून येऊन चौकशी करीत, पण आता त्यांचेही येणे बंद झाले होते.

एवढ्यात पावसाळ्यापूर्वी घराचे वाशिक मोडले. घर बसले ताबडतोब दुरुस्त करायला हवे होते तिने व सासू ने पैशाची जमा जमा केली आणि गावातल्या लोकांनीही सढळ हस्ते मदतीचा हात दिला, घर उभे राहिले, एक मोठे संकट टळले होते. पावसाळा आला. नाहीतर काय केले असते त्यांनी...?

शकूने शिवणकाम करणे, शेतात काम करणे अशी कामे आपली कामे सांभाळून सासूला मदत करायला सुरुवात केली आणि घर स्थिर झाले.
हा हा म्हणता पाच वर्षे होऊन गेली राज गायब झाल्याला. तो नसतानाही शकुनी आपला प्रपंचाचा डोलारा खूप चांगला सांभाळला होता. ती काम करायची त्यात तिला महिन्याकाठी पाच हजाराची कमाई व्हायची. शिवाय सासूच्या मदतीने ती शेती करी त्यातून खाण्यापिण्याचा प्रश्न सुटे.

आता इतका काळ असाच लोटला उरलेले कुटुंब आनंदात होते. मुले शाळेत जात होती त्यांची अभ्यासाची प्रगती चांगली होती. आजूबाजूच्या शेजारी खूप चांगले काही त्रास नव्हता. उलट आणल्या पडल्याला सगळे उपयोगी पडत आणि शकुचे कुटुंब ही त्यांच्याशी चांगले संबंध ठेवून होते.

आता पाच वर्षे शकू ने, एका तरुण मुलीने खूप मर्यादेने व्यतीत केले. कोणाची वाकडी नजर तिच्यावर पडली नव्हती. पण तसा प्रसंग आला, राजचे काही मित्र जे त्याच्या जीवावर पोसले गेले होते त्यातल्या श्यामची नजर शकुवर

पडली. जेव्हा ती गावातल्या दुकानावर सामान आणायला गेली होती. गेली दोन वर्षे तो पुण्याला होता एका गॅरेजमध्ये काम करीत होता, आणि शामच्या चक्रा शकुच्या घराकडे सुरू झाल्या. तो दुसऱ्या वाडीत राहत होता. गेले पंधरा दिवस तो गावात होता. आता शकू चा रंगही थोडा बदलला होता. निमगोरा. अंगानेही ती आता छान झाली होती. श्याम चे लग्न झाले नव्हते. राजच्या आईला भेटण्याच्या निमित्ताने तो आला होता. त्यानंतर दोन वेळा तो आला. शकुशी बोलण्याचा प्रयत्न त्याने केला पण ती न बोलताच माजघरात निघून गेली. श्यामच्या डोळ्यातला विकार तिला जाणवला होता पण ती पडली मर्यादशील. तेव्हा तो तसाच निघून गेला. त्यानंतर तीन-चार दिवसांनी दुकानात ती गेली असताना पुन्हा त्याने तिच्याशी बोलण्याचा नी लगट करण्याचा प्रयत्न केला. पण शकूने वटारलेल्या डोळ्यातील आग त्याला जाणवली असणार तो तडक आपल्या घरी गेला.

ती जेव्हा तिच्या माहेरी खेडला गेली, तिची एक मैत्रीण तिला भेटली, शकूची गोष्ट तशी तिच्या माहेरच्यांना, शाळेतल्या मैत्रिणींना माहीत होती. तिची ती मैत्रीण रजू पुण्याला होती. तिचे नवऱ्याची पटेना म्हणून तिने डिव्होर्स घेतला आणि एका बिजवराशी लग्न केले. ती तिला भेटली रजू पुण्यात राहणारी, तिने शकुला भेटल्यावर विचारले...

“काय ग शकू? नवरा आला का? त्याचा काही आता पत्ता लागला का?” रजु

“नाही! अजून नाही!” शकू

“तू कशी ग राहतेस नवऱ्याशिवाय?”

"तो येऊ दे नाहीतर, नको येऊ दे! येऊन काय करणार? मला त्रासच देणार ना! हल्ली तो माझ्या नजरेतून पार उतरलाय! कुठे आहे माहिती नाही! की त्या मुसलमानाने त्याला मुसलमान बनवला! त्याची खाज निववायला बाई दिली असेल आणि पोटापुरता धंदा, नाही तरी तो माझ्यावर खुश नव्हताच. त्याची भूक भागवणारी मशीन होते मी! तो नाही आला तर बरे मी सुखात आहे!" शकू

"अगं पण एक स्त्री म्हणून कोणाचातरी आधार हवा ना! अगं एकटी बाई या जगात सुरक्षित नाही!" रजू

"आता सहा वर्षे गेली ना नवऱ्याशिवाय, मुले ही मोठी झालीत. माझी मुलगी बारा वर्षाची आहे, सातवी ला आहे. मुलगा पाचवीला. बस, त्यांना शिकवायचे हे एकच ध्येय आहे माझे.

अगं! दुसऱ्या लग्नाच्या पुरुषाला बाई हवी असते, पण पोरांचे लचांड नको हवे असे वाटते नसती ब्याद. त्यापेक्षा लग्न न करताच राहावेसे वाटते!" शकू

"अगं कायद्याने नवरा जर परागंधा झाला तर पाच वर्षांनी त्याचा तुझ्यावर काहीही हक्क राहत नाही? तू लग्न करू शकतेस!" रजू

आणि रजू तिच्या घरी गेली. शकूच्या डोक्याला रजू मुळे नवाच खार मिळाला होता तशी ती तरुण होती. तीस-बत्तीस वर्षाची. पुढे अख्खे आयुष्य जायचे होते. त्यात दुसऱ्या मुलानंतर तिने स्वतःचे मुले होऊ नयेत म्हणून ऑपरेशन करून घेतले होते. अशा बाईला कोण पत्करेल का? आतापर्यंत इतक्या खस्ता तिने खाल्ल्या होत्या की पुन्हा या लग्नाच्या मांडवाखालून जाणे

तिला परवडणारे नव्हते. शिवाय मुले मोठी झाली होती, त्यांचे शिक्षण हाच मोठा विचार तिच्यासमोर होता. तिने रजनीने पेरलेल्या लग्नासंबंधीच्या विचारांना झटकून टाकले. शेवटी ती एक बाई होती तरुण होती, तिला तिच्या मनाला मुरड घालणे कठीण होते.

आणि एक दिवस संध्याकाळी राज उगवला. आणि सरळ घरात आला, येताना त्याने मुलांना कपडे, शकुला कपडे, आईसाठी साड्या आणल्या होत्या. त्यावेळी शकू शेजारी कामाला गेली होती. ती परत आली तेव्हा सात वाजले होते. राजचा अवतार पाहून ती चरकली. त्याची वाढलेली दाढी सगळेच काही विचित्र वाटले तिला.

शेजारचे लोक खूप चांगले होते. ती आल्या पावली पुन्हा रतनरावांकडे गेली ते पोलीस मधून निवृत्त झाले होते. राज आल्याचे तिने त्यांना सांगितले. त्यांनी शेजारच्या दोन-चार लोकांना बोलावले आणि राजला घरात न घेता पुन्हा पोलीस स्टेशनला जाऊन तो आल्याची खबर देण्यास सांगितली. रतनरावांच्या ओळखीचे चिपळूणचे सीनियर इन्स्पेक्टर मित्र होते त्यांनी त्यांना फोन करून आम्ही या मिसिंग माणसाला पुन्हा पोलीस स्टेशनला पाठवतो असे सांगितले व तीन चार लोक शकूच्या घरी आले.

“राज! तू सात आठ वर्षांनी घरात आला आहेस. मिसिंग केस तुझ्या विरोधात पोलिसात नोंदवली आहे. तू त्यांना आल्याची खबर दे ते तुझा जबाब नोंदवतील व त्यांनी सोडला तर घरी ये. या सात वर्षात तुझा ठाव ठिकाणा काय होता कोठे होतास तू? धर्म बदललास का लग्न केलं का सगळं लेखा जोखा पोलिसांसमोर सांग!” रतन राव

आणि राज रतनरावांच्या या पावित्र्याने पार घाबरला. हबकून गेला. त्याची दातखिळी बसली आणि तडक तो निघून गेला.

दोन तासांनी रतनरावांनी पोलिसांना फोन केला, “राज आला का?” यासाठी पण तो काही पोलीस स्टेशनला गेला नाही. पोलिसांची चक्रे फिरू लागली. वातावरण संशयाचे होते. सगळीकडे मेसेज गेले, या केस मध्ये काहीतरी काळेबेरे आहे हे पोलिसांच्या ध्यानात आले.

आणि चिपळूण रेल्वे स्टेशनवर पोलिसांनी राजला पकडला आणि चौकशी सुरू झाली. पोलिसांनी त्यांच्या सहा वर्षातील साऱ्या कर्तुतीचा माग काढला. खेर्डीच्या लोकल मुसलमानांनी त्याला फूस लावून ठाण्याला नेला. त्याचा धर्म बदलला. लग्न करून दिले आणि सगळ्या अनैतिक कामाला त्याला लावला. पैसा मिळू लागला. त्याच्या सगळ्या जरुरी ती पुऱ्या होऊ लागल्या आणि राज भरकटला. विसरला बायको पोरांना. ठाण्याच्या पोलिसांना तो वांटेड होता त्याचे नवे नाव बशीर अहमद असे ठेवले होते.

पोलिसांनी शकुला बोलावून घेतले. तिने साफ नकार दिला त्याला स्वीकारायला. सोबत रतन राव होते. पोलिसांनी राजला ठाण्याच्या पोलिसांच्या हवाली केले.

आता शकू स्वतंत्र होती. राजचे भूत कायम गाडले गेले होते. आता आपल्या दोन मुलांचे भवितव्य हा एकच विषय तिच्याजवळ होता.

शकू हुशार होती तिने नोकरी शोधावी असे तिच्या वाडीतील लोकांनी सांगितले व सर्वतोपरी सगळी मदत केली. तिने तलाठ्याच्या भरतीसाठी अभ्यास करून परीक्षा दिली. तिला रिझर्व कोठ्यातून ही नोकरी मिळेल असे

शेजारी म्हणाले. परीक्षा झाली आणि ती पास झाली सध्या तिची पोस्टिंग ट्रेनिंग साठी खेर्डीच्या ऑफिसमध्ये झाली. सहा महिन्यांची ट्रेनिंग संपली. तिला पहिली पोस्टिंग तिच्या गावातच मिळाली कारण मुले लहान होती स्थानिक आमदारांनी त्यासाठी आपले वजन वापरले.

मध्ये मध्ये तिने लग्न करावे असे तिला वाटते पण मुलांना कोण स्वीकारणार म्हणून तिने त्या विचारांना मुरड घातली आणि मुलांच्या भवितव्यासाठी आपल्या भावनांना आवर घातला. आता तिची मुलगी नववी शिकत होती आणि मुलगा सातवीत. आता चांगला पगार, कायम नोकरी, त्यात तिची सासू गेली. मग शकुनी आपल्या आई-वडिलांना घरी आणून ठेवले. त्यांनाही दुसऱ्या कोणाचा आधार नव्हता. आता सुखाचे दिवस आले होते. निर्धास्त होती ती.

पण त्यासाठी गेल्या सहा सात वर्षात तिला ज्या अग्निदिव्यातून जावे लागले आणि त्यातील चढ उतारात ती टिकली एवढे मात्र खरे.

आपल्या मुलांना उत्तम शिक्षण द्यायचे बस या एकाच इराद्याने तिने खूप चांगली मोठी स्वप्ने पाहिली होती आणि त्यासाठी पडलेले कष्ट करण्याचे शकूने ठरवले होते.

खरं सांगू, शकू मोठ्या धीराची, शिस्तीची, मर्यादा शील म्हणून आधी मध्ये येणाऱ्या प्रसंगांना लाथाडून बाजूला करून तिने आपल्या ध्येयाच्या दिशेने आपल्या जीवनाची पायवाट स्वीकारली होती. सामान्य स्त्री आमिषांना बळी पडली असती हे खरे की नाही!!

# तेरी भी चूप! मेरी भी चुप!!

रत्नागिरीतले आडगाव तसेच सगळ्याच गोष्टींसाठी प्रसिद्ध. निसर्गाचे सुंदर सानिध्य लाभलेला हा गाव तसा पुढारलेला, शिक्षणात, बागायतीत सुख वस्तु गाव. सुंदर समुद्रकिनारा. गावात अशी अठरा पघड जातीची वस्ती. पूर्वी खूप एकोपा होता. पण गेल्या दहा पंधरा वर्षात त्याची नाडीच बिघडली. शहरापासून जवळ, नोकरी धंद्याची उपलब्धता, व्यापार उद्योग चांगला, दळणवळणाची उत्तम सोय. प्रत्येक घरात चार चाकी नाहीतर दोन चाकी वाहने आहेतच. असा हा पंचक्रोशीत नव्हे तर पुऱ्या रत्नागिरी जिल्ह्यात प्रसिद्ध गाव.

गेल्या महिन्यातच या गावातल्या ग्रामपंचायतची निवडणूक झाली. दर पाच वर्षांनी आलटून पालटून या पक्षाची नाही तर दुसऱ्याची सत्ता यायची. यावर्षी सत्ताधारी म्हणजे दिल्लीच्या बीजेपीची सत्ता आली. सहा उमेदवार सत्ताधारी आणि सहा विरोधकांचे. पण सरपंच अपक्षाचा. म्हणजे तीन तिघाडात की नाही. तिकडे वजन पडे सरपंचाचे तिकडची सरशी आणि खेळ सुरू व्हायचा रस्सीखेच खेळाचा.

या आठवड्यात संपतराव सरपंचांचा आणि सदस्यांचा शपथविधी झाला. किती लोकांना त्या शपथविधीचा अर्थ समजला माहित नाही. पण प्रत्येकाला दिसत होते ते चरायचे कुरण. तो फेब्रुवारी चा महिना होता. गावाच्या विकासासाठी केंद्रीय आणि राज्याच्या तिजोरीतला पैसा मार्च संपण्याआधी

संपवायचा असतो, त्यात रस्ते, रस्त्यावरच्या लाईट, गरिबांना केंद्रीय योजनेतून घरकुल, शाळेची डागडुजी यासाठी फंड यायचा आणि तो मार्चपूर्वी खर्ची टाकायचा असतो. तसा तो प्रत्येक ग्रामपंचायतीत व्हायचे.

आडगावची वस्ती सहा हजारांची. त्यामुळे जादा फंड यायचा कामे करा वा नका करू. यावर्षी मोदी सरकारने सढळ हस्ते हा फंड वेगवेगळया योजनेच्या अंतर्गत पाठवला.

आता नव्याने आलेली कमिटी. त्यात नवे जुने सगळेच होते. काहीतर गेली वीस वर्षे सतत निवडून येत होते. त्यात मागचा सरपंच शामराव तर सरपंच पदासाठी आणि एका वाडीत सदस्य पदासाठी उभा राहिला होता. संपतराव सरपंच झाला आणि शामराव पडला चांगला ५५२ मतांनी, पण शामराव सदस्य म्हणून निवडून आला. तो तर सगळयात अनुभवी होता. पण संपतराव महसूल खात्यात पूर्वी होता. आणि निवृत्तीनंतर आता तो सरपंच झाला होता. तो तर सगळया अनुभवांनी संपन्न होता. खूप पैसा त्याने या सरपंचाच्या निवडणुकीत गावात पेरला होता. त्याला सपोर्ट होता तो आजी आमदार आणि पालक मंत्र्याचा. मग काय त्याचाच वरचष्मा असणार हे सांगण्याची गरज नाही.

संपतराव हा पूर्वी पंचायतीचे ऑडिट करायचा. त्याला सगळया खाचा खोचा माहिती होत्या. तीच एक डोकेदुखी शामरावला वाटत होती. निवडून आल्यापासून एकच विषय त्याला सतावीत होता कारण गेल्या तीन टर्म तो सरपंच होता. संपतराव निवडून आल्या आल्या पूर्वीच्या ग्रामसेवकांनी राजीनामा दिला. आणि संपत रावांच्या भीतीने नवा कोणीही ग्रामसेवक गावात यायला तयार नव्हता. संपत रावांनी महसूल मंत्र्यापर्यंत याबाबत पत्र व्यवहार

केला. तेव्हा एक महिला ग्रामसेवक यायला तयार झाली. ती बाजूच्या गावातीलच होती. तेव्हा तिला यायला जायला अडचण नव्हती कारण गावात बारा एसटीच्या गाड्या येत होत्या.

सदस्यांचा शपथविधी झाल्यावर गेल्या शनिवारी ग्रामपंचायतची पहिली सभा होती. शामराव या सभेला उशिरा आला. प्रत्येक जण ते का आले नाहीत याची चौकशी करीत होते आजच्या मीटिंगमध्ये गेल्या पाच वर्षातील योजना त्यावर झालेला खर्च व त्यासाठीचा रिपोर्ट यांचे प्रथम वाचन झाले आणि चर्चेला सुरुवात झाली. सगळा आलेला फंड खर्ची पडला होता. शिल्लक झिरो. शिवाय ती कामे पूर्ण झाली का याबाबतचा विषय पुढे आला त्या अगोदर शामराव मीटिंग मधून निघून गेला.

झाले ठिणगी पडली का गेले शामराव? कोठे गेले? येणार की नाही परत? अनेक प्रश्न नवे सदस्य विचारीत होते. पण जुने सगळे चिडीचीप.

"जुन्या सदस्यांपैकी कोणी सांगेल का? मागची कामे झाली का?" संपतराव

पण कोणीच बोलायला तयार होईना. पंधरा मिनिटे शांतता पसरली.

"शामा ताई! मागच्या टेंडरची फाईल घेऊन या!" संपतराव

शामा ग्रामसेविका यांनी फाईल आणून ठेवली. संपत रावांनी त्यातल्या कामाची जंत्री व कोणा कोणाला टेंडर दिले याची यादीत सभेत वाचून दाखविली. तर सगळी टेंडर सगळ्या जुन्या सदस्यांना दिल्याची नोंद माहिती पडली. मग जुन्या सदस्यांना उद्देशून,

"सदस्य हो! तुम्ही सगळी मागची टेंडर घेतली होतीत. तुम्हीच सांगा ही कामे पूर्ण झाली का? त्याची पेमेंट तुम्हाला मिळाली का?"

पुन्हा सभेत शांतता. जुने सदस्य काहीच बोलायला तयार नव्हते.

"अहो! कामे झाली नसावीत, कारण तुम्ही काहीच बोलत नाही. पण पेमेंट तुमच्या बँक अकाउंट मध्ये जमा झाले असेल ना?" संपतराव

"झालेयत!" सगळे सदस्य म्हणाले.

"मग कामाचे काय? झाली नसतील तर कधी होणार? होणार की नाहीत? आपण याच्या चौकशीसाठी चौकशी कमिटी नेमूया का?" संपतराव

नवे सदस्य म्हणाले हो! पण जुन्यापैकी कोणीच काही बोलले नाही, पण त्यातला एक सदस्य उभा राहिला आणि...

"संपतराव! ग्रामपंचायतची कामे कशी चालतात तुम्हाला माहिती नाही का? सगळे पेपर वर गेले आहे. कामे पुरी झाल्याचे, आता कशाला खोद काम करताय? पुढे असे होणार नाही हे पाहूया." एक सदस्य

"अहो! ऑडिट झाले. त्यात सगळी कामे पूर्ण झाल्याची नोंद असेल ना? मग आता थांबवा हे सगळे चौकशीचे गुऱ्हाळ! काय?" दुसरा सदस्य

आणि उरलेल्या चौघांनी त्याला दुजोरा दिला.

हे होणार हे संपत रावाला माहिती होते तो बिलंदर या कामात. ऑडिट होते. पैसे पोहोचतात, शेरे मारले जातात, सारे काही ऑल वेल!

त्यातील एक सदस्य उठला...

“संपतराव! तुम्ही रेव्हेन्यूत काम केले आहे, हे सगळे तुम्हाला माहिती नाही का? मग उगाच चिखल उपसायचे कशाला? तो सदस्य.

सगळीच शांतता सगळ्या सभेत होती....

“ठीक! आता आपण आजचे काम आवरते घेऊ! असलेले विषय पुढच्या सभेत आपण घेऊ. शिवाय आता सरकारकडून आलेल्या परिपत्रकाप्रमाणे पुढचे विषय घेऊन त्यासाठीच्या टेंडर प्रक्रिया सुरू करू! कसे!” संपतराव

सगळे नवे सदस्य म्हणाले ठीक!

आणि सभेचे कामकाज संपले. सगळे सदस्य संपत रावांना हात मिळवून घरोघर गेले, नंतर संपतराव घरी गेले.

शामराव चिंतेत होता. त्यांच्या जीवाची घालमेल घरी गेल्यापासून चालू होती. हा सगळा चोरीचा मामला बाहेर काढला संपतरावाने तर? या चिंतेत तो होता. त्याने ठरवले संध्याकाळी संपत रावाची गाठ घ्यावी आणि त्याचे पाय संपतरावांच्या घराकडे वळले.

“राम! राम! संपतराव!” शामराव

“या! या! काय काम काढलेत?”

“काही नाही! सहज म्हटले तुम्हाला भेटावे! अहो गेली पंधरा वर्षे मी सरपंच होतो. पुढचे पाठ! मागचे सपाट!! असेच काम चालत आले. अहो आमदारांपासून सगळेच यात गुंतलेयत. आम्ही अनाडी काय करणार! ग्रामसेवक सांगतात तसे आम्ही करत आलो! तुम्ही हुशार म्हणून हा विषय आज

काढलात! मी काय म्हणतो हे चौकशीचे गुऱ्हाळ बंद करा आणि गुण्यागोविंदाने सगळेजण काम करूया! कसे!" शामराव

संपतराव काहीच बोलले नाहीत. हे सरपंच होणे म्हणजे अवघड जागेचे दुखणे झाले आहे हे त्यांच्या ध्यानात आले होते. आपण सगळ्यांना बरोबर घेऊन गेलो नाही तर काम करणे कठीण. हे लोक सगळे बिलंदर. उद्या एखादे शुक्लकास्ट आपल्या मागे लावायला हे लोक कमी करणार नाहीत. तेव्हा जे चाललंय तसं चालत राहणे हे शहाणपणाचे! असा विचार संपत रावांनी केला मनातल्या मनात...

"हो! तुम्ही म्हणाल तसे! सगळ्यांनी एकजुटीने काम करूया!"संपतराव एवढ्यात....

श्यामराव आणि खिशातून नोटांचे बंडल काढून संपतराव यांच्या हातात ठेवले...

"कसं! शामराव

"ठीक!!" संपतराव

आणि संपत रावांनी तो नोटांचे बंडल आपल्या खिशात ठेवले.

"मग मी निघू का?" शामराव

"निघा!" संपतराव

आता संपतराव ही शामरावांच्या गळाला लागला होता आणि... मामला कायमचा थंड झाला... तेरी भी चूप.... मेरी भी चुप!!

# गेम

अनिल हा बाबुराव परब साहेबांचा मुलगा. साहेब आर्मी पोलीस मध्ये सब इन्स्पेक्टर म्हणजे सुभेदार झाले. तेव्हा नुकताच अनिल ग्रॅज्युएट झाला होता. अनिल च्या वडिलांची सगळी सर्विस आर्मी खात्यात गेली. त्यातली बहुतांश बॉडीगार्ड लाईनला त्यांनी केली. आठ वर्षभरात त्यांची निवृत्ती होणार होती. संपूर्ण आयुष्य मातब्बर मंत्र्यांच्या सानिध्यात त्यांचे अंगरक्षक म्हणून काढल्याने संस्कारीक असे झाले होते, चौथीपर्यंत शिकलेले होते ते. पण मिलिटरीतून निवृत्त झाल्यावर आल्यावर ते बेळगावला मुंबई पोलिसात भरती झाले. पिस्तूल फायरिंग मध्ये त्यांचा पोलीस खात्यात अहवाल नंबर होता. म्हणून ते या खात्यात आल्या आल्या त्यांची नेमणूक बॉडीगार्ड सेक्शन मध्ये झाली. इंग्रजी वर त्यांचे प्रभुत्व होते.

अनिल पदवीधर झाला आणि त्याला इन्कम टॅक्स मध्ये कारकुनाची नोकरी मिळाली. त्याचे वडील हे ज्या डिपार्टमेंट मध्ये होते तेथे पैशाचा म्हणजे भ्रष्टाचाराचा संबंध नव्हता. तेच संस्कार मुलावर झाले. इन्कम टॅक्स मध्ये सगळीकडे भ्रष्टाचाराची बजबपुरी म्हणून या नोकरीत अनिलला तीटकारा होता. त्याऐवजी आपण दुसरी नोकरी धरावी असे प्रयत्न तो करीत होता पण काही जमले नाही.

आता आपले वडील निवृत्त होणार मग सरकारी जागा सरकारला परत करावी लागणार आणि आपण रस्त्यावर. म्हणून वडील सांगता येत तर पोलीस मध्ये सब इन्स्पेक्टर व्हावे म्हणजे जागेची अडचण भासणार नाही हे त्याला माहिती होते. पोलीस मध्ये पावला पावलावर पैसा आणि भ्रष्टाचाराची बजबज पुरी पण काही चांगले करता येईल या इराद्याने त्याला एमपायमेंट मधून आलेला कॉल स्वीकारावा असे वाटले. शिवाय त्यावेळी बाबुराव गृहमंत्र्याकडे होते. तेव्हा अनिल सब इन्स्पेक्टर झाला.

आणि तो ट्रेनिंग साठी नागपूरला गेला. त्यात योगायोग असा त्याचा मित्र सुनील हाही त्याच्याच बॅचमध्ये एस आय म्हणून सिलेक्ट झाला होता. दोघेही अगदी जिवाभावाचे मित्र. लहानपणापासून एकत्र खेळलेले, शाळा, कॉलेजही एकच. त्यामुळे त्यांचे मेतकूट अगदी छान झाले. सुनील चे वडीलही आर्मी पोलीस मध्ये हवालदार म्हणून निवृत्त झाले होते. त्यांचे ट्रेनिंग नऊ महिन्याचे होते ते पुरे करून दोघेही मुंबईला सुट्टीवर आले. नागपूरला त्यांची पासिंग परेड झाली. अनिल हा स्पोर्ट मॅन होता तो उत्तम हॉकी खेळायचा तेव्हा त्याची निवड ही स्पोर्ट कोट्यातून झाली होती. सध्या ते नायगाव पोलीस चाळीत राहत होते.

अनिल ची आई गावाला असे. शेतीवाडी, बागायत याची देखभाल करायला. अनिलच्या आजोबांनी गावात खूप जमीन वडीलोपार्जित व त्यांनी विकत घेतलेली. त्यात आंबा, काजू व इतर फळांची लागवड त्यांनी केली होती. त्यांच्या घराच्या मागे असणाऱ्या धोकट्याच्या डोंगरात त्यांनी आंबा, काजूची खूप लागवड केली होती. चांगले उत्पन्नही त्यापासून. अनिल चे आजोबा बी

पी टी मध्ये नोकरी करीत होते. चांगला पैसा कमावला आणि त्यांचा विनियोग सुद्धा चांगला केला. पुढच्या पिढ्यांसाठी.

आपली ट्रेनिंग पुरी करून आल्यावर अनिल आणि सुनील यांची पोस्टिंग मुंबईतच झाली. अनिल दादर पोलीस स्टेशनला आणि सुनील शिवडी पोलीस स्टेशनला. ही दोन्ही पोलिसांची मुले असल्यामुळे त्यांना बूजरेपण नव्हता. दोघांनाही पैशात रस नव्हता. भ्रष्टाचाराचा त्यांना तिटकारा होता. दोघेही नायगावला नव्या चाळीत ए विंगमध्ये राहत होते.

ते दोघे कामातून वेळ मिळेल तेव्हा भेटत गप्पागोष्टी होत दोन्ही कुटुंबाचे संबंधही अगदी घरोब्याचे होते. ते नातेसंबंधात जोडावे असे सुनीलच्या आई वडिलांची इच्छा होती. अनिलची बहिण सुषमा ही गावाला आईबरोबर राहत होती. ती बी ए बी एड झाली आणि गावातल्या हायस्कूलमध्ये शिक्षिका होती. सुनीलचे तिच्यावर प्रेम होते. पण ते त्याने प्रकट केले नव्हते. पण ट्रेनिंगच्या दिवसात सुनील अनिल जवळ बोलला कारण तिला अनेक स्थळे येत होती. तेव्हा सुनीलने अनिलला विचारले,

“अनिल! सुषमासाठी माझा विचार होऊ शकतो का? अरे माझे तिच्यावर प्रेम आहे अगदी लहानपणापासून!”सुनील

“अरे वा! मग काय छान मी आजच आई-बाबांना सांगतो. आपली ट्रेनिंग संपल्यावर आपण लग्नाचा बार देऊ उडवून!”अनिल

“अरे पण सुषमाला विचार!”सुनील

“त्याची तू काळजी करू नको!” अनिल

आणि लग्नाचा मामला फिट झाला. मे महिन्यात ते उरकून घेऊ असे अनिल सुनीलला बोलला. आणि लग्न झाले मुंबईलाच. सुनीलला नवे घर पोलीस डिपार्टमेंटने दिले आणि अनिल वडिलांच्या जागेतच राहत होता. सुनीललाही नंतर त्याच विंग मध्ये नवे घर मिळाले.

या जोड गोळीला पोस्टिंग मिळाले आणि ते ड्युटीवर रुजू झाले. या दोन समविचारी मित्रांना पोलीस खात्यातल्या भ्रष्टाचाराबद्दल प्रचंड तितकारा होता तेव्हा आपली संपूर्ण सर्विस दिमाखात स्वच्छ राहून करावी असे त्यांनी ठरवले.

ते जॉईन झाल्या झाल्या पहिल्याच महिन्यात हप्त्यातला त्यांचा शेअर घेण्यासाठी त्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये नेमलेल्या सीनियर जमादारांनी बोलावले. खरे तर प्रत्येक पोलीस स्टेशनला त्या त्या एरियातील गुंड, स्मगलर, बार, हॉटेल, पब,लेडीज बार, मटका, आणि देशी दारूच्या दुकानांमधून हप्ता येत असे. लाखो रुपयांचा. त्यातला भाग अगदी गृहमंत्र्यापर्यंत जात असे. मग प्रत्येकाच्या पोस्ट प्रमाणे हे रेट ठरलेले असत. अगदी नव्याने आलेल्या शिपायापासून कमिशनर पर्यंत. याची कल्पना अनिल सुनील यांना होती. अनिलला निरोप मिळताच तो आला.

“साहेब हा आपला वाटा!” जमादार

“धन्यवाद! पण जमादार साहेब मी हे पैसे घेणार नाही आणि यापुढे मला हे पैसे ह्या भ्रष्टाचारात बरबटलेले मला घ्यायला बोलवायचे नाही. तुम्ही हवे तर सीनियर इन्स्पेक्टर यांना तसे सांगा. हा पैसा पोलिसांच्या कुटुंबीयांच्या वेल्फेअर फंडासाठी द्या! समजले!”अनिल

जमादार चमकला. त्याला हे अपेक्षित नव्हते. नवे त्याच्या सर्विसच्या कारकिर्दीत हे पहिल्यांदाच घडत होते. ही बातमी जमादार आणि स्टेशन इन्चार्ज इन्स्पेक्टर ना सांगितली त्यांनीही जाणले. हे पाणी काही वेगळेच आहे आणि अनिल बद्दलचा रिस्पेक्ट त्यांच्या लेखी वाढला. हे बेणे काही वेगळेच आहे हे त्यांच्या ध्यानी आले.

तोच प्रकार शिवडी पोलीस स्टेशनमध्ये सुनील च्या बाबतीत घडला. या सगळ्या बातम्या कमिशनर पर्यंत गेल्या आणि वेगळा विचार त्यांच्या बाबतीत होऊन लागला. यापूर्वी असा प्रकार पोलीस खात्यात कधीच घडला नव्हता. तो भविष्यात त्रासदायक होईल यासाठी अनिल सुनील यांची बदली सीआयडी या शाखेत करण्याचे नक्की करून तशा ऑर्डर आल्या आणि ते दोघेही तिकडे रुजू झाले.

त्या दोघांनाही तेच हवे होते. आता संपूर्ण मुंबईमध्ये त्यांचा वावर होणार होता. त्या दोघांनी आपली वर्णी एकाच युनिटमध्ये करून घेतली. त्यांचे सम विचारी साहेबांचे एक मित्र त्रिपाठी साहेब होते. मग काय सगळे मेतकूट सहज म्हणजे अनायसे जमून आले होते. निदान आपल्या पुरते आपण मुंबईची घाण धुऊन काढण्याचा निर्धार त्या दोघांनी केला.

प्रथम अनिल सुनील यांनी मुंबईतल्या गुंडगिरी बद्दल सखोल अभ्यास सगळ्या विभागाचा केला. शिवाय त्रिपाठी साहेबांनी स्वतः सगळ्या झोनल इन्चार्जकडून यांची सगळी माहिती अनिल सुनील यांना मिळवून दिली. मग ते दोघे आपल्या मोटर सायकलने त्या त्या विभागात प्रत्यक्ष पाहणी करून सगळ्या जागांची पूर्ण जंत्री तयार केली. त्रिपाठी साहेब हेही अगदी स्वच्छ आचार

विचारांचे अधिकारी होते. ते पूर्वी दिल्लीला अँटीकरप्शन विभागात कार्यरत होते. ते आयपीएस अधिकारी होते. ते मुंबईला येणार याच कल्पनेने गुन्हेगारांचे धाबे दणाणले होते. अॅडिश्नल कमिशनरच्या पोस्टवर होते. त्यांच्या आणि अनिल सुनील यांच्या सतत मीटिंग होत व या गुन्हेगारी प्रवृत्तीला निपटून काढण्याचा इरादा व लाईन ऑफ अॅक्शन त्यांनी ठरवली. त्यांची पहिली धाड पडली ती रामा शेट्टी या गुंडावर. जो स्मगलिंग करत असे व त्यांचे संबंध अगदी पाकिस्तानातल्या डॉन बरोबर होते.

त्याच्या मुस्क्या अनिल सुनील यांनी बांधल्या. अख्ख्या सीआयडी विभागाने त्या अनुषंगाने अगदी गोदी पासून कामाठीपुरा, भेंडी बाजार या विभागातल्या त्यांच्या पेढ्यांवर पडल्या. करोडो रुपयांचा माल जप्त झाला. रामा शेट्टी व अनेक गुंडांना जेलच्या गजाआड करण्यात आले. अनिल सुनील यांच्या या पहिल्याच अॅक्शन ने मुंबई पूर्ती हादरली. पैशाचा रतीब आटला म्हणून, वरचे राजकारणी हादरले आणि सर्वत्र कुजबूज सुरू झाली. 225 मोठे रिवार्ड त्रिपाठी सह सर्व युनिटला दिले. अनिल सुनील यांनी या पैशातून स्वतःला घरे बुक केली. सगळाच आनंद. एक वेगळी दहशत त्या भागात बसली हे सांगण्याची गरज नाही. करोडो रुपयांचा स्मगलिंग मालाने सरकारी तिजोरी भरून वाहिली.

मध्ये तीन-चार महिने गेले. अनेक गुंड भूमिगत झाले. त्यात पक्या नावाचा गुंड खरे तर वांटेड, पण पोलिसांच्या आशीर्वादाने मोकळा होता. त्याचा एक करोड रुपयांचा हप्ता होता वर्षाला. अनिल ने त्याचा माग काढला आणि त्याच्यावर रेड पडली पण तो निसटून जाताना अनिलच्या गोळीचा शिकार झाला. थोडक्यात त्याचा गेम अनिलने केला. त्यानंतर काळ्या रामोशी, बारक्या

भुवड या वांटेड गुंडांचा गेम या दोघांनी केला. सगळे अंडरवर्ल्ड हादरले होते. आणि अनिल सुनीलला जीवे मारण्याच्या धमक्या त्यांच्या पिल्लावळीतून येऊ लागल्या. त्यांना संरक्षण देण्याचे हुकूम वरिष्ठांनी दिले. पण त्याने ते प्रांजळपणे नाकारले. पण आता त्यांना 24 तास सोबत रिवाल्वर ठेवावे लागत होते. आता या विभागात (CID) त्यांना पाच वर्षे होऊन गेली होती. त्यांच्या ट्रान्सफरच्या ऑर्डर निघणार होत्या. खरे तर त्यांना हेच काम पसंत होते, त्रिपाठी साहेब कमिशनर झाले.

ही तिघांची बॅंद लवकर जाईल कधी याची वाट पोलीस खाते करीत होते. त्यांनी ठरविले करीम लाला या दारूच्या स्मगलरचा गेम करायचा.

आणि मढ आयलॅंड च्या करीम लाला च्या बंगल्यावर तसेच त्याच्या मुंबई मधल्या सगळ्या अड्ड्यांवर रेड करायचे ठरले. त्याला मुंबई मधल्या सगळ्या राजकीय पार्टींचा वरदहस्त होता. आता लोकसभेची व मग विधानसभेची निवडणूक लागणार होती. निवडणुकीला या गुंडांची मदत पैशाच्या स्वरूपात शिवाय मतदारांना धमकाविण्यास मुंबई मधल्या सगळ्या वार्डात होई. शिवाय महापालिकेच्या निवडणूकाही लागणार होत्या. अनिल सुनील यांनी त्रिपाठी सह मोठ्या लवाजमाने रेड केली.

करीम लाला प्रत्यक्ष या दोघांना ओळखत नव्हता. पण यांची नावे जाणत होता. ही रेड म्हणजे मोठा धोका होता स्टाफ साठी. त्यांनी काट्याने काटा काढण्यासाठी प्लॅनिंग केले. करीम कडे हेलिकॉप्टर होते त्याच्या बंगल्याच्या मागे. तेव्हा तो पळूनही जाऊ शकतो हे गृहीत धरून या दोघांनी आणि त्रिपाठी यांनी पुरा एरिया सील केला. करीम लालाचा गेमच करायची म्हणजे ती बॅंद

कायमची निकालात काढायची असे ठरले. तो मुंबई पोलिसांना वांटेड होता. पण तो मुंबईतून नेहमी बाहेर असे त्याला पकडणे कठीण होते. असा गुंड शिवाय तो दाउदचा मेव्हणा होता. तर दाऊदलाही त्याच्या पकडण्याने वा मारण्याने मोठी दहशत अंडरवर्ल्डला बसणार होती. त्यात अनिल सुनील यांना सीनियर इन्स्पेक्टर ची प्रमोशन मिळाली होती आणि नंतर बदली झाली. येथून निघण्यापूर्वी करीम लालाचा गेम करायचाच कारण इतर लोकांचे हात बरबटले होते भ्रष्टाचारात. दरवर्षाप्रमाणे करीम लाला मुंबईत असणार हे नक्की म्हणून ईद च्या आदल्या दिवसाचा मुहूर्त ठरला.

त्या दिवशी दुपारी करीम नालाचे हेलिकॉप्टर आल्याची बातमी आली आणि अर्ध्या तासात ही रेड झाली. शेकड्यांनी लोक त्याचे संरक्षणासाठी होते बॉडीगार्ड म्हणून. तेव्हा गोळीबार होणार यासाठी सर्व शस्त्रानिशी ही रेड झाली. त्यात अनेक पोलीस जखमी झाले. एका पोलिसाला हॉस्पिटलमध्ये मृत्यूने गाठला.

अनिल सुनील आघाडीवरच होते ते बंगल्यात घुसले. त्याच्या बेडरूमचा दरवाजा आतून बंद होता. बाहेर फायर चा आवाज ऐकून तो सावध झाला. त्यावेळी करीम लाला पहिल्या मजल्यावर होता. त्यानेही खाली AK47 ने फायर केला. या दोघांनी दरवाजा तोडून आज प्रवेश केला. करीम पाठमोरा उभा होता खिडकीजवळ आणि या दोघांनी त्याला पकडण्यासाठी वर फायर केला पण करीम नेही फायर केला व करीमला सहा गोळ्या लागल्या अनिलच्या रिव्हॉल्वरच्या आणि तो खाली कोसळला.

रक्ताच्या थारोळ्यात त्याचे शरीर पडले होते इतक्या सफाईदारपणे हा गेम झाला होता. आणि मग सगळीकडे शांतता पसरली करीमला हॉस्पिटलला हलवले पण तत्पूर्वी त्याचे निधन झाले होते.

त्या दिवशीच या दोघांच्या प्रमोशनची ऑर्डर आणि त्यांची बदली मुंबईच्या बाहेर यवतमाळ मध्ये अनिल व नागपूरला सुनीलला ट्रान्सफर केली होती. तसेच महाराष्ट्र सरकारने विनंती केल्याप्रमाणे त्रिपाठींची बदली अँटीकरप्शनला झाली हे त्रिकूट गेले आणि मुंबई पोलीस सुखावले.

सुनील अनिल आपल्या ड्यूटीवर जॉईन झाले हे त्रिकूट त्यांना फोडायचे होते कारण मुंबईतले सर्व धंद्यांनी पोलिसांना घालायचा रतीब थांबवला होता. आणि भ्रष्ट पोलिसांनी तो पुन्हा सुरू करायला लावला पण या गेमची दहशत जबरदस्त होती हे सगळ्यांनीच कबूल केले. आखे गृह खाते हादरवणारे हे गेम प्रकरण सध्या बासनात बंद झाले होते एवढे खरे!!

# धोबीपछाड!!

खरंच, गरीबी हा शाप म्हणावा काय माणसाच्या जीवनात. हातापायांना खिळे मारावे तसा माणूस जखडत जातो. साऱ्या आशा आकांक्षांना खीळ बसते, दोष त्याचा नसतो, ना आई-वडिलांचा, ना त्याच्या नशिबाचा. माणूस जन्माला येतो तो परमात्मा त्याला जिथे जन्माला घालील तिथे, असेल काही पूर्वजन्मीचे संचित म्हणा. पण काही असो ते माणसाला स्वीकारावे लागतेच की नाही. कोणाला तक्रार करता येत नाही पण एक गोष्ट खरी, पाय रोवून उभे राहणार आहे या नशिबाच्या दोऱ्या तोडता येतात. अशी अनेक माणसे आपण पाहतो, त्यांचे जीवन ते स्वतः स्पष्टाने घडवतात. समाजासमोर आदर्श ठरतात. पण त्यासाठी त्यांना प्रवाहाच्या विरोधात पाय देऊन उभे राहावे लागते हे सत्य.

शरद टेरव गावातला, शेतकऱ्याचा मुलगा, घरची गरीबी. खायला तोंडे चार. शेती ही पुरेशी नाही. सरकारच्या सवलतीच्या धान्यावर त्यांचा पिंड पोसलेला असतो. गावातल्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. दहावी झाला तो. आणि मग कोणीतरी सांगितले म्हणून त्याने आयटीआयला प्रवेश घेतला. गावातल्या एका सदन माणसाने लांब राहणाऱ्या मुलांना सायकली वाटल्या. तो दत्तवाडीतला. तेव्हा ती सायकलच सावर्ड्याला आयटीआय साठी जायला त्याला उपयोगी पडली. तीन वर्षांचा आयटीआय चा मेकॅनिकल चा कोर्स पूर्ण करून ती परीक्षा उत्तम मार्कांने तो पास झाला.

आता नोकरी? कोठे पुणा, मुंबईला जावे तर कोणाकडे? कोणी नातेवाईक नाहीत. त्या गावातले एक सदगृहस्थ दशरथराव हे महेंद्र कंपनीत कामाला होते. त्यांनी शरदला महिंद्रा अप्रेंटिस म्हणून लावला एक वर्षाचा तो कोर्स पुरा करून तो नोकरीत रेग्युलर झाला. दशरथ रावांनी त्याला थोडे दिवस आधार दिला. आता शरदचा पगार चांगला होता त्याने मालाडच्या झोपडपट्टीत एक रूम भाड्याने घेतला आणि सध्या त्यांनी आपले बस्तान मालाड मध्येच ठेवले. त्याकाळी महिंद्रामध्ये युनियनचे वारे जोरात वाहत होते. दशरथराव निवृत्त झाले व गावात येऊन स्थायिक झाले. ते त्या काळातले युनियनचे मोठे लीडर होते. पण त्यांच्या पक्षात सगळे राजकारण बदलले. अनेक राजकीय पक्षाच्या सत्ताधारी, विरोधी पक्षाच्या लीडरनी त्या कंपनीत शिरकाव केला. पूर्वी एकच युनियन होती आता दोन-तीन झाल्या, काही जातीयवादी पक्षांनीही आपली पोळी भाजण्यासाठी वेगळी युनियन काढली. शरद दशरथ रावांचा चेला त्यांनी सेनेतील युनियन मध्ये सदस्यत्व घेतले व कार्यकर्ता म्हणून काम करू लागला.

शरद तसा कंपनीत नवा होता. त्यांच्या युनियनची सध्या चलती होती. एवढ्या सगळ्या युनियन झाल्याने खरे तर कंपनीच्या मालकाची गोची झाली होती. सगळेच लीडर बाहेरचे. आत फक्त सगळे कार्यकर्ते. पण कंपनी वाले मोठे बिलंदर. त्यांनी बाहेरच्या लीडर लोकांची बाजू घेत कामगारांची चांगलीच हातमिळवणी करण्याचे ठरविले. त्यात नुकसान कामगारांचे हे त्या वेड्यांना कळत नव्हते. कारण आपल्या एक दोन कामगार लीडरना हाताशी धरून

बाहेरचे राजकारणी कामगारांची बाजू मालकाजवळ मांडत नसत. कंपनी या राजकीय पुढाऱ्यांना पैसा फेकायची, त्यात मरायचा कामगार.

खरे तर मार्केटमध्ये या कंपनीच्या मालाला मोठी मागणी होती. खूप मलिदा कंपनी कमवायची. त्यात जुने मालक जाऊन आता त्यांची पोरे मालक झाली. ती खुळी जमात मग या राजकारणाची बटीक झाली आणि कामगार व मालक यात मोठी भिंत उभी राहिली. कामगारातील कोणा हुशार लोकांना हे मालक काडीचीही किंमत देत नव्हते. त्यात हे राजकीय पुढारी आपली पिल्लावळ कंपनीत नोकरीला ठेवीत. निवृत्त होणारे कामगारांच्या मुलांना नोकरीत घेईनात. त्यांना कोणीच वाली उरला नाही. कामगार व कंपनी यात होणारे करार हे राजकीय पुढारी यांना हवे तसे होत, त्यात तोटा होत असे तो कामगारांचा. त्या कंपनीच्या शेअर चा भाव शेअर मार्केटमध्ये चांगला. तेव्हा ते शेअर कामगारांना न देता हे राजकीय पुढारी आपल्या खिशात घालीत. म्हणजे एकूणच नुकसान कामगारांचे.

शरद मे महिन्यात लग्नासाठी गावाला आला. दशरथ रावांच्या तो घराण्यातला. तेव्हा भेटीगाठी होत्या चर्चा होई. शरद सगळी माहिती दशरथ रावाना देई. त्यांनी शरद ला कानमंत्र दिला आणि एकदा ते मुंबईला आले. अजूनही त्यांच्या ओळखीचे खूप लोक कंपनीत होते. त्यांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या व एक शिष्टमंडळ कंपनीच्या मालकांना भेटले. त्यांनी कामगारांची होणारी पिळवणूक हे बाहेरचे लोक कशी करतात हे मालकांना समजाविले. एक नवीन नेतृत्व दशरथ रावांच्या निमित्ताने कंपनीत उभे राहिले. शरद त्यांचा उजवा हात होता. तो कंपनी तिन्ही पाळयांच्या लोकांना भेटायचा. कंपनीतली अंतर्गत

युनियन चांगले बाळशे घेऊ लागली होती. दशरथराव मूळचे सेनेचे. त्यांचा दबदबा मोठा. पण सच्चा कार्यकर्ता भ्रष्टतेच्या विरोधात हा हा म्हणता गणपती दसरा गेला आणि दिवाळी बोनस साठीच्या मीटिंग होऊ लागल्या. कामगार युनियन आपल्या मागण्या कंपनीला सादर केल्या. त्या वास्तव आहेत यासाठी बाकी सगळ्या युनियन एकत्र आल्या. त्यांनी कंपनीच्या मालकांचे कान फुंकले व नव्या मागण्या करणारे पत्र कंपनीला सादर केले. त्यात कंपनीचा फायदा होता व बराचसा मलिदा या बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांच्या खिशात गेला असा हा मोठा तिढा निर्माण झाला. दशरथरावांच्या युनियन मध्ये 35 टक्के कामगार होते. उर्वरित सगळ्या इतर कामगार युनियन मध्ये विभागले होते.

दशरथ रावांनी कंपनीला नोटीस दिली आणि बेमुदत संपाचे हत्यार उपसले. त्याला बाहेरच्या सर्व युनियनचा विरोध झाला आणि संप बारगळला. त्यात शरद सारखा नवखा कार्यकर्ता भरडला गेला. कारण त्यांची युनियन फुटली आणि तिचे कार्यकर्ते इतर युनियनमध्ये गेले त्यामुळे शरद एकाएकी पडला कारण तो दशरथ रावांचा चेला होता. काहीच किंमत उरली नाही त्याला. तो स्वतः कोणत्याच इतर युनियन मध्ये गेला नाही, तो आज न उद्या डोईजड होईल याची भीती इतरांना होती कारण तो हुशार होता, भाषणे देण्यात तरबेज झाला होता. कामगाराचे हितही त्याला समजत होते. यात सहा सात वर्षे निघून गेली. दशरथराव गावाला गेले आता ते वृद्ध झाले होते.

गेल्या 14-15 वर्षात मुंबई इतकी वाढली की अनेक कंपन्यांचे मुंबईतून स्थलांतर झाले, या कंपनीनेही आपली अनेक डिपार्टमेंट नाशिक पुण्याला व

त्याहून दूर हलवली होती. आणि उरलेली खाती लवकरच मुंबई बाहेर जाणार अशी कुणकुण लागली होती.

मोठमोठ्या बिल्डरने युनियनच्या राजकीय पुढाऱ्यांना हाताशी धरून ही 35 एकराची जमीन आपल्याला मिळावी यासाठी कंपनीच्या मालकांची लागेबांधे बांधण्यास सुरुवात केली होती. शरद चे ट्रॅक्टर डिपार्टमेंट खूप दूर यवतमाळला जाणार हे कंपनीने डिक्लेअर केले आणि सगळ्या कामगारांना तशी नोटीस दिली. दोन महिन्यात कंपनी बंद केली जाणार होती कारण हे एकच दिविजन बाकी होते.

कंपनीने आपले केलेले शिफ्टिंग शरद ला मुळीच आवडले नव्हते. हजारो कामगार आज देशोधडीला लागले. पगार कमी झाला, जुलमीपणाने कामगारांना नाडले याने शरद दुःखी झाला होता. आज तो एकाकी होता. फार थोडे कामगार त्याच्या बाजूने होते. पण तो हिम्मत हरला नव्हता. शेवटी तो दशरथरावांचा चेला होता. ज्या बाहेरच्या राजकारण्यांनी युनियनच्या माध्यमातून कंपनीत शिरकाव केला, कंपनीला लुबाडले, मालकाकडून प्रचंड पैसा खाल्ला. त्यामुळे प्रचंड फसवणूक झाली. त्यात तरुण पोरे देशोधडीला लागली. बाहेर गावच्या प्लॅन्ट वर फारच कमी लोक गेले, कारण अनंत अडचणी, ना राहायला जागा, तुटपुंजा पगार... हे शरदच्या मनाला खूप लागले आणि त्याने मनाशी ठरवले आपण यवतमाळला जायचे आणि असा काय खेळ खेळायचा की मालक मेटाकुटीला येईल. याच संधीची वाट तो यवतमाळला जाऊन पहात होता.

त्याला ती संधी चालून आली. सेनेच्या स्थानिक लोकांशी त्याने संधान बांधले व या कंपनीच्या नव्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन आपली पोरे कंपनीत घुसवली. आता कंपनीत दोनशे लोक काम करीत होती. त्यांचा विश्वास शरदने संपादन केला व तो संधीची वाट पाहत होता. त्यावेळी समंतराव पाटील यांची त्याची ओळख दशरथरावानी करून दिली, संधी येईल तेव्हा आपण मालकाला धोबीपछाड देऊ हाच विचार तो सतत करीत होता. पण हे सगळे घडले जेव्हा तो यवतमाळला गेला.

पण तत्पूर्वी हे प्लांट येथे ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न शरद करीत होता यासाठी शेवटचा डाव त्याने खेळण्याचा विचार पक्का केला व दशरथरावांच्या मार्गदर्शनाखाली नवा संघर्ष म्हणजे आमरण उपोषणाचा त्याने कंपनीला तशी नोटीस दिली व आपल्या कामाला लागला. खरे तर शरद एकाकी होता. त्याला कोणाचा सपोर्ट नव्हता. कंपनीने कामगारांना मोठमोठ्या ऑफर दिल्या आणि घरी जाण्याचा त्यांचा मार्ग मोकळा केला. जी वयस्कर मंडळी होती ती याला तयार झाली पण विरोध होता तो काही तरुण युनियनच्या कार्यकर्त्यांचा. आणि संघर्ष उभा राहिला तो दोन गटात. ज्यांचा या शिफ्टिंगला सपोर्ट होता त्यांच्याजवळ पैशाचा पुरवठा मालक करीत होता. पण या कार्यकर्त्यांना कोणी वाली नव्हता. धमक्यांवर धमक्या शरद आणि त्याच्या साथीदारांना येत. कंपनीने आपले हात सगळ्याच बाबतीत झटकले आणि संघर्ष उभा राहिला आता शिफ्टिंग ला आठ दिवस होते. शरद आणि कंपनीने कंपनीच्या दारात बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले. दोन दिवस या उपोषणाला होऊन गेले होते आणि एक दिवस रात्री गुंडांनी या उपोषण कर्त्यांवर हल्ला केला काठ्या-

लाठ्यानी त्यात अनेक जण जखमी झाले. शरद ला जबर मार लागला आणि त्याला हॉस्पिटलला हलवले. उपोषणाचा बोऱ्या वाजला आणि कंपनीने शिफ्टिंग केले. दुसरा मोठा प्रश्न उभा राहिला तो म्हणजे कंपनीची नोटीस. आठ दिवसात कामगारांनी यवतमाळला जाऊन कामावर हजर राहण्याचा. अन्यथा त्यांना कामावरून काढून टाकण्यात येईल असा. शरद अजून कोमातच होता. दशरथराव गावाहून आले तर कंपनी शिफ्ट झाली होती. उजाड झालेला परिसर त्यांनी पाहिला आणि कंपनीच्या दारातच बसकण मारली. वॉचमन आत सोडायला तयार नव्हते सगळी स्मशान शांतता.

ते हॉस्पिटलमध्ये जाऊन शरदला पाहून आले. आतासा तो थोडा शुद्धीत आला होता. त्याच्या साथीदारांशी कोणताच संपर्क नव्हता. शरदने कंपनीला पत्र लिहून पंधरा दिवसांची मुदत मागितली. खरे तर शरदला त्यांना कंपनीतून हाकलायचेच होते. पुढे ते खूपच त्रासदायक होईल म्हणून, पण हॉस्पिटलच्या सर्टिफिकेटमुळे करता येईना.

आता तो बरा झाला होता व यवतमाळ ला जाण्यासाठी निघाला. पगार नव्हता, पैशाची चणचण. तो यवतमाळला गेला व कामावर हजर झाला. आता त्या नव्या प्लांटमध्ये फारच थोडे लोक कामावर होते. कंपनी एकच शिफ्ट मध्ये चालू होती. अजून कंपनीने उत्पादनाला सुरुवात केली नव्हती. कंपनीच्या मालाला प्रचंड मागणी, शेतीची कामे सुरू झाली होती, बाजारात ट्रॅक्टरचा ठणठणात. आता पूर्वीच्या युनियन येते कार्यरत नव्हत्या. पैसे घेऊन युनियन वाले घरी बसले होते. आता कंपनीत दोनशे कामगार होते. शरद ने आपली युनियन पुन्हा बांधण्यात सुरू केली व कंपनीच्या मालकाला नोटीस दिली. नव्या मागण्या

केल्या, सभा होत, कंपनीची नवे करार झाले आणि त्याच्या अनेक मागण्या मान्य झाल्या. त्यांनी उत्पादनाला सुरुवात केली कंपनीने 20 टक्के बोनस दिला. आता त्या नव्या प्लांटमध्ये शरदचीच युनियन अधिकृतरित्या कार्यरत होती.

दशरथ रावांचे यवतमाळच्या सेनेचे जिल्हाप्रमुख संपतराव पाटील हे शरदच्या मागे ठाम उभे राहिले आणि शरद चे संपूर्ण सहकार्य संपतरावांना योगायोग असा संपतरावांना एम एल ए चे तिकीट मिळाले आणि ते निवडून आले.

ज्या पद्धतीने चांगली कंपनी फायद्यासाठी नव्या मालकांनी म्हणजे महिंद्राच्या मुलांनी बिल्डरच्या गळयात बांधली हजारो कामगारांना देशोधडीला लावले, त्याबद्दल त्यांच्या मनात आकस होताच. ही कंपनी येथे येण्या अगोदर संपतराव या कंपनीला नडला होता. आता हे प्लांट एकच चांगले चालत होते. याला शह घ्यावा यासाठी केंद्रीय सरकारच्या नव्या धोरणानुसार नव्या कंपन्यांना संधी द्यावी यासाठी संपत रावांनी आपले 5000 एकराची जागा सुझुकी या नव्या ट्रॅक्टर कंपनीला देऊ केली. आणि संपतराव आणि शरद राव यांनी हा नवा प्लांट उभा करण्यासाठी खूप मदत केली. नवी कंपनी सुरू झाली. शरद ने आपल्या कंपनीतल्या सगळ्या कामगारांना उत्तम पगार देऊन या कंपनीत नोकरी दिली आणि महिंद्राचा हा प्लांट बसला. एकही कामगार उरला नाही कारण सुजुकीचा प्लांट खूप जोरात चालू झाला, उत्तम माल त्यामुळे मागणी फार. या अगोदर महिंद्रा कंपनीचे इतर प्लांटही नीट चालत नव्हते. मदार होती ती या ट्रॅक्टर प्लांटवर. पण संपतराव आणि शरद यांनी पूर्वी कंपनीने शरद शी आणि

कामगारांवर केलेल्या अन्यायाचे उट्टे चांगलेच भरून काढले. शेवटी ते प्लांट कंपनीने बंद केले.

आज त्या कंपनीत दोनशे कामगार काम करीत होते आणि शरद आता मॅनेजर च्या पोस्टवर तेथे काम करीत होता. शिवाय त्या कंपनीच्या सर्व कामगारांची आता एकच युनियन होती आणि शरद त्या युनियनचा संस्थापक अध्यक्ष झाला.

त्या महिंद्रा कंपनीने त्यांचे ते प्लांट गुंडाळले कारण कामगारच नव्हते. शिवाय प्लांट आडवळणावर होते तेथे कोणीही जाण्यास तयार नव्हते शिवाय सुझुकीच्या कंपनीने कामगारांसाठी घरे बांधली प्लांट पासून जवळ राहण्याची, मार्केटची व्यवस्था केली त्यामुळे सगळे कामगार खुश होते. शरद बोले आणि सुझुकी कंपनी हाले अशी अवस्था झाली होती.

आणि या धोबीपछाडणे महिंद्राचे प्लांट बंद झाले. शरदचा आता राजकारणात शिरकाव झाला होता. संपतराव पाटलांचा तो आता राईट हॅन्ड झाला होता. त्याच्या गावातही आता त्याची पत वाढली होती.

आपल्या गावात त्याने हायस्कूलला मदत केलीस पण ज्युनिअर कॉलेज ही काढले आणि गावात उत्तम जम बसवला. जे दशरथरावाना जमले नाही ते शरदने करून दाखविले.

हे त्याच्या चिकाटीचे हिमतीचे फळ होते. असे नाही वाटत!!

# शाप जातीचा / गरिबीचा !

दादांनू! म्हणत महादूने हात पुढे केला....

80 वर्षे पार केलेल्या महादुला तसे नात्याचे कोणीच नव्हते एकट्याचे जगणे तेही कोणाच्या आधाराशिवाय, पोटाच्या खळगीतला ज्वाळ गिळी पाण्याच्या घोटाघोटा बरोबर दिवस कंठणे आत्ताशी खूपच कठीण झाले होते. कधी कुणी तुकडा दिला तर ..... नाहीतर...! मरण येत नाही, ही खंत त्याच्या मनात अखंड वावरत होती. पण त्याच्या हातात काही नव्हते...

त्याच्या आशावादी डोळयांनी माझे गलबलीचे मन अधिकच द्रवत गेले मी नेहमीप्रमाणे शंभर ची नोट त्याच्या खिशात सरकवली.... मी पुन्हा त्याच्याकडे न पाहता वाट चालू लागलो....

तो वळला वडापावच्या दुकानाकडे दोन वडापाव म्हणत त्याने शंभर ची नोट रमीच्या हातात ठेवली....

आज तो श्रीमंत होता. दोन-तीन दिवसांची बेगमी झाली होती... वडापाव वर पाणी पिले की उद्या शिवाय उठायचे नाही म्हणत त्याने घर गाठले.

त्यात त्याचे तरुणपणाचे सारे दिवस आठवू लागले....

दहा-बारा वर्षाचा असताना आईच्या मागे मागे खोताच्या दारात तो यायचा. आई दिवसभर काम करायची शेतात, वाड्यात शेण काढण्यापासून

सारी कामे ती करायची. यायची सकाळी दिवस उजाडता नी घरी परतायची दिवे लागणीला. पोर पण मागे मागे यायचं...

खोताकडेच दुपारची, संध्याकाळची जेवण व्हायचे. शिवाय काही बाई खोतीन द्यायची. महादू गुरे राखायचा. त्याच्याही जेवणाची व्यवस्था आपसुकच झाली होती... दिवस जात होते.

बरोबरीची खोता बामणाची पोरे शाळेत जात आणि महादूची पावले खोताच्या घराकडे...

महाराच्या पोरांना तसा शाळेत प्रवेश असे पण, पाटी पुस्तकाचा खर्च कोणाला झेपत नसे.... शिवाय शिक्षणापेक्षा पोटाची काळजी मोठी.....

महादू तसा जात्याचा हुशार. छान बासरी अलगुनी वाजवायचा तो. () व्हाळत गुर लावली की तो मोकळा असेल निवांतपणे. आलगुनी वाजवी त्याचा वेळ कधी जाईल हे त्यालाही कळत नव्हते....

बालपण सरून महादू तरुणपणाकडे झुकू लागला.... आता तर खाऊन पिऊन तो धष्टपुष्ट झाला होता... बाप्या दिसायला लागला होता.

म्हादू! आता लगीन करूया! काय?

या आईच्या बोला ने थोडा तो शहारला पण क्षणभरच मरणाची गरिबी... रोजगारात भाकरी तुकड्याचेही नीट जमत नव्हते त्यात लगीन?

छा! मला नाही लगीन करायचं... हव तर तूच कर! तो

काय येडा आहेस काय? अरे समद्यांची लग्न झाली.... आपण गरीब... म्हणून राहिलो मागे नाहीतर दोन पोरांचा बाप झाला असता तू! आई

नाही नाही आई लग्न मला तर कधीच करायचं नाही मी मनाशी ठरवलंय! तो

आणि आईचा नाईलाज होई.

गावात चैत्राच्या जत्रेला तमाशाचं कार्यक्रम होईल समदी माणसं त्यात पुरुष बाह्यापुरे सकाळ पावर तमाशाच्या फडात बसून असत वग लागे, राजा प्रधानाचा.... गवळण मग लावणी सारे महादुला खूप आवडे. सगळ्यात पुढे बसून त्याच्या आशाळभूत डोळे तो सारा तमाशा डोळ्याने टिपित असे.

यावर्षी तमाशाच्या दिवशी तो लवकर कमानीच्या आत बाजूला येऊन चकरा मारीत होता न्याहाळीत होता त्यातल्या बाया नी तोंडे रंगवणारी पात्रे. एवढ्यात कमानीच्या बाहेर एका मजबूत पंजात त्याची मान अडकली...

काय रे! काय पाहतोस कमानीच्या फटीतून...

महादू पार गोंधळला होता....

नाय बा... काय नाय! तो

तो गयावया करीत त्या म्हातार बुवाच्या पाया पडू लागला...

मग मला तमाशा घ्याल काय? तो

काय येतं तुला, हळगी, पेटी काय येतं?

बासरी छान वाजवतो मी मला आवड आहे शिवाय डफ येतो की थोडाथोडा वाजवता...

चल आज चल म्हणत महादूला कमानीत आणला....

अरे हे! राजा.... तुला पेटी वाजवायला हवा होता ना माणूस! हा घ्या...

ठीक आहे! ठीक आहे! राजा

महादू एका पेटीवर बसला. त्याच्या पुढ्यात भात भाकरीचे ताट एका मुलाने दिले, खरच त्याला भूक लागली होती भराभर त्याने जेवून घेतले आज त्याला नोकरी लागली होती..

रात्रभर रात्रभर तमाशा अगदी पुढे बसून त्याने पाहिला त्याआधी सगळ्या वर्गातल्या पात्रांचे चेहरे रंगणारे पाहून त्यांनेही मनातल्या मनात आपणही कामे करू शकतो असे वाटू लागले...

महादूला काही शिकता आले नाही. नाही म्हणायला हलगी वाजवण्याची त्याची तयारी चांगली होत होती. डफ पण वाजवायला येऊ लागला.... त्यातच फडातील नटी त्याला आवडू लागली होती... आणि तिलाही तो. प्रतिपदेपासून पौर्णिमेकडे सरकणाऱ्या तिथीच्या कलेकलेने त्यांची एक दुसऱ्याची ओढ. तशी लपून राहिली नव्हती...

दरम्यानच्या काळात महादू तो महादेव म्हणून फडात ओळखला जात होता. आता तू छान डफली शिवा डफवाला वयानुसार जेव्हा जागेवर बसला महादेव ने त्याचा ताबा घेतला! घामाचाच वाजवल्याने सारा परिसर भारावून जात असे. कानाकोपऱ्यातून लोक, पोराढोरांना, बायकांना, म्हातारा कोताऱ्यांना घेऊन कमानीत घुसत असत. आणि हा हा म्हणता खेळ 'फुल' होई. तेव्हा जेव्हा बघायला सुरुवात होण्याआधी बतावणीचा काळू बाळू येईल तेव्हाच

महादेवाचा डफावरचा हात थांबे व आपला डफ काळूच्या हातात देऊन तो वगात जात असे...

दोन-तीन वर्षाच्या काळानंतर ही नटी फक्त त्याला झुलवीत आहे असेच महादेवला वाटत होते. अगं आपण लग्न करूया! या प्रश्नाला तिने कधी टाळले नाही पण खाजगीत ती म्हणे तमाशातील बायांची लग्न होतात का?

महादेव आता झुरणीला लागला होता. ती त्याला जवळ करी पण त्यात महादेवचे समाधान होत नव्हते.

आता आताशे महादेवने गावाला येणेही टाकले होते. तो तिकडे कोल्हापूरला कलमपुरातच राहायचा फडाच्या लोकांबरोबर. नवे नवे वग ते मधल्या काळात बसवीत असं सीजन सुरू होण्याअगोदर त्याच्या तालमी होत. आता महादेवला प्रधानगीची भूमिका मध्ये मध्ये करण्याची संधी मिळत असे तो आपल्या कामावर खुश होता तसा फडाचा मालकही.

त्यांच्या फडाला पहिली सुपारी कराडच्या नागावच्या जत्रेची मिळाली नी फडाने कोल्हापूर सोडलं.

शंकर पाटील चा हा फळ म्हणजे अख्या पश्चिम महाराष्ट्रात त त्यात काळूबाळू या जुळया भावांची बतावणी सरस लोक फेटे उडवीत, पैशाचा रतीब पडे स्टेजवर. सुपारीची जबर असे, पण लोकांच्या करमणुकीत हयगयही नसे.

आज महादू थोडा नाराज होता नामीला त्याने कोल्हापुरात आपला मनोदय सांगितला. ती तशी अगदी गप्पच होती. काही प्रतिक्रिया दिली नाही तिने. आणि आपण जागा तर चुकलो नाही ना? असा संशय आला की तो

अधिकच अस्वस्थ झाला कोल्हापूर ते साताराच्या प्रवासात तशी नामी त्याच गाडीत होती पण तिने त्याच्याकडे ढुंकून पाहिले नाही जेवणाला गाडी कराडला थांबली तेथेही त्याने तिला थोडे हटकलं पण ती ढंम!

त्याने तिचा हात धरला तर तिने तो झटकला! नाही म्हादु... नको! मला नाही लगीन करायचं अरे येडा आहेस का तू? इथे कोणाची लग्न झालेत का ?

मग काय असंच.... रहायचं!

हो! ती

मला मान्य नाही.... नाहीतर मी....

असा अर्धवट बोलून त्याने पुढचं बोलणं थांबवले. नामी पण चपापली... आता थोडा तिचा मूड विरघळला होता असे वाटले... पण...

तिने पुन्हा त्याला समजावण्याचा प्रयत्न केला पण तो गप्प... ती गप्प...

सातारचा तो ना गावचा तमाशा चा कार्यक्रम झाला नी पुढे ते कोकणात येणार असे शंकर पाटलाने सांगितले.... शिरगावच्या काळी मातेच्या जत्रेची सुपारी होती...

महादूला हे समजल्यापासून तो अगदी आनंदात होता. आता तसे त्याच्या गावात कोण नव्हते मधल्या काळात आई गेली मागे कोणी नव्हते, होती चुलत भावंडे पण ती आपापल्या घरात राहत होती. गेली चार वर्षे महादू च घर बंदच होते. कोणी मास्तर म्हणे भाड्याने ठेवला होता घरात. तोही आता बदली

झाल्याने घर ओक ओकच होतं.... पण तशी घराची ओढ महादुला घराकडे खेचत होती.

शिरगावच्या देवीच्या जत्रेला कार्यक्रम झाला आणि चार दिवसांनी टेरव गावच्या चैत्र पौर्णिमेच्या जत्रेचा कार्यक्रम होता.

टेरव गाव हे गाव.... गाव तसं थंड हवेचे छान. गावात भवानी वाघजाई चे छान मंदिर हेमाडपंथी होते. काळकाइ आईचे हे मोठे स्थान... या चैत्र पौर्णिमेच्या जत्रेत गेली अनेक वर्षे तमाशा होत असे तशी त्या गावची परंपरा होती. डफावर थाप पडली पाहिजे. ही अनेक वर्षांची परंपरा... अनेक वर्षे चालू होती. महादू हे पहात आला होता त्या गावातूनच त्याला तमाशात काम मिळाले होते.

सकाळी सात वाजता गाड्या टेरव गावात आल्या. महादने शंकर पाटलांना सांगून नामीला आपले घर दाखवायला नेले. तो पुढे चालत होता नी ती मागे पण एक अक्षरही ती बोलली नाही. घर जवळ आले महादू ने ते बघ माझे घर! म्हणून दाखवण्यासाठी मागे पाहिले तर ती फरलांग भर मागे होती. खरे तर बरोबर निघालेले ते मागेपुढे हवे होते पण ती इतक्या मागे? महादूला प्रश्न पडला खरंच ही मनापासून आलेय की जबरदस्तीचा राम राम म्हणून?

शेजारच्या घरातून चावी घेऊन महादुने आपले घर उघडले व ती दोघे घरात आली घर तसेच चांगले स्थितीत होते. त्याच्या आजोबांनी बांधलेले होते ते. पूर्वी सारखेच होते. पण मग खोताने नवे घर बांधल्यावर त्या घरावरची जुनी कवले महादूच्या बापाने आपल्या घरावर घातली होती. घरात तसे काही सामान सुमान नव्हतेच....

"काय रे महादू ही तुझी बायको काय?" गमतीने... त्याच्या चुलतीने विचारले

महादू काहीच बोलला नाही. अन् तीही गप्पच होती. चुलतीने केलेल्या चहा पिऊन ती दोघे मागे परतली.... फडाकडे.

महादू अधिक अस्वस्थ झाला होता. आज वग सुरू झाल्यावर डफा वर त्याचा हात हवा तसा पडत नव्हता हे शंकर पाटलाच्या ध्यानात आले होते... पण चला गावातच कार्यक्रम त्याला ओळखणारे सगळे लोक तेव्हा असेल काही अस्वस्थता.... पण कारण ते नव्हते... नामीचे गप्प राहणे त्याला जिव्हारी लागले होते.

आता या कार्यक्रमानंतर दुसऱ्या सुपारीच्या गावाला जावे लागेल... या विचाराने महादू अस्वस्थ होता. त्यात नामी गप्प गप्पच होती.

सकाळी चार वाजता कार्यक्रम संपला व आवरा आवरीला सुरुवात झाली.

कापड बदलून काहींनी अंथरूण धरलं होतं पण महादू अजून तसाच आपल्या कपड्यात पेटाऱ्यावर बसून होता.

आपण पुढच्या गावात जावं की त्यांना येथूनच राम राम करावा... आपल्यामुळे त्यांचे काही अडत नव्हते... वाजली तर वाजली अशी त्याची फडात अवस्था होती. त्यात नामीचा फुगवटा त्याला जिव्हारी लागला होता.

आठ वाजता येथून हलायचे हा शंकर पाटलाचा हुकूम... महादू अजून तसाच बसला होता हातात डफ तसाच होता.

"काय रे! महादू आटप की लेका... निघायचे आहे. पाली गावात आता सुपारी हाय चल आटप.

पण महादूचे पाय हलत नव्हते. तमाशातला ड्रेस त्याने पेटाऱ्यावर काढून ठेवला. आणि आपली पॅन्ट घालून,

"शेठ! मी नाही येत पुढे! बस बस झाला तमाशा... मी माझ्या गावातच राहणार! मजुरी करेन... पोट भरीन... नाही तरी आमचे बाप जादे जे करीत त्याला तोटा नाही! पोट कसबी भरेल...!"

शंकर पाटील चाट पडला...!

महादूचे हे संभाषण नामी ऐकत होती अगदी ध्यान देऊन...मग तिनेही पाठ फिरवली आणि ती दूर गेली.

म्हादूच्या डोळयात पाणी तरळले.... अस्वस्थ मनाने त्याचे पाय घराकडे चालू लागले त्याने पुन्हा मागे वळून पाहिले नाही... मात्र त्याच्या पाठमोऱ्या देहाकडे नामी पहात होती. तिचेही मन हळवे होते.... पण

एका तमासगिराच्या करिअरला फुल स्टॉप मिळाला होता.

दुसऱ्या दिवशी त्याने पुन्हा खोताचे घर गाठले. खोतानु! मी परत आलोय! मला सांभाळून घ्या! मी एकटाच हाय! लगीन नाही केलं तुमच्या पडवीला पडून राहीन. तुम्हीच आता माझे मायबाप म्हणत... त्याने वाड्यातले बैल सोडले.

आषाढाचा महिना आला होता. नांगरकीची कामे सुरू झाली होती. महादू नांगर घेऊन पेरण्या ची कामे करीत होता. महादू आल्याने खोताला उसंत

मिळाली होती... चिपळूणला जाऊन व्यवस्था करायला तो निघून गेला होता. येताना त्याने आजचा पेपर आणला होता. त्यातली बातमी तो आपल्या बायकोला सांगत होता.

अगं सुमा आक्रीत झालं... आपल्या गावात आलेला तो तमाशा होताना त्यांची गाडी कोयना घाटात घसरून खाली पडली ही सगळी माणसं मेली.... एक-दोन जखमींना चिपळूणच्या हॉस्पिटलला ऍडमिट केलंय... महादू हे सारे पडवीला पडून ऐकत होता.

काय खोतानु? काय झालं...! महादू

पुन्हा खोतानी ती हकीगत सांगितली... कोण गेले? कोण वाचले? काय? अहो मी त्याच फडात काम करीत होतो.

“हो का! त्यातली दोन-तीन लोक जखमी आहेत आणि चिपळूणच्या हॉस्पिटलला आहेत हवे तर बघून ये!” खोत

“हा मी सकाळीच जातो...!” महादू

त्या रात्री त्याला झोप लागली नाही. आपणही त्याच फडात होतो, याच गाडीतून जात असताना आपणही मेलो असतो....! देव पावला आपण फड सोडला....! महादू

सकाळी तो निघाला आणि सरळ वाटेने चालत दवाखान्यात पोहोचला त्याची नजर आपल्या ओळखीच्या लोकांना शोधीत होती...

तेवढ्यात त्याची नजर जवळच्या खाटेवरच्या शंकर पाटलाकडे गेली....

“शेठ! म्हणत त्याने त्यांचे पाय धरले. अहो काय झाले हो! आणि नामी!....”

“ती बघ... त्या कॉटवर! बघ! वाचली ती...”

महादू धावतच तिच्याकडे गेला आणि तिच्या गळयात पडून रडू लागला, तीही तशीच अगदी ओक्साबोक्सी रडू लागली...

“सारा इस्कोट झाला! फड संपला समदी गेली.... आता पुढे...”

“मी आहे! तू माझ्याबरोबर चल! मी नाही रागावलो तुझ्यावर... म्हणत दोघे पुन्हा गळयात गळा घालून रडू लागले...

दोन दिवस महादू हॉस्पिटललाच होता. शंकर पाटलांची तब्बेत रात्री जास्त झाली आणि सकाळी तो गेला.

आता त्या फडातील वाचली ती फक्त नामी....

सकाळी पोलीस आले त्यांनी तिची जबानी घेतली...

महादू अजून तेथेच होता... शंकर पाटलाचा मृतदेह ठिकाणावर लावून तो पुन्हा हॉस्पिटलला आला... तर नामी निघाली होती... आणि हॉस्पिटलच्या दारातच पारावर बसली होती.

एवढ्यात महादूची नजर तिच्यावर पडली....

अग! नामी कुठं चाललीस?

“काय बा ? आता माझ कोण नाय... मी अनाथ हाय या लोकांनी मला लहानाची मोठी केली.... माझं कोणी नाही....”

"मी आहे ना! तू काळजी करू नको! आपण घरी जाऊ! लगीन करू.... नाही म्हणू नकोस..." महादू

पारावरून उतरून नामी महादूच्या गळयात पडली..... ती कायमची...!!

महादू... नामीचा संसार काही फार काळ टिकला नाही. एक्सीडेंट मध्ये लागलेल्या तिच्या डोक्याच्या माराने पुन्हा डोके वर काढले नी वर्षभरातच नामी गेली.

पुन्हा महादू एकटाच!

त्यानंतरचा चाळीस वर्षाचा काळ महादूचा एकट्याचा... एकटा गेला..... मोलमजुरी करीत....खोताच्या पडवीलाच....

आता उतार वयात काय होत नव्हते... पण खोताकडचा आधार संपला नव्हता...

मिळेल ते तो खात होता... गावात फिरत होता.

आता चार दिवसांनी पुन्हा चैत्र पौर्णिमा. महादूच्या सगळया आठवणी अगदी उफाळून येत होत्या. लहानपणापासूनच्या.... त्या आता पावत.

आज चैत्र पौर्णिमा.... तो सकाळीच आपली डफ घेऊन... तमाशाच्या कमानी जवळ आला होता.

त्याला त्या गावातल्या काही लोकांनी ओळखला...

"अरे महादू! तू इकडे कोठे?"

महादू ने सारी हकीकत सांगितली त्या फडातल्या लोकांच्या डोळयात पाणी तरळले. शेवटी तमाशा हे आळवावरचे पाणी!

मालक! मला हलगी वाजवायची आहे... मला संधी द्याल. ही माझी शेवटची इच्छा आहे म्हणून त्याने फडाच्या मालकाचे पाय धरले नी हलगी वाजवायला सुरुवात केली. त्या काळात तो एक पटाईत


महादू पूर्ण दिवस त्या फडातच होता.


रात्री बारा वाजता तमाशा उभा राहिला....आणि त्याला नामीची आठवण येत होती तो अंगात आल्यासारखा तमाशाचा डफ वाजवीत होता.

नी! तो कोसळला.... डफावर मान टाकून महादूचा विशाल देह निपचित पडला होता....नी देवीच्या साक्षीने महादू.... गेला...!!

ॲड. यशवंत कदम यांची ई साहित्यवरील
इतर पुस्तके.
कव्हरवर क्लिक करताच उघडतील.


















**ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षाचे होत आहे.**

**ॲड. यशवंत कदम यांचे हे ई साहित्यवरील आठवे पुस्तक.**

ॲड. यशवंत कदम हे इन्कमटॅक्स कमिशनर व शिक्षणाने वकील. या दोन्हीही व्यवसायांत त्यांना असंख्य मानव प्रवृत्ती पहायला मिळाल्या. इन्कम टॅक्स मधे लोक पैसे कमावतात पण यांनी अनुभव आणि मैत्री कमावली. अध्यात्मिक वृत्तीचे श्री. कदम आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य आपल्या वाडवडलांच्या गावी ईश्वरसेवा आणि साहित्यसेवेसाठी व्यतीत करत आहेत. त्यांची आजवर सुमारे तीस पुस्तके विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत. त्यांच्या कथा व कादंबऱ्यांतून मानवी आयुष्यातील व्यावहारिक व अध्यात्मिक मूल्यांचा बोध होतो. त्यांच्या कथा विविध दिवाळी अंकांतून व नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा मनुष्य संग्रह व वाचक संग्रह फार मोठा आहे.

ॲड. यशवंत कदम यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद

(१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखा्नीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे

अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

ॲड. यशवंत बाबुराव कदम यांचा हा 'गोंदण' कथासंग्रह, हे मराठी साहित्य विश्वातील त्यांचे अठ्ठाविसावे पुस्तक आहे.

ॲड. यशवंत कदम हे एक उत्तम कवी सुद्धा आहेत. तसेच ते अनेक वर्षे साहित्य चळवळींशी निगडीत आहेत. ते कोकण मराठी साहित्य परिषदेचे स्थापना सदस्य आहेत आणि कवितेपासून कथांपर्यंत त्यांचा प्रवास कोमसाप संस्थेच्या संस्थापकांच्या पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या प्रेरणेमुळे व संस्थेतील प्रोत्साहनपर उपक्रमांमुळे घडला, असे ते 'गोंदण' पुस्तकातील त्यांच्या 'दोन शब्दांत' मोकळेपणाने लिहितात. ह्यातच त्यांचे स्पष्ट विचार व स्वच्छंद मन आपल्याला दिसते.